

# भारतीय जनता पार्टी

## बोरीवली विधानसभा



गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प ५

जनतेच्या हिताचा,

कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,

पक्षाच्या संकल्पनेचा !



२०२३-२४

कार्य अहवाल - ५ वा

श्री.सुरेंद्र गुप्ता
मंडळ अध्यक्ष

सौ.रेश्मा निवळे
महिला मोर्चा अध्यक्षा

श्री.नैनेश शाह
अध्यक्ष युवा मोर्चा

## सुनिल दत्तात्रय राणे

आमदार




सल्लामसलत
सकारात्मक राजकारणाची
निस्पृह समाजसेवेची !

# शुभसंदेश



## उप मुख्यमंत्री
### महाराष्ट्र राज्य

दि. ११ सप्टेंबर, २०२४

### शुभेच्छा

बोरीवली विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी श्री. सुनिल राणे यांचा पाच वर्षातील विकासकामांचा कार्य अहवाल प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला. लोकप्रतिनीधी म्हणून कार्यरत असताना मतदारसंघात केलेल्या विविध विकासकामांचा तसेच सामाजिक उपक्रमांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडण्याचा श्री. राणे यांचा हा प्रयत्न नक्कीच प्रशंसनीय आहे.

मतदार संघातील विकासकामांसोबतच जनतेचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी तत्पर असलेले आमदार श्री. राणे यांनी आपल्या कार्यातून जनतेचा विश्वास कमावला आहे. गेल्या पाच वर्षात बोरीवलीच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न व विकासकामांची ओळख करून देणाऱ्या या कार्य अहवालाचे जनता स्वागत करेल, असा विश्वास आहे. या कार्य अहवाल पुस्तिकेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)



## उप मुख्यमंत्री
### महाराष्ट्र राज्य

दि. २३ सप्टेंबर २०२४.

### शुभेच्छा

बोरीवली विधानसभा मतदार संघातील आपल्या कार्यकाळातील विकास कामाचा लेखाजोखा मांडणारा कार्यअहवाल आपण प्रकाशित करत असल्याचे समजून आनंद झाला. आपल्या वार्षिक कार्यअहवाल प्रकाशनाच्या उपक्रमास मन:पूर्वक शुभेच्छा.

भारतातील लोकशाही यशस्वीपणे कार्यरत राहावी, यासाठी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेच्या शेवटच्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या गुणवत्तेचे महत्व आवर्जुन अधोरेखित केले होते. त्या भाषणात त्यांनी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी ज्यांचे ते प्रतिनिधित्व करतात अशा नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी स्वत:ची बौद्धिक, नैतिक सक्षमता वाढवली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ती आजही कालसुसंगत ठरते.

लोकप्रतिनिधी या नात्याने आपण अपल्या मतदार संघातील नागरिकांच्या इच्छा, आकांक्षांचे प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे आपल्या कार्यकाळातील विकासकामांचा लेखाजोखा कार्यअहवालाच्या माध्यमातून नागरिकांसमोर मांडण्याचा आपला उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. या कार्यअहवालाच्या उपक्रमासह, आपल्या अगामी वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा.

(अजित पवार)

प्रति,
**आ.श्री. सुनिलजी दत्तात्रय राणे,**
सदस्य, बोरीवली विधानसभा मतदारसंघ.

# शुभसंदेश







पीयूष गोयल
PIYUSH GOYAL

सत्यमेव जयते

वाणिज्य एवं उद्योग मंत्री
भारत सरकार
MINISTER OF COMMERCE & INDUSTRY
GOVERNMENT OF INDIA

**शुभेच्छा संदेश**

बोरिवली विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय लोकप्रतिनिधी **श्री. सुनील दत्तात्रय राणे**, आपल्या कार्य अहवालाचे प्रकाशन होत असल्याचे ऐकून मनस्वी आनंद झाला. आपल्या अथक प्रयत्नांमुळे मतदारसंघात विकासाच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. आपली कार्यशैली समाजातील प्रत्येक घटकाच्या प्रगतीला प्राधान्य देणारी असून, आपल्या नेतृत्वात बोरिवली मतदारसंघाने अनेक मोलाचे टप्पे गाठले आहेत.

समर्पण भावनेने आणि निष्ठेने समाजात आपण सकारात्मक बदल घडवून आणत आहात, ही गौरवाची बाब आहे. आपण करत असलेले समाजसेवेचे कार्य, समाजाच्या उन्नत विकासासाठी आपण देत असलेले योगदान महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आपल्या नेतृत्वाने समाजातील विविध घटकांना उभारी मिळाली असून, आपले कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

आगामी काळातही आपल्या नेतृत्वात महाराष्ट्राच्या प्रगतीचा आलेख वाढता राहो आणि आपल्या उपक्रमांना यश मिळत राहो, यासाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा! आपली कार्यप्रवणता व जिद्द महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोलाची आहे. हा कार्य अहवाल आपल्या कार्याची साक्ष देणारा आणि भावी पिढ्यांना उत्तमोत्तम कार्य करण्यासाठी प्रवृत्त करणारा ठरेल, अशी खात्री आहे.

आपले कार्य भविष्यातही अधिकाधिक जनतेपर्यंत पोहोचावे, हीच सदिच्छा! आपल्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

पीयूष गोयल

**पीयूष गोयल**

Ministry of Commerce & Industry, Vanijya Bhawan, Akbar Road, New Delhi-110001
Tel. No. : +91 11 23039110, 23039111, E-mail : cimoffice@nic.in

---

चंद्रशेखर बावनकुळे
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र
सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद

24 सप्टेंबर, 2024

**शुभ संदेश**

आपण गत 5 वर्षांच्या कार्यकाळात बोरिवली विधानसभा मतदार संघात केलेल्या कामांचा 5 वा वार्षिक **'कार्य अहवाल'** पुस्तिकेच्या स्वरूपात प्रकाशित करीत आहात, ही आनंदाची बाब आहे.

आपण सामाजिक बांधिलकी जोपासत पक्षानी दिलेली जबाबदारी जाणीवपूर्वक पार पाडत जनतेप्रती असलेल्या कर्तव्याची पूर्तता करीत आहात. तसेच विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व लोकाभिमुख उपक्रम राबवून केलेले कार्य अभिमानास्पद आहेत.

आगामी काळातही आपण हे जनसेवेचे व्रत अधिक गतीने जोपासून विविध उपक्रमांच्या माध्यमातून अविरतपणे समाजाची सेवा कराल, असा मला विश्वास आहे.

आपले पुनःश्च अभिनंदन व आगामी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

आपला,

**(चंद्रशेखर बावनकुळे)**

प्रति,
**श्री.सुनिल दत्तात्रय राणे**
विधानसभ सदस्य,
152 - बोरिवली विधानसभा, मुंबई

कार्यालय : [illegible] मुंबई-400 020. दूरध्वनी : 022-22022050/22048687
निवास : [illegible] दूरध्वनी : 07109-264300
chandrashekharbawankule1@gmail.com
www.twitter.com/cbawankule https://www.facebook.com/cbawankule www.instagram.com/cbawankule
https://youtube.com/c/ChandrashekharBawankule_Official https://www.kooapp.com/profile/cbawankule

---

महाराष्ट्र विधानसभा

आमदार
**ॲड. आशिष शेलार** B.Sc., LL.B.
वांद्रे (पश्चिम) विधानसभा
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, मुंबई
माजी मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण

**प्रति,**

**मा. श्री सुनील राणे**
**आमदार**
बोरिवली

सस्नेह नमस्कार!

आमदार म्हणून आपण पाच वर्षे केलेल्या कामाचा अहवाल प्रकाशित होतो आहे. मतदार संघात केलेल्या कामाचा हिशोब मतदारांना देण्याचे उत्तरदायित्व आपले कर्तव्य मानून आपण हा अहवाल देत आहात.

बोरिवली सारख्या बहुभाषिक मतदार संघात आपण स्थानिकांच्या मागणीनुसार अनेक विकास कामे केलीत. शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्या सरकारने केलेली कामे व जनतेच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यात आपण नेहमीच पुढाकार घेतला आहे. जनसेवक म्हणून आपण सगळेच काम करीत असून वैचारिक बांधिलकी जोपासून जनसेवेचे व्रत आपण सगळ्यांनी हाती घेतले आहे. आपण "राष्ट्र प्रथम" मानणारे आहोत त्याच प्रेरणेतून केलेले काम जनतेस नक्कीच पसंत पडेल याची मला खात्री आहे.

आपल्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा!

**आपला,**

**ॲड. आशिष शेलार**

कार्यालय : [illegible] ई मेल : bjpbandrawest@gmail.com
कार्यालय : [illegible] ई मेल : mumbaibjp@yahoo.co.in
Website : advashishshelar.in AdvocateAshishShelar Shelar Ashish • Email: bjpbandrawest@gmail.com

# शुभसंदेश



मंत्री
कौशल्य, रोजगार, उद्योजकता
व नाविन्यता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

0 5 SEP 2024

## शुभेच्छा संदेश

बोरिवली विधानसभा मतदार संघात आपण मागील अनेक वर्षापासून विकासात्मक कामे करत आहात, आपल्या प्रयत्नांचे सातत्य आणि जनतेतून मिळणारा प्रतिसाद यामुळे बोरीवली मतदार संघ हा प्रगतीपथाकडे वाटचाल करत आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे आपण आपला वार्षिक कार्य अहवाल प्रसिद्ध करीत आहात, याबाबत आपले प्रथमत: अभिनंदन..! आपण केलेली कामे जनतेपर्यंत पोहोचविणे व जनतेतून येणाऱ्या सूचना व मार्गदर्शन यानुसार कामे करीत राहणे, हे आपल्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य राहिले आहे.

आपल्या पुढील वाटचालीसाठी मनस्वी, हार्दिक हार्दिक शुभेच्छा...!

मंगल प्रभात लोढा
( मंगलप्रभात लोढा )

प्रति,
मा.आ.श्री.सुनील दत्तात्रय राणे,.
बोरिवली विधानसभा मतदार संघ,
मुंबई.

कार्यालय पत्ता : दालन क्र. २०२, २ रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी क्र. : ०२२ २२०० २५३०८/२२०२ ४५९२, ई-मेल : min.skills@maharashtra.gov.in



गोपाल शेट्टी
जनसेवक

दिनांक : २६/०९/२०२४

प्रति ,
श्री सुनिल राणे जी
आमदार,
बोरीवली विधानसभा

महोदय ,

सर्वप्रथम आपल्या आमदार म्हणुन सन २०१९ ते सन २०२४ च्या अहवालाच्या प्रकाशनाबद्दल शुभेच्छा व अभिनंदन. भारतीय जनता पक्षाच्या परंपरेस अनुसरून आपण आपला सेवा वृत्तांत सादर करीत आहात ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे .

महाराष्ट्र शासनामार्फत रेशन कार्ड आधार कार्डास जोडणे, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, दहावी , बारावी , डिप्लोमाधारक, पदवीधर युवकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली मानधन योजना , वयोश्री योजना, महिला सशक्तिकरण योजना, या व अशा अनेक योजना चालु करण्यात आल्या असुन आपल्या मार्फत वावावत शिबिराचे आयोजन करण्यात आले. याचा लाभ गरीब , महिला, बेरोजगारांना , युवकांना, वरीष्ठ नागरीकांना व इतर लाभार्थींना होण्यासाठी प्रयत्न केलेले हे कौतुकास्पद आहे. कोविड काळात व नंतर आपण गरीब रूग्णांना हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळण्यास सहकार्य, गरजु विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत , लसीकरण मोहीम, रक्तदान शिबीर, मोफत आरोग्य शिबीर, अन्नदान वाटप अशा विविध कामामार्फत जनप्रतिनिधींचा धर्म निभावलात. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान स्वच्छता , गोराई गावात गरीबांना घर, मुलींना सायकल वाटप, सहकारी संस्था लादीकरण , खुले सभागृह व इतर अनेक प्रलंबीत कामे आपण मार्गी लावलीत तर काही प्रगतीपथावर आहेत.

आपल्या ह्या आमदार पदाच्या कार्यकाळात आपण अनेक प्रलंबीत कामे मार्गी लावलीत तर काही प्रगतीपथावर आहेत. हे मी जवळून पाहिले आहे. आपल्या पुढील राजकीय व सेवाभावी जिवनात आपणास सुयश चिंतीतो व आपणास अहवालाच्या प्रकाशनाबद्दल मनःपुर्वक शुभेच्छा देतो.

धन्यवाद .

आपला,
गोपाल शेट्टी

कार्यालय - शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर,कांदीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०६७.
फोन : ०२२-२८०८९५६७ * ०२२-२८०११८९२ ई-मेल: helpdeskgopalshetty@gmail.com

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

# मनोगत

भारतीय जनता पार्टीच्या पक्षनेतृत्वाने सन 2019 च्या विधानसभा निवडणुकीत मला मुंबईतील बोरिवली विधानसभा मतदार संघातून उमेदवारी दिली आणि बोरिवलीकर जनतेने माझ्यावर विश्वास ठेवून आमदार म्हणून निवडून दिले. अनेक विकासकामांच्या माध्यमातून जनतेचा विश्वास सार्थ करण्याचा मी गेली चार वर्षे प्रामाणिक प्रयत्न करत आहे. जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्याकरिता निवडून आल्यानंतर सातत्याने मतदारसंघाचा दौरा करून बोरिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी अविरत प्रयत्न चालू आहे.

बोरिवली मतदारसंघातील विकासकार्यात सुरक्षा भिंत बांधणी, मैदानांचा विकास व अनेक ठिकाणी लादीकरण केले व सुरु आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अभियानांतर्गत मुलींना सायकल व लॅपटॉपचे वाटप करून बँकेत खाते उघडण्यात आले. वेगवेगळ्या भागांचे व चौकाचे सुशोभीकरण, रस्त्यांचे डांबरीकरण व कॉंक्रिटिकरण केले व अनेक कामे सुरु आहेत, नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिरांचे सतत आयोजन, आदीवासी बांधवाना पक्की घरे बांधून दिली, विभागातील महिलांच्या सबलीकरणाच्या हेतूने शिलाई मशिन व घरघंटीचे वाटप, विभागातील झोपडपट्टीतील (एस.आर.ए) समस्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्न केले तसेच बोरीवलीमध्ये विविध खेळाची मैदाने विकसित केली, खेल महोत्सव, खादी महोत्सव, नवरात्री उत्सव यासहीत दहीहंडी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. गोराई व चारकोप येथील जुनी पाण्याची पाईप लाईन बदलण्यात यावी तसेच सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत करण्याबाबत निधी उपलब्ध व्हावा, बोरिवलीत सुपरस्पेश्यालिटी हॉस्पिटल व्हावे, अशा प्रकारच्या विविध मागण्या बोरिवलीच्या विकासासाठी विधिमंडळ अधिवेशनात सातत्याने केल्या. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी अनेक लढे उभारले. सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे हटवली. महात्मा फुले नगर येथील पात्र झोपडी धारकांना घरे मिळावी हा प्रामाणिक प्रयत्न यशस्वी करून त्यांना घरे मिळवून दिली.

बोरीवली मध्ये प्रथमच संरक्षण दलातील शस्त्रास्त्रांचे प्रदर्शनाचे आयोजन केले. युध्दात शहीद झालेल्या शूर जवानांच्या मुलींसाठी अथर्व फाउंडेशनच्या वतीने लॅपटॉप चे देशभर मोफत वाटप करण्यात येत आहे तसेच सिक्कीम, मणिपूर, नागालँड, आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम आणि त्रिपुरा येथील पूर्व सैनिक आणि शहीद सैनिकांच्या कुटुंबियांच्या स्वास्थ्य कल्याणासाठी ८ रुग्णवाहिका भेट देण्यात आल्या आहेत.

हे काम करण्यासाठी मला भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व जनतेने दिलेली साथ मला मोलाची वाटते. आणि यापुढेही करतील, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो आणि माझ्या लेखणीला पूर्णविराम देतो.

धन्यवाद!

जय हिंद !

आपला,

**सुनिल दत्तात्रय राणे**
आमदार, बोरिवली विधानसभा

**भारतीय जनता पार्टी**
**बोरीवली विधानसभा**



## देश विविध रंगांचा, विविध ढंगांचा, देश विविधता जपणाऱ्या एकात्मतेचा !

गतवर्षी आपण भारतवासियांनी देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. देशप्रेमाचे हे स्फुल्लिंग जनतेच्या मनात सतत चेतवण्यासाठी प्रजासत्ताक दिनी बोरीवली (प.) येथे विविध ठिकाणी देशवासियांसोबत ध्वजारोहण केले.



















गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

# मजबूत ज्यांचे हात, जे करी शत्रूवर मात |
# कर्तव्य हे तुमचे-आमचे, चला देऊ त्यांना साथ ||



## "एक हात आपल्या रक्षणकर्त्यांसाठी"

अथर्व फाऊंडेशन तर्फे मेघालय, मिझोरम व त्रिपुरा येथील राज्य सैनिक बोर्ड व माजी सैनिकांसाठी तीन रुग्णवाहिका मा. महामहिम राज्यपाल श्री. रमेशजी बैस जी व उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस जी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आल्या. तसेच यापूर्वी सिक्कीम, मणिपूर, नागालँड, आसाम आणि अरुणाचल प्रदेश राज्यातील राज्य सैनिक बोर्ड्सना माजी सैनिक व शहीद जवानांच्या कुटुंब स्वास्थ्यासाठी रुग्णवाहिका अर्पण करण्यात आल्या आहेत.तसेच संरक्षण दलातील शहीद सैनिकांच्या मुलींना संरक्षण दलातील अधिकाऱ्यांच्या तसेच मान्यवरांच्या हस्ते लॅपटॉपचे वितरण करण्यात आले.







मिझोरम | मेघालय | त्रिपुरा









## कारगिल विजय दिवस...!

1999 मध्ये लडाखमधील उत्तर कारगिल जिल्ह्यातील पर्वत शिखरांवर पाकिस्तानी सैन्याला त्यांच्या ताब्यातील भारतीय स्थानांवरुन हुसकावून लावण्यासाठी भारताने कारगिल युद्धात मोठा विजय मिळवला. या विजयाची 25वी वर्षगांठ साजरी करण्यासाठी "कारगिल विजय दिवस" निमित्त शूरवीरांची कथा, कारगिल युद्धातील सैनिकांचा आणि शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम अथर्व फाउंडेशन द्वारे आयोजित करण्यात आला.














## सुरक्षा तुमची, जबाबदारी आमची !

मतदार संघातील जनतेची सुरक्षा अत्यंत महत्वाची आहे. यासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासनासोबत नियमित बैठका घेऊन प्रत्यक्ष परिसरांमध्ये फिरून रात्र गस्तींचा आढावा घेतला. डिजिटल युगामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज बनण्याकरीता बोरीवली (प.) येथील बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे कार्यालयात कामकाजासाठी 2 संगणक व 2 प्रिंटरचे वाटप करण्यात आले. बोरीवली पश्चीम मधील पोलीस स्थानकात आमदार विकास निधीतून सुरु होणाऱ्या सुशोभीकरण प्रकल्पाच्या कामाची योजना पोलीस ठाण्यातील संबंधित वरिष्ठ अधिकारी त्यांच्याशी चर्चा, बोरिवली पश्चिम रेल्वे स्थानकासमोर वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना येणाऱ्या समस्यांबाबत वाहतूक पोलिसांमार्फत स्पेशल ड्राईव्ह त्याचबरोबर वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांसोबत चर्चा तसेच ओम ज्वेलर्स ते बोरिवली स्टेशन हा रोड, जो वर्षानुवर्षे बंद होता, खुला करण्यात आला.




















गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

# वचनपूर्ती

## बोरीवली ते कोकण रेल्वे सुरु !

सततचा पाठपुरावा व आग्रह यानंतर कोकणवासीयांच्या सेवेसाठी बोरिवली मार्गे कोकणात जाण्यासाठी आठवड्यातून दोन दिवस रेल्वे सेवा सुरु...
उत्तर मुंबईचे खासदार व केंद्रीय मंत्री मा.पियुष गोयल यांचे मन:पूर्वक धन्यवाद !













गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प-५**

Prime Projects In The Development Of

*Generation-Next Borivali*

बोरिवलीच्या विकासातील प्रमुख प्रकल्प







## जैव विविधतेने नटलेली माझी बोरीवली...

# माझे कांदळवन !

गर्द वनराई, जंगले हि पृथ्वीची फुफ्फुसे आहेत. वातावरणाचा समतोल राखण्याचे कार्य हि घनदाट जंगले करतात. मुंबईच्या समुद्र व खाडी किनारी नैसर्गिकरित्या तयार झालेली हि कांदळवने... त्यांचे निसर्ग सौंदर्य...जैव विविधता यांनी परिपूर्ण असलेली याची खरी ओळख लोकांना व्हावी व यातून पर्यटनाचा आनंद घेता यावा यासाठी उभारण्यात येत असलेला मॅन्ग्रोव्ह पार्क म्हणजेच कांदळवन प्रकल्प. कार्यकर्त्यांसमवेत या प्रकल्पाची पाहणी केली. लवकरच हा प्रकल्प नागरिकांच्या सेवेत उपलब्ध होणार आहे.













## हा प्रकल्प पूर्णत्वास आल्यानंतरचे दृश्य (Architectural View)









गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

# आरजी-1 आणि आरजी-2 उद्यान, योगी नगर, बोरिवली (प), नूतनीकरण व सुशोभीकरण

BEFORE / पूर्वी





BEFORE / पूर्वी





**गरज बदलत्या काळाची ....**
**होईल पहाट नव्या युगाची !**
मतदार संघाच्या विकासात कल्पकता
व नाविन्यपूर्णतेची कास धरून
अंगीकारलेली पूर्ण झालेली,
सुरु असलेली
व प्रस्तावित कामे...

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)







हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)









## शिवसेवा क्रीडा संकुल (स्पोर्टस् कॉम्प्लेक्स) सुशोभीकरण, बोरीवली (पूर्व)

**BEFORE / पूर्वी**




**हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)**






या प्रकल्पाचे प्रगतीपथावर असलेले काम (Ongoing work)

## प्रगती मैदान -म्हाडा इमारती जवळ, न्यू लिंक रोड, कांदिवली (प) नूतनीकरण व सुशोभीकरण

**BEFORE / पूर्वी**




**हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)**





गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प-५**

## शिवसृष्टी इमारती समोरील मैदान -योगा पार्क, नूतनीकरण व सुशोभीकरण, पंपिंग स्टेशन जवळ, न्यू लिंक रोड, बोरिवली (प)

**BEFORE / पूर्वी**




**हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)**





## महात्मा फुले नगर, एल.टी.रोड रस्त्याचे सुशोभीकरण, बोरिवली (प)

**BEFORE / पूर्वी**




**हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)**





गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

# भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम मनोरंजन उद्यान, बोरीवली (प) नूतनीकरण व सुशोभीकरण

**BEFORE / पूर्वी**







**हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)**









गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

# तलाव, मैदान नूतनीकरण व सुशोभीकरण -जुनी एम.एच.बी कॉलनी, गोराई रोड, बोरिवली (प)

## BEFORE / पूर्वी





## या प्रकल्पाचे प्रगतीपथावर असलेले काम ( Ongoing work)






## हा प्रकल्प पूर्णत्वास आल्यानंतरचे दृश्य (Architectural View)






## स्विमिंग पुल (जलतरण तलाव) शिंपोली व्हिलेज, बोरिवली (प)

**BEFORE / पूर्वी**







**हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)**





## गायत्री अवेन्यू व वसंत स्मृती गृहनिर्माण सोसायटी मधील उद्यानाचे सुशोभीकरण

**BEFORE / पूर्वी**









**हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)**











गतीमान विकासाचा

कार्यसंकल्प-५

## पाचघर-उद्यानाचे नूतनीकरण व सुशोभीकरण, मनोरी गाव

BEFORE / पूर्वी





हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे दृश्य (Actual View)













## गोराई-2, उद्यानाचे नूतनीकरण व सुशोभीकरण, बोरिवली (प)

BEFORE / पूर्वी







प्रगतीपथावर असलेले काम / Ongoing work





हा प्रकल्प पूर्णत्वास आल्यानंतरचे दृश्य (Architectural View)







गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प-५**

## कर्तव्याला जोड इच्छाशक्तीची... तेथे गंगा वाहते विकासाची!

नागरिकांच्या मुलभूत गरजा म्हणजे पाणी, वीज, रस्ते, शौचालय. झोपडपट्टी विभागातील याच गरजा नागरिकांना तीव्रतेने जाणवतात याच बरोबर येथील अरुंद गल्ल्या व सांडपाण्याचा निचरा हा महत्वाचा प्रश्न याकरिता अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये तसेच झोपडपट्ट्यांमध्ये अरुंद रस्त्यांवर लादिकरणाचे व सांडपाण्याचा निचरा होण्याकरिता पावसाळी गटारे बांधली. लादिकरणामुळे वस्तीची शोभा वाढली व स्वच्छता निदर्शनास आली.








**जलद सोयी... तत्काळ सुविधा
याच जनसेवेच्या यज्ञकुंडातील समिधा !**








**मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लादीकरण व सीसीटीव्ही बसविणे इ. विकासकामे केली.**












आमदार विकासनिधीतून लोकाग्रहास्तव सोसायटी क्र.827 ते 830 या मार्गामध्ये, चारकोप सेक्टर 8, कांदिवली (प.), क्यासा बेला आणि सीवूड इमारत जवळ, बस डेपोच्या मागे, गोराई-3, बोरीवली (प.), गोराई-2, आरएससी 50, गोराई चर्च ते गोराई जेट्टी जंक्शन, बोरीवली (प.)

**येथे CCTV CAMERA बसविण्यात आलेले आहेत.**

## मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लादीकरण, बेंचेस, कचऱ्याचे डब्बे, शौचालय, रस्ते, स्मशानभूमीचे दुरुस्तीकरण इ. विकासकामे केली.


















स्मशानभूमीचे दुरुस्तीकरण









राजेंद्र नगर, बोरीवली (पूर्व) रस्त्याचे काम

## मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लहान मुलांसाठी खेळाच्या सामग्री बसविल्या.











गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प-५

## मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लादीकरण, बेंचेस, विकासकामे केली.







बोरीवली पश्चिम रेल्वे स्थानक येथे सुशोभीकरण व सौंदर्यीकरण










साई मानसरोवर बिल्डींग गार्डन, सत्या नगर येथे गार्डनचे सुशोभीकरण




गोराई प्रियदर्शनी को.ऑप.हौ.सो. येथील संरक्षण भिंतील जाळी लावण्याचे काम.

# आमदार श्री.सुनील राणे यांच्या विकासनिधीतून झालेली कामे 2023-24

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

- डिमेलो हाऊस, खजुरवाडी, गोराई गांव येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- ओम फॅमिली चायनिज, भंडारवाडा समोर, गोराई गांव येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अलेक्स वसईकर हाऊस, लोअर कोळीवाडा, गोराई गांवयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- मायकेल हाऊस आणि चर्च, गोराई गांवयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- इनास झोलार हाऊस, अपर कोळीवाडा, गोराई गांवयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- शेफाली गावठण, गोराई गांवयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- मोकाचीवाडी, बोटवाला, गोराई गांवयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- रत्नाबाई चाळ, बोरिवलीयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- भिमनगर, गल्ली नं. 1, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- भिमनगर गल्ली नं. 3, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- जेष्ठालय, टिपीएस रोड, शिंपोली, बोरिवली (प)येथे लादीकरण
- सोमेश्वर सोसायटी, एसआरए, बोरिवली (पू)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- पॅराडाईज हाईटस्, बोरिवली (प)येथे लहानमुलांची खेळणी आणी सुशोभिकरण
- शिवाजी नगर, अटस स्मृती, शिंपोली येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- जयराज नगर येथील रस्त्याचे काँक्रीटीकरण
- चिकूवाडी, जॉगर्सपार्क येथील रस्त्याचे काँक्रीटीकरण
- रामबाग लेन, एस.व्ही.रोड येथील रस्त्याचे काँक्रीटीकरण
- मोती यादव चाळ, रामनगर, सोनी टॉवर,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- इगल गार्डन आर जी 2, योगी नगरयेथे सौंदर्यीकरण
- शिवालीक टॉवर, 90 फीट रोड, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- परेरा सोसायटी, पोयसरयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- कलावती आई सत्संग भवन, टाईम स्क्वेअर जवळ,येथे सुशोभिकरण, सुरक्षा भिंत
- सिद्धी विनायक प्लाझा ग्राऊंड, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- प्रार्थना एसआरएसोसायटी, मुळजी नगर, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- ·यशोमंदिर सोसायटी, प्लॉट नं. 68, गोराई येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- पुजा सोसायटी, प्लॉट नं.116 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- ओमकार सोसायटी, न्यू एमएचबीयेथे लादीकरण
- शक्तीधाम सोसायटी, 257 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- दिप मंदिर, बिल्डिंग नं. 24, जुनी एम एच बी कॉलनी,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- हिमकन्या बिल्डिंग नं. 25, जुनी एम एच बी कॉलनी,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सिद्धेश्वरसोसायटी, प्लॉट नं. 125, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साईदर्शनसोसायटी, प्लॉट नं. 98, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- वृंदावन सोसायटी, प्लॉट नं. 330, चारकोपयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- आरेश्वर सोसायटी, प्लॉट नं. 321, चारकोपयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अमर ज्योतीसोसायटी, प्लॉट नं. 558, चारकोपयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- संस्कृतीसोसायटी, फेस 1 - 1 ते 4, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- संस्कृती - 5 ते 9येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साई श्रद्धा, प्लॉट नं. 270,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अपेक्षासोसायटी, प्लॉट नं. 158येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- रायगड एसआरए, राजेंद्र नगर,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- स्नेह सागर सोसायटी, पोयसरयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- चकोर सोसासटी, प्लॉट नं. 244, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- मित्रधाम सोसायटी, प्लॉट नं. 266, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- शिवसागर सोसायटी, प्लॉट नं. 79, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- नांगरवाला चाळ, बोरिवली (पूर्व)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- बाळू वॉचमन चाळ, बोरिवली (पूर्व)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- नालंदा शाळे जवळ, बोरिवली (पूर्व)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- दत्तात्रय सोसायटी,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- डॉ. आंबेडकर नगरसोसायटी,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अभिनंदन सोसायटी, प्लॉट नं. 252, गोराई 2 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- एकलव्य सोसायटी, प्लॉट नं. 249, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सौरभ सोसायटी, प्लॉट नं. 259, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- उपकार सोसायटी, प्लॉट नं. 261, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- जय संतोषी सोसायटी, प्लॉट नं. 262, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- दिप सोसायटी, प्लॉट नं. 15, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- मनोरथ सोसायटी, प्लॉट नं. 123, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साईसिद्धी सोसायटी, प्लॉट नं. 122, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- वैभव सोसायटी, प्लॉट नं. 237, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- त्रंबकेश्वर सोसायटी, प्लॉट नं. 188, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अरूणोदय सोसायटी, प्लॉट नं. 185, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सिद्धीविनायक सोसायटी, प्लॉट नं. 734, चारकोपयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- श्री दत्तगुरु सोसायटी, प्लॉट नं. 533, सेक्टर 5येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- चंद्रकिरण सोसायटी, प्लॉट नं. 551, सेक्टर 5येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- वराडीपाडा मंदिराजवळ, राजेंद्रनगरयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- भाटीया चाळ 1, वेलकम हॉटेल जवळयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- भाटीया चाळ 2, वेलकम हॉटेल जवळयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अजित नगरसोसायटी, शिंपोलीयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- वृंदावन सोसायटी, साईबाबा नगरयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अभिनंदन सोसायटी, प्लॉट नं. 40, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- वटवृक्ष सोसायटी, प्लॉट नं. 27, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- दर्शन सोसायटी, प्लॉट नं. 429, चारकोपयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सागर निवास सोसायटी, प्लॉट नं. 737, चारकोपयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अमरदिपसोसायटी, प्लॉट नं. 714, चारकोपयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- राजसागरसोसायटी,प्लॉट नं. 112, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साईसिद्धी सोसायटी, प्लॉट नं. 26, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गुलमोहर सोसायटी, प्लॉट नं. 152, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अक्षय सोसायटी, प्लॉट नं. 157, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

# आमदार श्री.सुनील राणे यांच्या विकासनिधीतून झालेली कामे 2023-24

- विसावा सोसायटी प्लॉट नं. 229, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- क्षितीजसोसायटी, प्लॉट नं. 211, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सरोवर सोसायटी, प्लॉट नं. 232, सेक्टर 5येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- निलधारासोसायटी, प्लॉट नं. 512, सेक्टर 5येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साई सदनसोसायटी, प्लॉट नं. 721, सेक्टर 7येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- समर्थ सोसायटी,प्लॉट नं. 275, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- जयश्री सोसायटी, प्लॉट नं. 187, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- कॉर्नर सोसायटी, प्लॉट नं. 184, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गोराई स्मशानभूमी जवळील बीयुडीपी स्मॉल, आर.एस.सी. 46, गोराई 2 येथे सुशोभिकरण तसेच लहान मुलांची खेळणी
- गोराई स्मशानभूमी जवळील बीयुडीपी स्मॉल, आर.एस.सी. 46, गोराई 2 येथे सुशोभिकरण
- दत्ता चाळ, कार्टर 4, जैनुद्दीन कंपाऊंड, बोरिवली (पूर्व) येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- खोडा भगत चाळ, कार्टर 4, बोरिवली (पूर्व) येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- **2024-2025**
- शिवसेवा क्रिडा संकुल, राजेंद्र नगर, बोरिवली (पूर्व)येथे स्पोर्टस् कॉम्पलेक्स
- अभिलाषासोसायटी,, प्लॉट नं. 217, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- प्रथमेश सोसायटी, प्लॉट नं. 720, चारकोपयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सागरसोसायटी, प्लॉट नं. 88, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- शुभदा दर्शन आणि श्री कल्पवृक्षसोसायटी, एम.एच.बी. कॉलनी, बोरिवली (प)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साई सर्विस सेंटर - एकता भूमी, गार्डन 3, दत्तपाडा, बोरिवली (पू)येथे रस्त्याचे डांबरीकरण
- रामशेरी पाण्डे चाळ, कार्टर 3, बोरिवली (पू)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- कुलदीप सोसायटी, राजेंद्र नगर, बोरिवली (पूर्व)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गावदेवी मंदिर, ठाकूर कॉम्पलेक्स, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- मस्जिद गल्ली, राजेंद्र नगर, बोरिवली (पू)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- ओमकार सोसायटी, प्लॉट नं. 119,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- संत ज्ञानेश्वरसोसायटी, प्लॉट नं. 208,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- वर्षा सोसायटी, प्लॉट नं. 281,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साई कुटीर सोसायटी, प्लॉट नं.165 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- यशोधनसोसायटी, प्लॉट नं. 186,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- श्री साई सिद्धीसोसायटी, प्लॉट नं. 124,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- ममता सोसायटी, प्लॉट नं. 159 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- धनश्री सोसायटी, प्लॉट नं. 155 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- शिव शक्तीसोसायटी, प्लॉट नं. 139,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- किनारासोसायटी, प्लॉट नं. 203येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- जय भिम सेवा संघ, भिमनगर गल्ली नं. 4, गोराई,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साईकृपा वेल्फेअर सोसायटी, भिमनगर गल्ली नं. 1, गोराई,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सिद्धीविनायक सोसायटी, भिमनगर गल्ली नं. 1, गोराई,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- माधवी सोसायटी, भिमनगर गल्ली नं. 5, गोराई,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- बालाजी सेवा सोसायटी, भिमनगर गल्ली नं. 2, गोराई,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साईराज सोसायटी, भिमनगर गल्ली नं. 5, गोराई,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गणमुर्ती सोसायटी, प्लॉट नं. 109, गोराई, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सुमंगल सोसायटी, प्लॉट नं.50, गोराई 1, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- संजिवन सोसायटी, प्लॉट नं.148येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- आकाश सोसायटी, प्लॉट नं.191येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- शलाका सोसायटी, प्लॉट नं. 554, सेक्टर 5, चारकोप,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- भाग्यलक्ष्मी सोसायटी, प्लॉट नं. 550, सेक्टर 5, चारकोप येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- जयभवानी सोसायटी, प्लॉट नं. 333, सेक्टर 3, चारकोप येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम मैदान, साईबाबा नगर, बोरिवली (प)येथे क्रिडा संकुल
- महात्मा फुले नगर, पंगत हॉटेल समोर, गोराई रोड, बोरिवली (प) येथे रस्त्याचे सुशोभिकरण
- हनुमान मंदिर, ट्रान्झीट कॅम्प, बोरिवली (पूर्व) येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- मिश्रा चाळ, जय जवान नगर, बोरिवली (पूर्व), येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साई मंदिर, जय जवान नगर, बोरिवली (पूर्व) येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- श्री मित्र मंडळ, तोरण बिल्डिंग, बोरिवली (पूर्व) येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- चाचा नेहरू गार्डन शेजारी, साईबाबा मंदिर रोड, बोरिवली (प)येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सत्यानगर नाला, महावीर नगर, लिंक रोड, बोरिवली (प)येथे संरक्षण भिंत
- आदर्श सेवा संघ, भिम नगर गल्ली नं. 1, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साई धाम नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, चारकोपयेथे शौचालय व ड्रेनेज लाईन
- सहयोग सोसायटी, प्लॉट नं. 16 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अष्टभूजा सोसायटी, प्लॉट नं.142 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- संगम सोसायटी, प्लॉट नं. 202 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- औदुंबर सोसायटी, प्लॉट नं. 221 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साफल्यसोसायटी, प्लॉट नं. 195 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- संकल्प सोसायटी, प्लॉट नं. 263 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- रत्नगंगा सोसायटी, मल्हार राव कुलकर्णी येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- ओमकार (ए) बिल्डिंग पद्मनगर, चिकूवाडी,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गोराई अलकासोसायटी,गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गणेश दर्शनसोसायटी, प्लॉट नं. 543, चारकोप सेक्टर 5येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- शिवशांतीसोसायटी,प्लॉट नं. 367, चारकोप सेक्टर 3येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सत्यमसोसायटी, प्लॉट नं.325, चारकोप सेक्टर 3येथे लादीकरण व

# आमदार श्री.सुनील राणे यांच्या विकासनिधीतून झालेली कामे 2023-24

ड्रेनेज लाईन

- संघमित्रसोसायटी, प्लॉट नं. 95, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सुयोगसोसायटी, प्लॉट नं. 96, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- चोलगे वाडीसोसायटी, कस्तुरबा रोड नं. 2,येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- दत्ता चाळसोसायटी, जैनुद्दीन कंपाऊंड, कस्तुरबा रोड नं 3येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- स्नेह सुगंधसोसायटी,प्लॉट नं. 92, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- माऊलीसोसायटी, प्लॉट नं.611, सेक्टर 6येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- अर्चनासोसायटी, प्लॉट नं. 559, सेक्टर 5येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सृष्टीसोसायटी, प्लॉट नं.219, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- जयदिपसोसायटी, प्लॉट नं. 210, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सहवाससोसायटी, प्लॉट नं. 251, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- उज्वलसोसायटी,  प्लॉट नं. 265, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साईनाथसोसायटी, प्लॉट नं. 141, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गोराई मानस बिल्डिंग (आमदार जनसंपर्क कार्यालय), गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गोराई मंगलमुर्ती बिल्डिंग, मॅक्स मॉल समोर, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साई श्रवणसोसायटी, चिंतामणी उद्यान, शिंपोलीयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सागरसोसायटी, प्लॉट नं.78, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- केसर रेसिडेन्सी बिल्डिंग, सेक्टर 3, चारकोप नोबल मेडीकल समोर येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- गोल्डन नेस्ट बिल्डिंग, ए,बी,सी, सेक्टर 8 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- प्लॉट नं. 93, बाभई, गोराई 1, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- मधुवन गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं. 724, सेक्टर 7 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- लता कुंजसोसायटी, प्लॉट नं.169, गोराई 2 येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- विश्वासोसायटी,प्लॉट नं.608, सेक्टर 6, चारकोप, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- साईछायासोसायटी,प्लॉट नं.86, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- सावलीसोसायटी, प्लॉट नं.72, गोराई 1येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- आशिर्वादसोसायटी, प्लॉट नं. 22, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- इंद्रप्रस्तसोसायटी, प्लॉट नं. 258, गोराई 2येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- प्रथमेश पॅराडाईज बिल्डिंग, लिंक रोड शेजारीयेथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- श्वेताली बिल्डिंग, प्लॉट नं. 69, पेप्सी मैदान समोर, येथे लादीकरण व ड्रेनेज लाईन
- एकदंत बिल्डिंग, हॉटेल शेजारी प्लॉट नं. 13, गोराई 2, आर.एस.सी. 19

## जनसेवेची पोचपावती


The Madhu Milan Co-op. Housing Soc. Ltd.


स्वप्नगंधा


श्रीशक्ती को-ऑप. हाऊसिंग सोसायटी मर्यादित


श्री गणेश-साई भक्त मंडळ


श्री दत्तगुरु
को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

# नागरिकांच्या समस्यांचे निवेदन, त्याचे त्वरित निराकरण !









श्री गणेश-साई भक्त मंडळ



गोराई (२) यशस्वी सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित)



श्री साई-दत्त भक्त मंडळ



स्वप्नगंधा



चारकोप (१) कमल-कुंज सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित



श्री दत्तगुरु को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.



चारकोप (१) 'विश्वशांती' को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.

आभार पत्र



YOGI NAGAR HOUSING SOCIETIES' ASSOCIATION



Letter of Gratitude



# प्रशासकीय चर्चेतून प्रश्नांचा पाठपुरावा

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

निवेदने आल्यावर त्यातील प्रश्न समजून ते संबंधित प्रशासकिय विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून सोडवण्याचे काम केले जाते.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपयुक्तमंडळसात डॉ.भाग्यश्री कापसे, सहाय्यक आयुक्त आर/मध्य संध्या नांदेडकर तसेच विविध विभागातील अधिकारी यांची भेट घेऊन, बोरिवलीतील विविध विषयांवर सकारात्मक चर्चा केली.



केंद्रीय मंत्री तसेच उत्तर मुंबईचे खासदार श्री.पीयूष गोयलजी यांच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिका मुख्यालयात उत्तर मुंबईतील विविध प्रलंबित विषयांबाबत चर्चा केली.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहायक आयुक्त संध्या नांदेडकर यांच्या दालनात बोरीवलीतील प्रस्तावित आणि प्रलंबित प्रकल्पांबाबत तसेच विविध विषयांवर सकारात्मकचर्चा केली.



बोरिवली मतदार संघातील नागरिकांना होणाऱ्या समस्यां संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका आर मध्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती संध्या नांदेडकर तसेच संबंधित अधिकाऱ्यांसह चर्चा



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/सेंट्रल वॉर्डमध्ये सहाय्यक आयुक्त संध्या नांदेडकर यांच्या दालनात बोरिवलीतील विविध विषयांवर बैठक.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्ता आर मध्य विभाग संध्या नांदेडकर यांच्या दालनात झालेल्या बैठकीत बोरिवली विधानसभा क्षेत्रातील विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली



सातारा जिल्ह्यातील गिरणी कामगार व त्यांच्या वारसांची पात्रता निश्चित करण्यासाठी, मा.आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पुढाकाराने स्व.यशवंतराव चव्हाण सभागृह, सातारा येथे आयोजित केलेल्या विशेष मेळाव्याला उपस्थिती दर्शविली व मार्गदर्शन केले.



गिरणी कामगारांना ऑनलाईन प्रक्रियेने फॉर्म भरण्यास होत असलेल्या त्रासासंबंधित, म्हाडाचे अधिकारी तसेच कामगार उपायुक्त व तांत्रिक विभागाचे अधिकारी यांच्या सोबत बैठक घेऊन सकारात्मक चर्चा.



कामगार आयुक्त श्री.सतीश देशमुख यांच्या दालनात गिरणी कामगारांच्या पात्रता संबंधित आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस उपस्थित राहिलो. या प्रसंगी म्हाडा अधिकाऱ्यांसमवेत गिरणी कामगारांच्या पात्रता संबंधित सकारात्मक चर्चा



गृहनिर्माण मंत्री मा.श्री अतुल सावे व म्हाडाचे अधिकारी यांच्यासोबत बैठक...



बृहन्मुंबई महानगरपालिका आर/मध्य विभाग सहाय्यक आयुक्त संध्या नांदेडकर यांच्या दालनात योगी नगर येथील नागरिकांना होणाऱ्या पाण्याच्या समस्येबाबत चर्चा करण्यात आली.




बोरिवली जनसंपर्क कार्यालयात पदवीधर मतदारसंघातील मुंबईचे उमेदवार श्री. किरण शेलार यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांची बैठक.

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५





## एक तारीख, एक तास...
लावू कचऱ्याची विल्हेवाट !

## माझी माती, माझा देश...
वृक्षारोपण करु आधी !

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

महात्मा गांधीजी जयंती निमित्त स्वच्छता अभियानांतर्गत आयोजित “एक तारीख, एक तास” या उपक्रमात उत्स्फूर्तपणे स्वच्छता अभियानाची सुरुवात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह केली. "स्वच्छ बोरीवली हरित बोरीवली" या मंत्राचे पालन करून भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांना आदरांजली वाहिली तसेच "माझी माती, माझा देश" अभियानांतर्गत वृक्षारोपण केले.























**झाडे लावू, झाडे जगवू!** बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये सहा महिने पुर्वतयारी करून वृक्षरोपण केले व हा उद्यानाचा भाग आता मेन्टेनन्स करणार आहे.

## वर्षानुवर्षे मनाच्या एका कोपऱ्यात असणारा ज्वलंत विषय म्हणजे "गिरणी कामगार"!

गिरणी कामगार घरांसाठीच्या समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठीच्या कामाला गती दिली आणि या ऐतिहासिक निर्णयाचा याची देही याची डोळा मला साक्षीदार आणि महत्वाचा भाग होता आले याचा मला सार्थ अभिमान आहे. गिरणी कामगारांच्या घरांच्या चाव्या देण्यासंदर्भात झालेल्या या सुवर्ण निर्णयानंतर, गिरणी कामगारांना महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे व मा. उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस व मा.उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या हस्ते चाव्या सुपूर्त करण्यात आल्या. या गिरणी कामगारांच्या चेहऱ्यावरील समाधान मन दिपवणारे होते. तसेच कोल्हापूर, सातारा व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गिरणी कामगार व त्यांच्या वारसांना घरे मिळण्यासाठीची पात्रता निश्चित करण्यासाठी आयोजित केलेल्या महामेळाव्यात गिरणी कामगारांना व त्यांच्या वारसांना संबोधित केले तसेच त्यांना पात्रतेसंबंधीत मार्गदर्शन केले. कोन, पनवेल येथील गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रत्यक्ष स्थळी संबंधित अधिकाऱ्यांना सोबत वेळोवेळी भेट व कामाचा आढावा घेतला.






















सातारा आणि सिंधुदुर्ग येथे गिरणी कामगार मेळावा.

गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प-५**



## काळजी ज्येष्ठांची...
## ओळख संस्काराची !

ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजातील आदर्श असतात. गत आयुष्यातील त्यांचे अनुभव हे आपल्यासाठी मार्गदर्शक असतात. शासनाने ज्येष्ठ नागरिकांना अनेक सोयी व सवलती दिल्या आहेत. त्या मिळवण्यासाठी आवश्यक असलेले ओळखपत्र म्हणजे ज्येष्ठ नागरिक कार्ड. बोरीवली मतदार संघातील ज्येष्ठ नागरिकांना विनामुल्य सदर ओळखपत्राचे वितरण करण्यात आले. या वडिलधाऱ्या नागरिकांचे आशीर्वाद सामाजिक जीवनात काम करताना खूपच प्रेरणादायी ठरतात.

















## द्यावे जनतेला, असेल जे आवश्यक समाजकार्य असावे सर्वसमावेशक !

ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजातील आदर्श असतात. गत आयुष्यातील त्यांचे अनुभव हे आपल्यासाठी मार्गदर्शक असतात. शासनाने ज्येष्ठ नागरिकांना अनेक सोयी व सवलती दिल्या आहेत. त्या मिळवण्यासाठी आवश्यक असलेले ओळखपत्र म्हणजे ज्येष्ठ नागरिक कार्ड. बोरीवली मतदार संघातील ज्येष्ठ नागरिकांना विनामुल्य सदर ओळखपत्राचे वितरण करण्यात आले.























## आरोग्य सेवा सदासर्वदा, हीच आमची धनसंपदा !

लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असताना जनतेच्या आरोग्याविषयी दक्ष राहणे आवश्यक असते. माजी पंतप्रधान, भारतरत्न, स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयीजी यांच्या जयंती दिनानिमित्त सुशासन दिवस साजरा केला. या अनुषंगाने प्रभागातील विविध ठिकाणी नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करून मोफत चष्मा वितरण केले. या शिबिराचा मतदार संघातील अनेक गरजू नागरिकांनी लाभ घेतला. या शिबिरात तज्ज्ञ नेत्र चिकित्सकांनी गरजूंच्या डोळ्यांवरील उपचार सेवाभावनेने केले. यापुढेही असे उपक्रम सातत्याने सुरू ठेवण्याचा मनोदय आहे.















## सेवेसी करा श्रमंती... मिळेल जो मार्ग
## हवी प्रबळ इच्छाशक्ति... त्यातूनच निघेल मार्ग !

लोकप्रतिनिधी हा कार्यशील व कृतीशील असावा सामाजिक बांधिलकी जपत नागरी हिताची कामे करण्यासोबत नागरिकांचे इतर प्रश्न अडचणी जाणून घेणे महत्वाचे असते, प्रश्न शासन दरबारी मांडून त्या प्रश्नांची उकल आणि पाठपुरावा करून त्या अडचणी प्रशासनाच्या माध्यमातून सोडविण्याला मी प्राधान्य दिले.



















## संकल्प...
## विकसित भारताचा !

उत्तर मुंबई लोकसभा उमेदवार श्री.पियूषजी गोयल यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या बोरिवली मतदारसंघातील भव्य प्रचार रॅलीत सहभाग. मुंबई पदवीधर मतदार संघ निवडणूक 2024 संदर्भात नियोजन करण्यासाठी बोरिवली येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता संवाद बैठकीस उपस्थित राहिलो. यावेळी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार किरण रवींद्र शेलार, भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.





























## लढाऊ बाणा समाजहितासाठी, आंदोलन न्याय्य हक्कांसाठी !

समाजात काम करत असताना लोकप्रतिनिधीला अनेक सामाजिक प्रश्नांसाठी संघर्ष करावा लागतो, कधी गैरव्यवस्थापनाविरोधात, कधी नागरी सुविधांसाठी तर कधी अन्यायाविरोधात आवाज उठवावा लागतो यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलनेही करावी लागतात, मी नेहमीच लोकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्यास मागे पुढे पहिले नाही. लढाऊ बाण्याने अन्यायाविरोधात आवाज उठवून जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो.









# नमो चषक-2024

KHELO INDIA

खेलेगा भारत, तो खिलेगा भारत स्वास्थ भारत, उज्वल भारत.
























## खेळ आनंदाचा... उर्जा तरुणाईची !

क्रिडाविश्व म्हणजे सळसळत्या तरुणाईचे उर्जास्त्रोत, मनाला भुरळ घालणारे क्रीडाप्रकार. त्यातील खेळाडूंचे कौशल्य, कसब सारेच वाखाणण्याजोगे, आपले भविष्य घडविण्याची अनेक सुसंधी या क्रिडाप्रकारातून खेळाडूंना मिळतात. गरज असते ती त्यांच्यातील क्रीडागुणांना उत्तेजन देण्याची, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी सुसज्ज साधन सामग्रीची, याच उद्देशाने बोरीवली स्पोर्टस् अँड कल्चरल असोसिएशनच्या माध्यमातून **नमो** खेल महोत्सव-3 चे आयोजन करण्यात आले, यात कॅरम , मल्लखांब, फुटबॉल, व्हॉलीबॉल, ज्युडो, कराटे, बॉक्सिंग, किकबॉक्सिंग, स्केटिंग, मॅरेथॉन, सायकल मॅरेथॉन अशा विविध खेळांचा समावेश होता. बोरीवली मतदारसंघातील तरुणांसाठी हा क्रिडामहोत्सव वार्षिक आकर्षण आणि आनंदाचा भाग असतो. तसेच स्पर्धेत भाग घेतलेल्या व विजयी स्पर्धकांना बक्षिसे आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. लहान मुलांसाठी क्रिकेटचे प्रशिक्षण आणि मैदानाची सुविधा उपलब्ध करून दिली.

नमो
खेल
महोत्सव
बोरीवली-2024
वर्ष तिसरे
उत्सव परंपरेचा, क्रीडा गुणांचा
आणि नवचैतन्याचा

गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प-५

## “कला, शिल्प और संस्कृति मानव सभ्यता के लिए ऊर्जा प्रवाह कि तरह है और ऊर्जा अमर है ।”





आपल्या भारत देशाला समृध्द अशा सांस्कृतीक नृत्य कलेचा वारसा लाभला आहे. याच कलेचे दर्शन आमच्या बोरिवली आर्ट फेस्टिवलमध्ये घडले. सर्व शास्त्रीय नृत्याचे सादरीकरण, प्रदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रम, जागतिक दर्जाच्या अनेक कलावंतांनी रेखाटलेली चित्र आणि त्यांची कल्पकता अगदी मनात, डोळ्यात साठवाव्या अशा विलक्षण कलाकृती पाहिल्या. या वेळी आर्ट फॅशन शो मध्ये वेगवेगळ्या फॅशन डिझायनर्सनी आपल्या कल्पकतेच्या माध्यमातून निरनिराळ्या कला सादर केल्या.

बोरीवली आर्ट फेस्टिवल
(डिझाईन, क्राफ्ट आणि कल्चर)













Mumbai Police Artist














गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५
बेटी बचाओ,
बेटी पढाओ !
Birthdays
अथर्व
फाउंडेशन

## गुणवत्तापूर्ण शिक्षण...
## विद्यार्थ्यांच्या हक्काचे रक्षण !

भविष्यात जागतिक स्तरावर महागुरु बनणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज भारताचे भाग्यविधाते म्हणजेच आमचे विद्यार्थी. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर यशाची शिखरे काबीज करत देशाला प्रगतीपथावर नेतील हे निर्विवाद सत्य आहे आणि याकरिता विद्यार्थ्यांसाठी जेजे काही करता येईल त्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. यात डिजीटल शिक्षणासाठी टॅब वाटप, आरोग्यासाठी सायकल वाटप, शालेय साहित्याचे वाटप, वह्या वाटप रेनकोट वाटप तसेच आर्थिक सहकार्य केले. "9 वर्षे मोदीजींच्या यशस्वी नेतृत्वाची" या कार्यक्रमा अंतर्गत भारतीय जनता पार्टी बोरिवली विधानसभा आयोजित "बेटी बचाओ, बेटी पढाओ" अभियानांतर्गत मुलींचे बँक खाते सुरु करून त्यांना बँक पासबुक वितरण केले.


















## सन्मान नारीशक्तीचा...

आजच्या युगात महिला, पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने स्वत:चा आगळावेगळा ठसा उमटवत आहेत, असे कोणतेही क्षेत्र नाही जेथे महिलांनी आपली स्वत:ची ओळख निर्माण केलेली नाही. काही क्षेत्रात तर महिलांनी मिळवलेले यश हे नक्कीच प्रेरणादायी आहे आपल्या भारतीय संस्कृतीने नेहमीच महिलांना मानाचा दर्जा दिला आहे. सरकारने देखील महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविल्या. अश्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान व सत्कार करणे हि नेहमीच आमच्यासाठी भूषणावह बाब ठरली आहे.














## महिला सबलीकरण... नारी शक्ती !

बोरिवली विधानसभेतील महिलांकरिता महीला मोर्चा बूथ मार्गदर्शन व प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले. बोरिवली मधील अंगणवाडी सेविकांना "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण" ही योजना बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडून समजावून सांगितली. मथुरा-वृंदावन-दिल्ली तीर्थयात्रेला जाणाऱ्या बोरिवलीतील महिला मोर्चाच्या भगिनींना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. रक्षाबंधन निमित्त बोरिवली विधानसभेतील विविध वाड्र्स मध्ये भेट देऊन भगिनींना रक्षाबंधन निमित्त साडी भेट दिली.




















गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

## या भूमंडळाचे ठायी, धर्म रक्षी ऐसा नाही
## महाराष्ट्र धर्म राखिला काही, तुम्हा कारणे !

इतिहास हा वर्तमानाचा वाटाड्या आहे, त्याचे भान वर्तमानात ठेवले तर भविष्यकाळ आपलाच आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवरायांचे तेजोवलयांकित चरित्र हे यावद्श्चंद्र दिवाकरौ मानवजातीला प्रेरणादायी ठरणारे आहेच त्याचबरोबर हा वैभवशाली इतिहास जपत युवा पिढीत रुजावा, देशप्रेमाने ओतप्रोत ओथंबलेली पिढी निर्माण व्हावी याकरिता महाराष्ट्राच्या या आराध्य दैवताला मानाचा मुजरा करुन नतमस्तक होण्यासाठी शिवजयंती सोहळ्याचे आयोजन केले.













## स्वागत नववर्षाचे !

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा... हिंदू नववर्षाच्या या पहिल्या दिवशी, हिंदू नववर्ष स्वागत समिती व बोरीवलीतील विविध सामाजिक संस्थांनी आयोजीत केलेल्या हिंदू संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शोभायात्रेत सहभागी झालो व सर्व नागरिकांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.











## दहीकाला उत्सव...
## महाराष्ट्राच्या रांगड्या मातीचा, एकात्मतेच्या प्रतिकाचा !

बोरीवली मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य दहीकाला महोत्सवाचे आयोजन करुन आपल्या संस्कृतीचा वारसा जपण्याचा प्रयत्न केला. या दहीकाला उत्सवात केंद्रीय मंत्री, खासदार मा.श्री. पियुषजी गोयल आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची उपस्थिती लाभली तसेच उत्सवास आलेल्या अनेक दहीकाला पथकांना प्रोत्साहन दिले.

## मांगल्याचा सण...
## होता घरी गणरायाचे आगमन !

सर्व सुखांचा कारक आणि सकल विघ्नांचा हारक व अग्रपूजेचा मान असलेल्या गणरायाचे आगमन म्हणजे भाद्रपद वद्य चतुर्थी अर्थात गणेश चतुर्थी या शुभपर्वावर माझ्या निवासस्थानी गणेश मूर्तीची स्थापना करुन आशीर्वाद घेतला तसेच बोरीवली मतदारसंघातील अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेट दिली तसेच घरगुती गणरायांचे दर्शन घेऊन जनताजनार्दनाला उत्तम आरोग्य लाभून सुख, समृद्धीचे पर्व सुरु होवो, अशी गणरायाकडे प्रार्थना केली. बोरिवली विधानसभेतील कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नागरिक यांना गणपती विसर्जनाकरता सदरा भेट दिले.












## या देवी सर्व भूतेषु शक्तीरूपेण संस्थिता | नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम: ||

अश्या या आदिमाया आदिशक्ती जगदंबेचा उत्सव म्हणजे अश्विन शुद्ध प्रतिपदा अर्थात शारदीय नवरात्रोत्सव. या शुभपर्वकाळात बोरीवली (प.) येथे भक्तीरस-सांस्कृतिक कार्यक्रम व नवरात्र उत्सव नऊ दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहावयास मिळाला. भक्तीरस नवरात्री उत्सवात उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी उपस्थिती दर्शविळी. तसेच सुप्रसिद्ध अभिनेत्री व मथुरेच्या खासदार श्रीमती हेमामालिनी यांनी दुर्गा मातेच रूप घेऊन नृत्य विहार कलाकेंद्राद्वारे नृत्य सादर केले.




















गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५




# विधिमंडळात व्यक्त केलेले मत व विविध मागण्या

1. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ सुधारणा विधेयक 2023 अंतर्गत प्रवेशप्रक्रिये संबंधित व मान्यता संबंधित कालमर्यादा ठरवण्याविषयी सूचित केले
2. वर्षाच्या (2023-2024) पुरवणी मागण्या अंतर्गत महसूल व वन विभाग आणि नगरविकास या विभागामधील विविध विषयावर चर्चेत सहभाग घेतला व योग्य उपाययोजना व कार्यवाहीची मागणी केली.
3. एस आर ए प्रकल्पा अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या आणि बांधलेल्या अनेक इमारतींमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजनांचा अभाव यासंबंधित योग्य उपाययोजना व कार्यवाहीची मागणी केली. यावर मा.ना.श्री. अतुल सावे - गृहनिर्माण मंत्री यांनी सकारात्मक उत्तर दिले.
4. विधानसभा विधेयक क्रमांक 52 महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) सुधारणा विधेयक 2023 अंर्तगत आपले विचार मांडले.
5. विधानसभा विधेयक क्रमांक 54 महाराष्ट्र खाजगी विद्यापीठ (स्थापना व विधिनियमन) अंतर्गत आपले विचार मांडले.
6. म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्तावावर आपले मत मांडले.
7. नागपूर येथील महाराष्ट्र विधानसभा हिवाळी अधिवेशन सन 2023 येथे म.वि.स. नियम 292 अन्वये प्रस्तावावर आपले मत मांडले.
8. महाराष्ट्र विधीमंडळ पावसाळी अधिवेशनाच्या (2024) चौथ्या दिवशी लक्षवेधीच्या माध्यमातून अभ्युदय नगर येथील पुनर्विकासाच्या बाबतीत तसेच मुंबईतील म्हाडा वसाहतींच्या भाडेपट्टी नूतनीकरणाच्या धोरणाबाबत व झोपडपट्टी पुनर्वसन योजना विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत ( विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या योजनांचा) प्रश्न उपस्थित केला. यावर मा.ना.श्री. अतुल सावे - गृहनिर्माण मंत्री यांनी याविषयी बैठक आयोजित करून तोडगा काढू असे आश्वासित केले.
9. महाराष्ट्र विधीमंडळ पावसाळी अधिवेशनाच्या (2024) चौथ्या दिवशी लक्षवेधीच्या माध्यमातून मुंबईतील होणारी अनधिकृत बांधकाम, झोपडपट्ट्या, सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे व वन जमिनीवर होणारी भरणी, भूमाफियानमार्फत गिळंकृत होणारे सरकारी भूखंड याबाबत कार्यवाहीकरण्याबाबतचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला.
10. महाराष्ट्र विधीमंडळ पावसाळी अधिवेशन (2024) मध्ये बोरिवली येथील वाढते प्रदूषण विशेषत: रहिवाशी भागातील सिमेंट प्लांट (RMC) व स्मशानभूमीमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणासंबंधी प्रश्न उपस्थित केला.
11. महाराष्ट्र विधीमंडळ पावसाळी अधिवेशन - 2024 च्या सहाव्या दिवशी बोरिवली येथील गोराई भागातील खारफुटी कांदळवन (Mangrove forest park) प्रकल्प पूर्ण करुन सुरु करण्यासंबंधीत निर्देश द्यावेत ही मा. वनमंत्री महोदयांकडे मागणी केली.
12. महाराष्ट्र विधीमंडळ पावसाळी अधिवेशन - 2024 च्या सहाव्या दिवशी बोरिवली येथील गोराई भागातील खारफुटी कांदळवन (Mangrove forest park) प्रकल्प पूर्ण करुन सुरु करण्यासंबंधीत निर्देश द्यावेत ही मा. वनमंत्री महोदयांकडे मागणी केली.
13. महाराष्ट्र राज्य विधीमंडळ पावसाळी अधिवेशन 2024 मधे मुंबई शहरात बनावट पॅथोलॉजी लॅबच्या माध्यमातून नागरिकांची होत असलेल्या फसवणूकिबाबत तारांकीत प्रश्न उपस्थित केला. यावेळी मा. मंत्री महोदयांनी यासंबंधीचे धोरण निश्चित करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वस्त केले.
14. महाराष्ट्र राज्य विधीमंडळ पावसाळी अधिवेशन 2024 मधे बोरिवली येथील भगवती रुग्णालय,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय आणि कांदिवली येथील शताब्दी रुग्णालय येथे विस्ताराचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत याचबरोबर या रुग्णालयातील उपकरणे व सुविधांचा अभाव या संबंधित तारांकीत प्रश्न उपस्थित केला. यावेळी मा. मंत्री महोदयांनी यासंबंधीत लवकरच बैठक घेण्यात येईल असे आश्वस्त केले.
15.महाराष्ट्र राज्य विधीमंडळ पावसाळी अधिवेशन 2024 मध्ये बोरिवलीतील गोराई येथील डम्पिंग ग्राउंडच्या जवळ राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण करणारा डम्पिंग ग्राउंड बंद करण्याबाबत मागणी केली.

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-५

# मतदार संघाच्या विकासात कल्पकता व नाविन्यपुर्णतेची कास धरून सुरु असलेले काम

## REDEVELOPMENT OF BORIVALI STATION PRECINCT, BORIVALI (WEST)

**BEFORE / पूर्वी**





**प्रगतीपथावर असलेले काम / Ongoing work**







**प्रगतीपथावर असलेले काम / Ongoing work**



**हा प्रकल्प पूर्णत्वास आल्यानंतरचे दृश्य (Architectural View)**
















टीप : वरील सर्व कामे प्रस्तावित असून त्यांची परवानगी तसेच शासन आणि विविध खात्यांअंतर्गत येणाऱ्या मान्यता घेवून प्रस्तावित निधी मधून करण्यात येतील.

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-4

भारतीय जनता पार्टी
बोरीवली विधानसभा

https://youtube.com/@SunilRaneBJP
विधिमंडळात केलेली भाषणे व विविध विषयांवर नागरिकांशी केलेले संवाद ऐकण्यासाठीLink आणि QR Code स्कॅन करा.

# सिंहावलोकन... कार्यअहवाल प्रकाशनाचे !

## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2019-20






https://sunilrane.com/3YEARSKARYAAHWAL20,21,22.pdf
मागील 5 वर्षाच्या कार्यअहवालासाठी QR स्कॅन करा

## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2020-21



## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2021-22




## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2022-23






कार्यसंकल्प-1




कार्यसंकल्प-2




कार्यसंकल्प-3




कार्यसंकल्प-4



सेवा स्वीकारावी, विनम्रतेने...
सुनिल दत्तात्रय राणे
आमदार- बोरीवली विधानसभा
सरचिटणीस- भाजपा मुंबई
https://sunilrane.com/3YEARSKARYAAHWAL20,21,22.pdf
मागील तीन वर्षांच्या कार्यअहवालासाठी QR स्कॅन करा
https://youtube.com/@SunilRaneBJP
विधिमंडळात केलेली भाषणे व विविध विषयांवर नागरिकांशी केलेले संवाद ऐकण्यासाठी Link आणि QR Code स्कॅन करा.
पत्ता : जमुना दर्शन, नाटकवाला लेन, बोरीवली (प.), मुंबई - ४०० ०९२.
संपर्क : ०२२ - २८०७ ६५६५ | ईमेल : sunilrane2013@gmail.com
helpdesksunilrane@gmail.com
MLASUNILRANE
SUNILRANEBJP
SUNILRANE_BJP
SunilRaneBJP
Mansi Impression


भारतीय जनता पार्टी
बोरीवली विधानसभा
गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !
२०२२-२३
कार्य अहवाल
श्री.सुरेंद्र गुप्ता
मंडळ अध्यक्ष
सौ.रेश्मा निवळे
महिला मोर्चा अध्यक्षा
श्री.नैनेश शाह
अध्यक्ष युवा मोर्चा
सुनिल दत्तात्रय राणे
आमदार


ध्यास बोरिवलीचा
सर्वांगिण विकासाचा !

# शुभसंदेश



**एकनाथ संभाजी शिंदे**
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
20 SEP 2023

### शुभेच्छा

बोरिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांचा कार्य अहवाल प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला.

भारतीय जनता पक्षाचे कार्यक्षम आमदार म्हणून श्री. राणे यांची ओळख आहे. बोरिवली मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतांना त्यांनी सातत्याने मतदारसंघाच्या विकासासाठी कार्य केले आहे. मतदारसंघातील सर्वसामान्यांपर्यंत विविध शासकीय योजना पोहचवण्याबरोबरच त्यांचा लाभ मिळवून देण्यासाठी ते सतत पाठपुरावा करत असतात. त्यांचे हे कार्य सर्व मतदारांपर्यंत पोहचवण्यासाठी हा कार्य अहवाल निश्चितच महत्वपूर्ण ठरेल, असा विश्वास वाटतो.

आमदार श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांच्या पुढील वाटचालीस आणि कार्य अहवाल प्रकाशनास मन:पूर्वक शुभेच्छा!

(एकनाथ संभाजी शिंदे)

दूरध्वनी : ०२२-२२०२५१५१/२२०२५२२२, फॅक्स : ०२२-२२०२९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in



**देवेंद्र फडणवीस**
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

दि. २७ सप्टेंबर, २०२३

### शुभेच्छा

बोरीवली विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनीधी सुनिल दत्तात्रय राणे हे दरवर्षी आपल्या कार्याचा लेखाजोखा वार्षीक अहवालाच्या स्वरूपात जनतेसमोर ठेवतात ही कौतुकास्पद बाब आहे. बोरीवली विधानसभा मतदारसंघात झालेल्या विकासकामांचा आढावा घेणारी चतुर्थ वार्षीक कार्यअहवाल पुस्तिका ते प्रकाशित करत आहेत याचा मला आनंद असून या स्तुत्य उपक्रमासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा!

आमदार श्री. राणे यांनी केवळ आपल्या मतदार संघातच नव्हे तर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातही आपली ओळख निर्माण केली आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण व त्या सोडवण्यासाठीची त्यांची तळमळ यामुळे त्यांनी जनमानसात लौकीक मिळवला आहे. मतदारसंघाचे सौंदर्यीकरण, नागरी समस्यांसोबतच महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठीची त्यांची तत्परता वेळोवेळी दिसून आली आहे.

आमदार श्री. राणे यांच्या या कार्य अहवालाचे लोक स्वागत करतील, असा विश्वास आहे. कार्य अहवाल पुस्तिकेसाठी तसेच पुढील सामाजिक उपक्रमांसाठी पुनश्च शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

# शुभसंदेश







सत्यमेव जयते

## उप मुख्यमंत्री
### महाराष्ट्र राज्य

दि. ९ आक्टोबर २०२३.

### शुभेच्छा

बोरीवली विधानसभा मतदार संघातील आपल्या कार्यकाळातील विकास कामाचा लेखाजोखा मांडणारा कार्यअहवाल आपण प्रकाशित करत असल्याचे समजून आनंद झाला. आपल्या चतुर्थ वार्षिक कार्यअहवाल प्रकाशनाच्या उपक्रमास मन:पूर्वक शुभेच्छा.

भारतातील लोकशाही यशस्वीपणे कार्यरत राहावी, यासाठी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेच्या शेवटच्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या गुणवत्तेचे महत्व आवर्जुन अधोरेखित केले होते. त्या भाषणात त्यांनी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी ज्यांचे ते प्रतिनिधित्व करतात अशा नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी स्वत:ची बौद्धिक, नैतिक सक्षमता वाढवली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. ती आजही कालसुसंगत ठरते.

लोकप्रतिनिधी या नात्याने आपण अपल्या मतदार संघातील नागरिकांच्या इच्छा, आकांक्षांचे प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे आपल्या कार्यकाळातील विकासकामांचा लेखाजोखा कार्यअहवालाच्या माध्यमातून नागरिकांसमोर मांडण्याचा आपला उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. या कार्यअहवालाच्या उपक्रमासह, आपल्या अगामी वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा.

(अजित पवार)

प्रति,
आमदार श्री. सुनिलजी दत्तात्रय राणे,
सदस्य, बोरीवली विधानसभा मतदार संघ.

---

आज़ादी का अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**मंगलप्रभात लोढा**
मंत्री,
कौशल्य, रोजगार, उद्योजकता
व नाविन्यता
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
www.maharashtra.gov.in

### शुभेच्छा संदेश

बोरीवली विधानसभेचे जनप्रतिनिधी आणि जनसेवक आमदार म्हणून, आपण जे काम करत आहात त्याचा मागील तीन वर्षांचा कार्य अहवाल प्रकाशित होत आहे, त्याचा मला आनंद होत आहे.

जो समाजातील हर एक वर्गातील जनसामान्यांची कामे पूर्ण निष्ठेने, निसंकोच करतो त्यालाच समाज खरा जनसेवक संबोधतो. आपण गेली अनेक वर्षांपासून आपणांस दिलेली जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडत आहात. आपण बोरीवली भागात केलेली विविध लोकोपयोगी विकासकामे ही खरचंच वाखाणण्याजोगी अशी आहेत.

ज्या समाजाने त्यांच्या एका उज्वल भविष्यासाठी आपल्यावर विश्वास ठेवला आहे तो या कार्यवृत्तांच्या निमित्ताने सार्थ होताना दिसत आहे. आपणांस या शुभकार्यासाठी तसेच पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

(मंगलप्रभात लोढा)

कार्यालय : दालन क्रमांक २०२ (मुख्य), दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२. दुरध्वनी / फॅक्स : ०२२ २२०२५३०८/२२०२४९९२
E-mail : min.tourism@maharashtra.gov.in

---

महाराष्ट्र विधानपरिषद

सत्यमेव जयते

**चंद्रशेखर बावनकुळे**
आमदार विधानपरिषद
माजी मंत्री, महाराष्ट्र शासन

दि. ०६/१०/२०२३

### शुभेच्छा संदेश..!!

भारतीय जनता पक्षाचे आमदार म्हणून २०१९ मध्ये जनतेने निर्वाचीत करून दिल्यानंतर आपण दरवर्षी मतदार संघात केलेल्या कामाचा लेखाजोखा जनतेला, कार्यकर्त्यांना व संघटनेला माहीती व्हावा म्हणून पुस्तीका प्रकाशित करता ही अतिशय स्तुत्य व अभिनंदनीय बाब आहे. कारण आपल्या कामाचा लेखाजोखा केल्याची पावती या माध्यमातूनच अतिशय योग्यरितीने मिळते. आपल्या चतुर्थ वार्षीक कार्य अहवालाचे प्रकाशन सोहळयास आपण मला आमंत्रीत केले याबद्दल मी आपला आभारी आहो. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचा मी अवश्य प्रयत्न करील.

आपले उज्वल सामाजिक व राजकिय भवितव्याबद्दल माझ्या मन:पुर्वक शुभेच्छा..!!

(चंद्रशेखर बावनकुळे)

मा. आमदार श्री. सुनिल दत्तात्रयजी राणे
बोरीवली विधानसभा क्षेत्र

श्री जगदंबा निवास, प्लॉट नं. 28-अ, नवीन कोराडी वसाहत, पोस्ट के.टी.पी.एस. कोराडी कॉलनी, त. कामठी, जि. नागपूर-441111

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४

# मनोगत

भारतीय जनता पार्टीच्या पक्षनेतृत्वाने सन 2019 च्या विधानसभा निवडणुकीत मला मुंबईतील बोरिवली विधानसभा मतदार संघातून उमेदवारी दिली आणि बोरिवलीकर जनतेने माझ्यावर विश्वास ठेवून आमदार म्हणून निवडून दिले. अनेक विकासकामांच्या माध्यमातून जनतेचा विश्वास सार्थ करण्याचा मी गेली चार वर्षे प्रामाणिक प्रयत्न करत आहे. जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्याकरिता निवडून आल्यानंतर सातत्याने मतदारसंघाचा दौरा करून बोरिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी अविरत प्रयत्न चालू आहे.

बोरिवली मतदारसंघातील विकासकार्यात सुरक्षा भिंत बांधणी, मैदानांचा विकास व अनेक ठिकाणी लादीकरण केले व सुरु आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अभियानांतर्गत मुलींना सायकल व लॅपटॉपचे वाटप करून बँकेत खाते उघडण्यात आले. वेगवेगळ्या भागांचे व चौकाचे सुशोभीकरण, रस्त्यांचे डांबरीकरण व काँक्रिटिकरण केले व अनेक कामे सुरु आहेत, नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिरांचे सतत आयोजन, आदीवासी बांधवाना पक्की घरे बांधून दिली, विभागातील महिलांच्या सबलीकरणाच्या हेतूने शिलाई मशिन व घरघंटीचे वाटप, विभागातील झोपडपट्टीतील (एस.आर.ए) समस्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्न केले तसेच बोरीवलीमध्ये विविध खेळाची मैदाने विकसित केली, खेल महोत्सव, खादी महोत्सव, नवरात्री उत्सव यासहीत दहीहंडी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. गोराई व चारकोप येथील जुनी पाण्याची पाईप लाईन बदलण्यात यावी तसेच सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत करण्याबाबत निधी उपलब्ध व्हावा, बोरिवलीत सुपरस्पेश्यालिटी हॉस्पिटल व्हावे, अशा प्रकारच्या विविध मागण्या बोरिवलीच्या विकासासाठी विधिमंडळ अधिवेशनात सातत्याने केल्या. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी अनेक लढे उभारले. सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे हटवली. महात्मा फुले नगर येथील पात्र झोपडी धारकांना घरे मिळावी हा प्रामाणिक प्रयत्न यशस्वी करून त्यांना घरे मिळवून दिली.

बोरीवली मध्ये प्रथमच संरक्षण दलातील शस्त्रास्त्रांचे प्रदर्शनाचे आयोजन केले. युध्दात वीरमरण आलेल्या शूर जवानांच्या मुलींसाठी अथर्व फाउंडेशनच्या वतीने लॅपटॉप चे देशभर मोफत वाटप करण्यात येत आहे तसेच आसाम व अरुणाचल प्रदेश येथील राज्य सैनिक बोर्ड व माजी सैनिकांसाठी दोन रुग्णवाहिका भेट देण्यात आल्या आहेत.

हे काम करण्यासाठी मला भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व जनतेने दिलेली साथ मला मोलाची वाटते. आणि यापुढेही करतील, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो आणि माझ्या लेखणीला पूर्णविराम देतो.

धन्यवाद!

जय हिंद !

आपला,

**सुनिल दत्तात्रय राणे**
आमदार, बोरिवली विधानसभा

**भारतीय जनता पार्टी**
**बोरीवली विधानसभा**





## देश विविध रंगांचा, देश विविध ढंगांचा देश विविधता जपणाऱ्या एकात्मतेचा !

गतवर्षी आपण भारतवासियांनी देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. देशप्रेमाचे हे स्फुल्लिंग जनतेच्या मनात सतत चेतवण्यासाठी प्रजासात्तक दिनी बोरीवली (प.) येथे श्यामाप्रसाद प्रसाद मुखर्जी चौकात देशवासियांसोबत ध्वजारोहण केले तसेच प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह येथे महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग आयोजित आज़ादी 75 या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली. दरम्यान या कार्यक्रमात स्वातंत्र्य सैनिक मनोहर वराडकर यांच्या पत्नी श्रीमती माणिक वराडकर यांचा सत्कार करण्यात आला.













## “एक हात आपल्या रक्षणकर्त्यांसाठी”

कारगिल विजय दिवस निमित्त अथर्व फाऊंडेशन तर्फे आसाम व अरुणाचल प्रदेश येथील राज्य सैनिक बोर्ड व माजी सैनिकांसाठी दोन रुग्णवाहिकांचे मा.महामहिम राज्यपाल श्री रमेशजी बैस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यापूर्वी सिक्कीम, मणिपूर आणि नागालँड येथे रुग्णवाहिका देण्यात आल्या होत्या. यावेळी संरक्षण खात्याचे अधिकारी व सैनिक देखील उपस्थित होते. अथर्व फाऊंडेशन तर्फे कारगिल युद्धात प्रत्यक्ष सहभाग घेतलेले माजी भारतीय पॅराकमांडो श्री.मधुसुदन सुर्वे यांचा इलेक्ट्रॉनिक प्रॉस्थॅटीक पाय देऊन सन्मान केला.यावेळी संरक्षण दलातील शहीद सैनिकांच्या मुलींना संरक्षण दलातील अधिकाऱ्यांच्या तसेच मान्यवरांच्या हस्ते लॅपटॉपचे वितरण करण्यात आले.

**मजबूत ज्यांचे हात, जे करी शत्रूवर मात |**
**कर्तव्य हे तुमचे-आमचे, चला देऊ त्यांना साथ ||**






















गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४
भारतीय जनता पार्टी
बोरीवली विधानसभा
व्यर्थ न हो बलिदान शहिदांचे !
INDIA
अमर
जवान























## हि भूमी शूरांची... हि भूमी वीरांची... नरविरांची, नरसिहांची !

भारताची संरक्षण क्षमता, प्रबळ युद्ध सामग्री व अतुलनीय शौर्य यांचे यथार्थ दर्शन जनतेला व्हावे या हेतूने संरक्षण दलातील शस्त्रांचे प्रदर्शन व देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल श्री.रमेशजी बैस यांनी केले याप्रसंगी निवृत्त कर्नल सुधीर राजे, निवृत्त कर्नल पी.के.कपूर, निवृत्त लेफ्टनंट कर्नल मनोजकुमार सिन्हा(सेना मेडल) ,निवृत्त नायक दिगेंद्र कुमार (महावीर चक्र) आणि निवृत्त पॅराकमांडो मधुसूदन सुर्वे (शौर्य चक्र) यांनी भारतीय युद्ध प्रसंगाच्या शौर्यगाथा सांगून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

## स्वत:च्या अज्ञानाची जाणीव असणे, हीच ज्ञानाची पहिली पायरी आहे.

- स्वामी विवेकानंद

फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात हिंदू धर्म आणि भारतीय संस्कृतीच्या प्रसाराचे काम ज्यांनी केले, भारताला जर संपूर्ण जगाचा गुरु व मार्गदर्शक बनायचे असेल तर स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे अनुकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, स्वामीजींच्या दैदिप्यमान कार्याची ओळख जनतेला व्हावी या धारणेतून स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त त्यांची प्रतिमा व स्मृती दालनाचा उद्घाटन समारंभ स्वामी विवेकानंद चौक व कला दालन (आर्ट गॅलरी) एस. व्ही. रोड, रेल्वेस्टेशन जवळ, बोरिवली (पश्चिम) येथे पार पडला. व कला दालन नागरिकांसाठी उपलब्ध केले.















# गगनभरारी...
## आता आंतरराष्ट्रीय स्तरावर

***आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्केटिंग रिंक, बॉक्सिंग रिंक व बास्केटबॉल क्रिडा संकुलाचे निर्माण !***

आपल्या देशात आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार करावयाचे असतील तर सर्वाधिक गरज आहे ती अत्याधुनिक क्रिडा सराव साहित्याची व मैदानांची आपल्या देशातील खेळाडूंची गुणवत्ता हि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या खेळाडूंच्या तोडीस तोड आहे. त्यांच्या क्रिडा नैपुण्याला चालना देण्यासाठी, प्रोत्साहित करण्यासाठी पारंपारिक क्रीडा प्रकारासोबत आधुनिक क्रीडाप्रकारांना चालना देणं त्याची माहिती तरुण खेळाडूंना करून देणं हि काळाची गरज आहे. याच संकल्पनेतून मी मुंबई मनपा व म्हाडाच्या सहकार्याने बोरीवली मधील पहिले अद्ययावत स्केटिंग रिंक, बॉक्सिंग रिंक व बास्केटबॉल क्रिडा संकुलाचे निर्माण केले.

























## रायफल शुटींग आणि आर्चरी (तिरंदाजी)

तसे पाहायला गेले तर हा नाविन्यपूर्ण आणि आपल्या देशात कालांतराने लोकप्रिय झालेला क्रीडाप्रकार. थोडासा खर्चिक व साधनांच्या अभावामुळे या खेळाची मैदाने जरी कमी असली तरी खेळाडूंची यातील रुची लक्षात घेता, आपल्या बोरीवली विधानसभा क्षेत्रात वीर जिजामाता उद्यानात बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडाच्या सहकार्याने या दोन्ही खेळांसाठी जागा उपलब्ध करून स्पोर्टस क्लब सुरु केला. तज्ञ क्रिडा प्रशिक्षकांकडून खेळाडू घडविण्याचे काम सुरु असून यातील काही खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



## जैव विविधतेने नटलेली माझी बोरीवली...
## माझे कांदळवन !

गर्द वनराई, जंगले हि पृथ्वीची फुफ्फुसे आहेत. वातावरणाचा समतोल राखण्याचे कार्य हि घनदाट जंगले करतात. मुंबईच्या समुद्र व खाडी किनारी नैसर्गिकरित्या तयार झालेली हि कांदळवने... त्यांचे निसर्ग सौंदर्य...जैव विविधता यांनी परिपूर्ण असलेली याची खरी ओळख लोकांना व्हावी व यातून पर्यटनाचा आनंद घेता यावा यासाठी उभारण्यात येत असलेला मॅन्ग्रोव्ह पार्क म्हणजेच कांदळवन प्रकल्प. कार्यकर्त्यांसमवेत या प्रकल्पाची पाहणी केली. लवकरच हा प्रकल्प नागरिकांच्या सेवेत उपलब्ध होणार आहे.







गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प-४**

## बाबरपाडा गावठाण गोराईगाव बोरीवली (पश्चिम) येथील घरांच्या भिंतीवर वारली चित्रकलेचे (पेंटिंग) सुशोभिकरण या योजनेचा उद्घाटन समारंभ

# विकासकामे... लोकहिताची !





## मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लादीकरण, ड्रेनेज जोडणी, शौचालय नुतनीकरण व पुनर्बांधणी कामाचा भूमिपूजन सोहळा






## तरुणांच्या नृत्य, नाट्य व संगीत या कलागुणांना प्रोत्साहित करण्याकरिता शिंपोली पश्चिम येथे द व्हिलेज आर्ट अँड कल्चर सेंटरचे निर्माण





गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प-४**



## कर्तव्याला जोड इच्छाशक्तीची...
## तेथे गंगा वाहते विकासाची!

नागरिकांच्या मुलभूत गरजा म्हणजे पाणी, वीज, रस्ते, शौचालय. झोपडपट्टी विभागातील याच गरजा नागरिकांना तीव्रतेने जाणवतात याच बरोबर येथील अरुंद गल्ल्या व सांडपाण्याचा निचरा हा महत्वाचा प्रश्न याकरिता अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये तसेच झोपडपट्ट्यांमध्ये अरुंद रस्त्यांवर लादिकरणाचे व सांडपाण्याचा निचरा होण्याकरिता पावसाळी गटारे बांधली. लादिकरणामुळे वस्तीची शोभा वाढली व स्वच्छता निदर्शनास आली.

**जलद सोयी... तत्काळ सुविधा**
**याच जनसेवेच्या यज्ञकुंडातील समिधा !**










### मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लादीकरण, ड्रेनेज जोडणी, ग्रील बसविणे, नुतनीकरणाचे काम











गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४

## मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लहान मुलांसाठी खेळाच्या सामग्री बसविल्या.







## मतदार संघातील विविध ठिकाणी शौचालय बांधण्याचे काम करण्यात आले.










# विभागातील विविध ठिकाणी प्रगतीपथावर असलेली विकासकामे





(गोराई) कुलवेम गावातील सुरु असलेल्या लोटस तलावाची स्वच्छता व सुशोभीकरण





एम.एच.बी. कॉलनी येथील तलावाचे सुशोभीकरण





प्रगती मैदान येथील सुशोभीकरण

# विभागातील विविध ठिकाणी प्रगतीपथावर असलेली विकासकामे





शिवसृष्टी योगा पार्कचे सुशोभीकरण






योगी नगर RG-1 परिसरातील गार्डन सुशोभीकरण






योगी नगर RG-2 परिसरातील गार्डन सुशोभीकरण

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४















## नवे रूपं... नवा हुरूप...
## रस्त्याच्या विकासाचा, सुशोभीकरणाचा!

अन्न, वस्त्र, निवारा या समाजाच्या मुलभूत गरजा असताना शहराच्या विकासाच्या आड येत असतील तर जनतेचा यावरील हक्क अबाधित ठेवत कार्य करणे जिकरीचे काम असते. रस्त्याच्या विकासाच्या आड येत असलेल्या महात्मा फुले नगर, बोरीवली पश्चिमेकडील झोपड्या हटवून तेथील झोपडपट्टीधारकांना इतर जागी घरे उपलब्ध करून झोपडीधारकांचे पुनर्वसन केले. या घरांच्या सोडतीबाबत बैठकीस उपस्थित राहिलो.

Proposed Concept for LT Road Beautification at Borivali (W), Mumbai












गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४

# आमदार श्री.सुनील राणे यांच्या विकासनिधीतून झालेली कामे

- सिव्हिक पार्क उद्यान, कस्तुर पार्क येथे जॉगिंग ट्रॅक
- सत्य साई कॉम्प्लेक्स, चिकूवाडी येथे मैदानाचे सुशोभिकरण
- मोठी डोंगरी, मनोरी येथे सुषमा दवडे यांचे घर
- विश्वशांती सोसायटी, प्लॉट क्र.449 येथे ड्रेनेज लाईन
- सोमेश्वर एसआरए, टाटा पॉवर, प्लॉट क्र.79 पाण्याची पाइपलाईन
- गोराई-2, प्लॉट क्र.6 येथे लादीकरण
- गोराई-2, महालक्ष्मी सोसायटी, प्लॉट क्र. 267 येथे लादीकरण
- गोराई-2, प्लॉट क्र. 133 येथे लादीकरण
- गोराई-2, प्लॉट क्र.138 येथे लादीकरण
- रामचंद्र चाळ, डॉन बॉस्को, बोरिवली (प.) येथे लादीकरण व ड्रेनेज
- गोराई 1 ते 5, भीमनगर येथे गल्ली ड्रेनेज, लादीकरण, रस्ते
- सेक्टर-5, चारकोप, कलावती आई येथे भिंत बांधणे
- राजेंद्र नगर, तोरणा को.ऑप हौसिंग सोसा ली. येथे रस्त्याचे काम
- प्लॉट क्र.225, गोराई-2, यशस्वी सह.गृह.सं.ली येथे संस्थेच्या आवारातील लादीकरण व ड्रेनेज लाईन कामाचे भूमिपूजन
- सर्वोदय या संस्थेमधील प्रांगणाच्या लादीकरणाच्या कामाचे भूमिपूजन
- गोराई-2, प्लॉट क्र.7, संजीवनी सोसायटी या संस्थेमधील प्रांगणाच्या लादीकरणाच्या कामाचे भूमिपूजन
- बाभई नाका, बोरीवली (प.) विठ्ठल रखुमाई मंदीर येथे लादीकरण
- गोराई, प्लॉट क्र.131, दर्शना सोसायटी येथे लादीकरण व ड्रेनेज
- नवीन एमएचबी कॉलनी, सागर संगीत को.ऑप.हौ.सो.ली येथे संस्थेच्या आवारातील लादीकरण व ड्रेनेजची कामाचे भूमिपूजन
- गोराई-2, प्लॉट न.273, धनवंती को.ऑप.हौ.सोसा येथे लादीकरण व ड्रेनेज
- गोराई-2, प्लॉट नं.163, आधार शीला को.ऑप.हौ.सोसा येथे लादीकरण व ड्रेनेज
- चारकोप सेक्टर 7, प्लॉट नं.712,शांती निवास को.ऑप.हौ.सोसा येथे लादीकरण व ड्रेनेज
- चारकोप सेक्टर 5, प्लॉट क्र.535, पुष्पम को.ऑप.हौ.सो.ली. येथे लादीकरण व ड्रेनेज
- गोराई-2, प्लॉट क्र.179, श्रद्धा को.ऑप.हौ.सोसा येथे लादीकरण व ड्रेनेज
- गोराई-1,भीमनगर संत तुकाराम चाळ येथे ड्रेनेज लाईन व लादीकरण
- अपेक्स हॉस्पिटल मागे, नूतननगर, बोरीवली (प.) येथे 6 आसनी शौचालय
- गोल्डन मैदान, राजेंद्र नगर येथे 2 आसनी शौचालय व मुतारी
- नरहरी चाळ, दत्तपाडा क्रॉस रोड बोरिवली (पूर्व)येथे खुले सभागृह (गणेश वाडी)
- गोराई-2, प्लॉट नं.231, संकल्प सिद्धी येथे लादीकरण व ड्रेनेज
- राजमाता जिजाऊ उद्यान जवळ, शिंपोली रोड, बोरिवली (प.) येथे रायफल शूटिंग हॉल सुशोभीकरण
- कोरा केंद्र जवळ, बोरिवली (प) येथे कंपाऊंड भिंत
- कोरा केंद्र जवळ, बोरिवली (प) येथे सुशोभीकरण
- कोरा केंद्र, बोरिवली (प.) येथे स्त्री /पुरुष टॉयलेट ब्लॉक आणि कोरा केंद्र जवळ शौचालय

## जनसेवेची पोचपावती


Shree Gyanoday Co-operative Housing Society Ltd.

आभारपत्र


श्री मोरेश्वर सेवा संघ


KUSUM BHARTI CO-OP. HSG. SOC. LTD.


GORAI (2) SHREE SAINATH CO-OP HOUSING SOCIETY LTD.


ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, वझिरा

भारतीय जनता पार्टी बोरीवली विधानसभा

# नागरिकांच्या समस्यांचे निवेदन, त्याचे त्वरित निराकरण !






गोराई (१), वटवृक्ष सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

Gorai(1) Vatvruksh Co-operative Housing Society Limited


श्री गुरुदेवदत्त श्रीस्वामी समर्थ मठ (रजी. नियोजित)


TENTH CENTRAL MALL
CO-OPERATIVE PREMISES SOCIETY LIMITED


गोराई (१) स्वयंभू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित


गोराई (२) यशस्वी सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित)


सिरवी विकास नवयुवक मण्डल




बिरसा मुंडा आदिवासी श्रमिक संघटना


GORAI - OMSAI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.


स्नेह-सागर को. ऑ. हौसिंग सोसायटी लिमिटेड





## जाण... कायद्याच्या रक्षकांची, त्याला साथ आधुनिक तंत्रज्ञानाची !

मतदारसंघातील जनतेच्या सुरक्षेची व कायद्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी ज्या सक्षम हातात आहे अश्या पोलीस प्रशासनाचे मनोधैर्य वाढविणे, बदलत्या संगणकीय युगात वाटचाल करताना पोलीस दलाचे आधुनिकीकरण व्हावे या हेतूने पोलीस स्थानकांना संगणक पुरविण्यात आले तसेच बोरीवली रेल्वे स्थानकाबाहेर वाहतूक पोलीसांसाठी चौकी उभारुन त्याचे उद्घाटन करण्यात आले, पोलिसांच्या इतर सोयी सुविधा पुरविण्यावर विशेष लक्ष देण्यात आले.














# प्रशासकीय चर्चेतून प्रश्नांचा पाठपुरावा

निवेदने आल्यावर त्यातील प्रश्न समजून ते संबंधित प्रशासकिय विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून सोडवण्याचे काम केले जाते.



वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त आर. मध्य विभाग, श्रीमती संध्या नांदेडकर व अधिकाऱ्यांसोबत मुंबईचा कायापालट अंतर्गत बोरिवलीचे सुशोभीकरण या संदर्भात घेतलेल्या बैठकीत बोरिवलीतील विविध विषयांवर सकारात्मक चर्चा.



SRA च्या पुनर्विकास संबंधित SRA चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सतीश लोखंडे यांच्यासोबत चर्चा



राजभवन येथे महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम श्री.रमेश बैस जी यांच्याशी मुंबई विद्यापीठाच्या परिवर्तन आणि सुधारणा आराखड्याबाबत चर्चा.



विधानसभा क्षेत्रातील सरकारी भूखंडांवर होत असलेल्या अतिक्रमणाबाबत मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे-पाटील महसूल ,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री यांच्या मंत्रालयातील दालनात संबंधित विभागीय अधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा



प्रशासकीय चर्चेतून विविध विषयांवर सकारात्मक पाठपुरावा.



मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर निवड झाल्यानंतर बैठकीस मा. कुलगुरु व इतर सदस्यांबरोबर विकास अहवाल, विद्यापीठाचा अर्थसंकल्प, आराखडा व विशेष उल्लेखनीय बाबींवर चर्चा



प्रशासकीय चर्चेतून विविध विषयांवर सकारात्मक पाठपुरावा.

गतीमान विकासाचा
## कार्यसंकल्प-४

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री एकनाथजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गिरणी कामगारांच्या घरांच्या बाबतीतील बैठक सह्याद्री अतिथी गृह येथे पार पडली. सदर बैठकीत विविध गिरणी कामगार संघटनांचे प्रतिनिधी लोकप्रतिनिधी तसेच शासकीय अधिकारी उपस्थित होते.









म्हाडा कार्यालयात गिरणी कामगारांना घरे देण्यासंदर्भात संनियंत्रण समितीचे अध्यक्ष म्हणून कार्यालयात बैठक व गिरणी कामगारांशी चर्चा.





कोल्हापूर येथील दौऱ्यात गिरणी कामगारांच्या तसेच वारसांच्या पात्रता निश्चितीच्या आयोजित केलेल्या शिबिरात म्हाडाच्या अधिकाऱ्यांसोबत कामगारांच्या प्रश्नांबाबत मार्गदर्शन.







वर्षानुवर्षे मनाच्या एका कोपऱ्यात असणारा ज्वलंत विषय म्हणजे "गिरणी कामगार"! गिरणी कामगार घरांसाठीच्या समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठीच्या कामाला गती दिली आणि या ऐतिहासिक निर्णयाचा याची देही याची डोळा मला साक्षीदार आणि महत्वाचा भाग होता आले याचा मला सार्थ अभिमान आहे. गिरणी कामगारांच्या घरांच्या चाव्या देण्यासंदर्भात झालेल्या या सुवर्ण निर्णयानंतर, गिरणी कामगारांना महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे व मा.उपमुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस व मा.उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या हस्ते चाव्या सुपूर्त करण्यात आल्या. या गिरणी कामगारांच्या चेहऱ्यावरील समाधान मन दिपवणारे होते.




स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

## एक तारीख, एक तास...
### लावू कचऱ्याची विल्हेवाट !

## माझी माती, माझा देश...
### वृक्षारोपण करू आधी !

महात्मा गांधीजी जयंती निमित्त स्वच्छता अभियानांतर्गत आयोजित "एक तारीख, एक तास" या उपक्रमात उत्स्फूर्तपणे स्वच्छता अभियानाची सुरुवात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह केली. "स्वच्छ बोरीवली हरित बोरीवली" या मंत्राचे पालन करून भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांना आदरांजली वाहिली तसेच "माझी माती, माझा देश" अभियानांतर्गत वृक्षारोपण केले.















## वाढदिवस पंतप्रधानांचा ...
## संकल्प जनसेवेचा !

आदरणीय पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त, बोरिवली मतदारसंघात 'सेवा सप्ताह' अंतर्गत भव्य रक्तदान शिबिराची सुरुवात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह केली. "रक्तदान हेच श्रेष्ठदान" या मंत्राचे पालन करून आम्ही आदरणीय पंतप्रधानांना बोरिवली मतदारसंघाकडून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सेवा सप्ताहातील फळ वाटप कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. अनाथ मुलांची भेट घेऊन त्यांना फळे वितरित केली. तसेच लाभार्थी सम्मेलनाचे आयोजन केले. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी विविध प्रकल्पांच्या उद्घाटनासाठी मुंबई दौऱ्यावर आले असताना विमानतळावर त्यांचे स्वागत केले.



































## आरोग्य सेवा सदासर्वदा, हीच आमची धनसंपदा !

लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असताना जनतेच्या आरोग्याविषयी दक्ष राहणे आवश्यक असते त्यांना योग्य वेळी औषधोपचार मिळणे तसेच साथीच्या रोगांबाबत जनजागृती व घ्यावयाची काळजी याबाबत अवगत करणे. त्याचबरोबर परवडणाऱ्या दरात अथवा काही अंशी निशुल्क उपचार मिळणे हे माझे कर्तव्य समजतो, याकरिता वेळोवेळी विविध ठिकाणी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करून मोफत चष्मा वितरण केले. मुलांसाठी दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन करून त्यांना मोफत दंत किटचे वाटप करण्यात आले.





## द्यावे जनतेला, असेल जे आवश्यक
## समाजकार्य असावे सर्वसमावेशक !

ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजातील आदर्श असतात. गत आयुष्यातील त्यांचे अनुभव हे आपल्यासाठी मार्गदर्शक असतात. शासनाने ज्येष्ठ नागरिकांना अनेक सोयी व सवलती दिल्या आहेत. त्या मिळवण्यासाठी आवश्यक असलेले ओळखपत्र म्हणजे ज्येष्ठ नागरिक कार्ड. बोरीवली मतदार संघातील ज्येष्ठ नागरिकांना विनामुल्य सदर ओळखपत्राचे वितरण करण्यात आले तसेच छत्र्यांचेही वाटप केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना पावसाळी रेनकोट वाटप तसेच महिला सबलीकरणाचे हेतूने शिलाई मशिन व घरघंटीचे वितरण केले.




















मनोरी गावातील कोळी मच्छीमार बांधवांच्या मासे पकडण्याच्या जाळीस व जाळी ठेवायच्या जागेस आग लागल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले व त्याचा परिणाम त्यांच्या उदरनिर्वाहावर झाला. या स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करून शासनातर्फे त्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. मा.ना.श्री. पुरुषोत्तम रुपाला (केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री) यांच्याशी सुद्धा या संबंधी चर्चा केली. मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे यांनी या कोळी बांधवांचे झालेलं नुकसान भरुन देण्यासाठी मदत जाहीर केली व नुकसानीच्या धनादेशाचे वाटप केले.













## सन्मान

### आपल्यासाठी झटणाऱ्यांचा, सदैव तत्पर असणाऱ्यांचा....

1 मे कामगार दिनानिमित्त रेल्वे स्थानकांतील सफाई कामगार, हमाल, बूटपॉलिश, डब्बेवाले तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सफाई कामगार, टॅक्सी, रिक्षाचालक व महिला पोलिस यांचा सन्मान कार्यक्रम, बोरिवली रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म जवळ पार पडला.





## सेवेसी करा श्रमंती... मिळेल जो मार्ग
## हवी प्रबळ इच्छाशक्ति... त्यातूनच निघेल मार्ग !

लोकप्रतिनिधी हा कार्यशील व कृतीशील असावा सामाजिक बांधिलकी जपत नागरी हिताची कामे करण्यासोबत नागरिकांचे इतर प्रश्न अडचणी जाणून घेणे महत्वाचे असते, प्रश्न शासन दरबारी मांडून त्या प्रश्नांची उकल आणि पाठपुरावा करून त्या अडचणी प्रशासनाच्या माध्यमातून सोडविण्याला मी प्राधान्य दिले. याकरिता प्रसंगी जनतेच्या दारात जाऊन त्यांना भेटून, सभा घेऊन, चर्चा करून या जनसंपर्क अभियानामार्फत सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तेलंगणातील कुथबुल्लापूर येथे पक्ष संघटनेसाठी आमदार प्रवास या कार्यक्रमासाठी केलेल्या 8 दिवसांच्या मोहिमेसाठी (कॅम्पेनसाठी) राज्य स्तरावर क्रमांक 1 तसेच राष्ट्रीय स्तरावरही क्रमांक 1 प्राप्त झाला आहे.






















## लढाऊ बाणा समाजहितासाठी, आंदोलन न्याय्य हक्कांसाठी !

समाजात काम करत असताना लोकप्रतिनिधीला अनेक सामाजिक प्रश्नांसाठी संघर्ष करावा लागतो, कधी गैरव्यवस्थापनाविरोधात, कधी नागरी सुविधांसाठी तर कधी अन्यायाविरोधात आवाज उठवावा लागतो यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलनेही करावी लागतात, मी नेहमीच लोकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्यास मागे पुढे पहिले नाही. लढाऊ बाण्याने अन्यायाविरोधात आवाज उठवून जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो.




भाजप उत्तर मुंबई आयोजीत बुथ सशक्तीकरण बैठकीत कार्यकत्यांना संबोधीत केले. यावेळी मुंबई भाजपा अध्यक्ष, आमदार श्री.आशिष शेलार आणि आमदार श्रीमती मनीषाताई चौधरी व आमदार श्री.योगेश सागर हे सुद्धा उपस्थित होते.




### आशीर्वाद हवा जनता जनार्दनाचा

भारतीय जनता पार्टी व शिवसेना युतीच्या संयुक्त विद्यमाने आशीर्वाद यात्रेचे आयोजन करण्यात आले. या आशीर्वाद यात्रेत उपस्थित राहिलो.



प्रौढप्रताप पुरंदर सिंहासनाधिश्वर छत्रपतींचे गुणगाण म्हणजेच विररसाने आणि देशप्रेमाने भरलेलं शिवचरित्र. याचे मोल शिवप्रेमींसाठी एका धर्मग्रंथाहून कमी नाही. या चरित्र पारायणाचे फलित म्हणजे सन्मार्गाने वाटचाल, परोपकार वृत्ती, प्रतिकूल परिस्थितीत कार्यसिद्धता आणि उत्कट देशप्रेम आणि हे सारे प्राप्त करण्यासाठी हवे आयुष्यात एकदा तरी शिवचरित्राचे पारायण.

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४

## खेळ आनंदाचा... उर्जा तरुणाईची !

क्रिडाविश्व म्हणजे सळसळत्या तरुणाईचे उर्जास्रोत, मनाला भुरळ घालणारे क्रीडाप्रकार. त्यातील खेळाडूंचे कौशल्य, कसब सारेच वाखाणण्याजोगे, आपले भविष्य घडविण्याची अनेक सुसंधी या क्रिडाप्रकारातून खेळाडूंना मिळतात. गरज असते ती त्यांच्यातील क्रीडागुणांना उत्तेजन देण्याची, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी सुसज्ज साधन सामग्रीची, याच उद्देशाने बोरीवली स्पोर्टस् अँड कल्चरल असोसिएशनच्या माध्यमातून बोरीवली खेल महोत्सव-2 चे आयोजन करण्यात आले, यात कॅरम , मल्लखांब, फुटबॉल, व्हॉलीबॉल, ज्युडो, कराटे, बॉक्सिंग, किकबॉक्सिंग, स्केटिंग, मॅरेथॉन, सायकल मॅरेथॉन अशा विविध खेळांचा समावेश होता. बोरीवली मतदारसंघातील तरुणांसाठी हा क्रिडामहोत्सव वार्षिक आकर्षण आणि आनंदाचा भाग असतो. तसेच स्पर्धेत भाग घेतलेल्या व विजयी स्पर्धकांना बक्षिसे आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. लहान मुलांसाठी क्रिकेटचे प्रशिक्षण आणि मैदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली.

बोरीवली खेल महोत्सव 2023
Borivali Sports Festival 2023
उत्सव परंपरेचा, क्रीडा गुणांचा आणि नवचैतन्याचा

























बोरीवली
खेल
महोत्सव


बोरीवली
खेल


11 km
भारताच्या प्रजासत्ताक दीनानिमित्त

गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प-4



"आपल्या देशाची खरी ओळख असलेले वस्त्र म्हणजे खादी, आता देशाचे महावस्त्र म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धीच्या झोतात आले आहे. तरुण पिढीलाही खादीचा मोह आवरत नाही. असे असले तरी खरी गरज आहे खादीच्या प्रचार व प्रसाराची"




मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत खादी महोत्सवाचे-2 चे आयोजन










## वारसा लोकहिताचा, ध्यास नाविन्याचा

खादी हे संपूर्ण भारतीय बनावटीचे वस्त्र आहे जे संपूर्ण पर्यावरणपूरक असून मजबूत व टिकाऊ आहे. या वस्त्र निर्माणावर अनेक छोटे व्यावसायिक अवलंबून असतात त्यांना व्यवसायात हातभार लागावा, खादीचा प्रसार व प्रचार व्हावा या उद्देशाने भव्य अश्या खादी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने या महोत्सवास भेट दिली. तसेच यानिमित्त खादी फॅशन शो चे आयोजन करण्यात आले. अथर्व स्कूल ऑफ फॅशन आणि आर्टस व मुंबई खादी व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने खादी महोत्सव - 2 चे आयोजन करण्यात आले. अनेक वस्तू श्रमाने नटलेल्या, अनेक रंगाच्या मिश्रणात बहरलेल्या येथे पाहायला मिळाल्या. तसेच येथे साकारलेले गावाकडचे चित्रीकरण हे यंदाच्या खादी महोत्सवाचे विशेष आकर्षण होते. या प्रदर्शनात स्टॉल मालकांना सहभाग प्रमाणपत्र व शुभेच्छा देखील देण्यात आल्या.







khadi
MAHOTSAV-2.0
THE CULTURE OF INDIA


गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४
भारतीय जनता पार्टी
बोरीवली विधानसभा
बेटी बचाओ, बेटी पढाओ !





## गुणवत्तापूर्ण शिक्षण... विद्यार्थ्यांच्या हक्काचे रक्षण !

भविष्यात जागतिक स्तरावर महागुरु बनणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज भारताचे भाग्यविधाते म्हणजेच आमचे विद्यार्थी. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर यशाची शिखरे काबीज करत देशाला प्रगतीपथावर नेतील हे निर्विवाद सत्य आहे आणि याकरिता विद्यार्थ्यांसाठी जेजे काही करता येईल त्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. यात शालेय साहित्याचे वाटप, वह्या वाटप रेनकोट वाटप तसेच आर्थिक सहकार्य केले. "9 वर्षे मोदीजींच्या यशस्वी नेतृत्वाची" या कार्यक्रमा अंतर्गत भारतीय जनता पार्टी बोरिवली विधानसभा आयोजित "बेटी बचाओ, बेटी पढाओ" अभियानांतर्गत मुलींचे बँक खाते सुरु करून त्यांना बँक पासबुक वितरण केले.











गतीमान विकासाचा

## कार्यसंकल्प-४







**गुरुविण न मिळे ज्ञान, ज्ञानाविना न होई जगी सन्मान**
**जीवन भवसागर तारावया, चला वंदू गुरुराया !**

अथर्व फाउंडेशन तर्फे आयोजित शिक्षक दिनानिमित्त विभागातील शिक्षकांसाठी कार्यक्रमाचे आयोजन केले व सन्मानपत्र देऊन शिक्षकांचा सत्कार केला.









## सन्मान नारीशक्तीचा...

आजच्या युगात महिला, पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने स्वत:चा आगळावेगळा ठसा उमटवत आहेत, असे कोणतेही क्षेत्र नाही जेथे महिलांनी आपली स्वत:ची ओळख निर्माण केलेली नाही. काही क्षेत्रात तर महिलांनी मिळवलेले यश हे नक्कीच प्रेरणादायी आहे आपल्या भारतीय संस्कृतीने नेहमीच महिलांना मानाचा दर्जा दिला आहे. सरकारने देखील महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविल्या. अश्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान व सत्कार करणे हि नेहमीच आमच्यासाठी भूषणावह बाब ठरली आहे.





गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४

## या भूमंडळाचे ठायी, धर्म रक्षी ऐसा नाही
## महाराष्ट्र धर्म राखिला काही, तुम्हा कारणे !

इतिहास हा वर्तमानाचा वाटाड्या आहे, त्याचे भान वर्तमानात ठेवले तर भविष्यकाळ आपलाच आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवरायांचे तेजोवलयांकित चरित्र हे यावद्श्चंद्र दिवाकरौ मानवजातीला प्रेरणादायी ठरणारे आहेच त्याचबरोबर हा वैभवशाली इतिहास जपत युवा पिढीत रुजावा, देशप्रेमाने ओतप्रोत ओथंबलेली पिढी निर्माण व्हावी याकरिता महाराष्ट्राच्या या आराध्य दैवताला मानाचा मुजरा करून नतमस्तक होण्यासाठी शिवजयंती सोहळ्याचे आयोजन केले.





## धर्म, संस्कृती आणि उत्सवांचे संवर्धन करूया परंपरेचे जतन !





### स्वागत नववर्षाचे !

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा... हिंदू नववर्षाच्या या पहिल्या दिवशी, हिंदू नववर्ष स्वागत समिती व बोरीवलीतील विविध सामाजिक संस्थांनी आयोजीत केलेल्या हिंदू संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शोभायात्रेत सहभागी झालो व सर्व नागरिकांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.





## होळी रे होळी...

होलिकोत्सव अर्थात होलिकादहन, अपप्रवृत्तींना नष्ट करून त्यावर विजय मिळवल्याचा उत्सव साजरा करणारा हा सण. खरे तर, जुने जेजे वाईट असेल ते सोडून, नव्याच्या स्वागतासाठी सिद्ध होण्याचा हा सण. आपल्या सांस्कृतिक सणांपैकी एक असलेला हा उत्सव, भारतात सर्वच ठिकाणी साजरा होतो. माझ्या मतदार संघातील ठिकठिकाणी होलिकादहन कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली आणि नागरिकांना होलिकोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.



## दहीकाला उत्सव... महाराष्ट्राच्या रांगड्या मातीचा, एकात्मतेच्या प्रतिकाचा !

बोरीवली मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य दहीकाला महोत्सवाचे आयोजन करून आपल्या संस्कृतीचा वारसा जपण्याचा प्रयत्न केला. या दहीकाला उत्सवात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची उपस्थिती लाभली तसेच उत्सवास आलेल्या अनेक दहीकाला पथकांना प्रोत्साहन दिले.







गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४





## मांगल्याचा सण...
## होता घरी गणरायाचे आगमन !

सर्व सुखांचा कारक आणि सकल विघ्नांचा हारक व अग्रपूजेचा मान असलेल्या गणरायाचे आगमन म्हणजे भाद्रपद वद्य चतुर्थी अर्थात गणेश चतुर्थी या शुभपर्वावर माझ्या निवासस्थानी गणेश मूर्तीची स्थापना करून आशीर्वाद घेतला तसेच बोरीवली मतदारसंघातील अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेट दिली तसेच घरगुती गणरायांचे दर्शन घेऊन जनताजनार्दनाला उत्तम आरोग्य लाभून सुख, समृद्धीचे पर्व सुरु होवो, अशी गणरायाकडे प्रार्थना केली.







## या देवी सर्व भूतेषु शक्तीरूपेण संस्थिता |
## नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ||

अश्या या आदिमाया आदिशक्ती जगदंबेचा उत्सव म्हणजे अश्विन शुद्ध प्रतिपदा अर्थात शारदीय नवरात्रोत्सव. या शुभपर्वकाळात बोरीवली (प.) येथे रंगरात्री दांडिया नाईटस्-२चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहावयास मिळाला.

Sunil Rane
Presents
Rangratri
Dandiya
Nights

# जागर आदिमायेचा, उत्साह नवरात्रोत्सवाचा !

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४















गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४






# विधिमंडळात व्यक्त केलेले मत व विविध मागण्या

1. मुंबईतील अंधेरी (पूर्व) रेल्वे क्रॉसिंग येथील गोपाळ कृष्ण गोखले पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत.
2. बोरिवलीतील चारकोप आणि गोराई येथील सरकारी जमिनीवरील अतिक्रमणाबाबत.
3. बोरिवली पश्चिमेकडील जुनी एमएचबी वसाहत येथील म्हाडाच्या पुनर्विकासाबाबतचा विषय उपस्थित केला.
4. मुंबई महानगरपालिकेच्या शाळांची सद्यस्थिती व त्यांच्या सुविधांची सद्यस्थिती आणि नवीन शैक्षणिक धोरण.
5. मुंबईतील म्हाडाच्या इमारतींचा विकास आणि पुनर्वसन, बीडीडी चाळ पोलीस घरे, एमएचबी वसाहतीचा पुनर्विकास, गोराई मानोरी परिसरातील पाणी आणि ड्रेनेज समस्या, MVS नियम 293 अन्वये सरकारी जमिनीवरील अतिक्रमण आणि पोलिस ठाण्यांचे आधुनिकीकरण प्रस्ताव.
6. आदिवासींसाठी मूलभूत सुविधांबाबत लक्षवेधीच्या माध्यमातून विविध समस्या मांडल्या.
7. गोराई मनोरी भागातील पोलीस ठाण्याच्या इमारती, मुंबई पोलीस दलाच्या आरोग्य व हॉस्पीटल सुविधा तसेच कोळी व मासेमारी व्यवसायासंबंधी सोयी सुविधा व विमा योजने बाबत आणि बंदरे व लहान जेट्टीच्या कामाला गती देण्यासंबंधी प्रश्न उपस्थीत केले.
8. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी, अत्याधुनिक व डिजिटल क्षेत्रातील विविध विषयांवर संशोधनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.
9. बोरिवली (प) रेल्वेस्टेशनच्या सभोवतील परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांवर कार्यवाही करण्यासंबंधी प्रश्न उपस्थित केला.
10. आरे डेअरी तसेच वरळी डेअरी संबंधित योजना, उत्पादन व वितरण याविषयी प्रश्न उपस्थित केला.
11. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत केलेल्या कामांची कंत्राटदारांकडून वस्तू व सेवा कराची रक्कम कपात न केल्याबाबत प्रश्न उपस्थित केले.
12. मुंबई शहरात हवेतील वाढत्या प्रदूषणाबाबत प्रश्न उपस्थित केले. बालसुधारगृहासाठी सुद्धा अनुदान द्यावे ही मागणी केली.
13. महात्मा फुले जन आरोग्य योजनेविषयी व रेशन कार्ड अंगठ्याचा मुद्दा (थंब इश्यु) बद्दल. तसेच वडाळा सोबतच कोराकेंद्र बोरीवली येथे एक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल व्हावे यासंबंधित चर्चा.
14. बोरीवली गोराई मनोरीला जोडणाऱ्या पुलाचे निर्माण तसेच सभोवतील सरकारी जमीनीवरील अनधिकृत अतिक्रमण निष्काशीत करण्यात यावे ही मागणी केली.
15. राज्यातील सर्व शासकीय शाळांमधील बंद वीजपुरवठा सुरु करण्यासाठी मागणी केली.
16. गोराई गावातील पिण्याच्या पाण्याबद्दल, गोराई व मनोरी येथील आदिवासी पाड्यांमध्ये छोटी संग्रहालये व्हावीत अशी मागणी केली.
17. मुंबईतील बंद पडलेल्या गिरणी कामगारांना न्याय देण्याची मागणी केली.
18. रेशन कार्ड व थंब बद्दल प्रश्न उपस्थित केला. तसेच महात्मा फुले नगर येथील अपात्र रहिवाशांना घरे मिळावीत अशी मागणी केली.
19. मॅनग्रोव्ह फॉरेस्ट पार्कच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणे बाबत
20. मनोरी येथे मच्छीमार बांधवांसाठी कोल्ड स्टोरेज, गोराई व मनोरी येथे पर्यटनाचा विकास व गोराई येथे पोलीस स्टेशनची इमारत उभारण्याबाबत
21. भीम नगर विभागातील नाल्यांची दुरवस्था व नाल्याजवळील झोपडपट्टी संबंधित
22. मुंबईतील विद्यापीठांना व महाविद्यालयांना स्वायत्तता देणे बाबत, शैक्षणिक संस्थांच्या इमारतींची उंची व चटई क्षेत्र, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क समितीच्या नियमात तसेच क्लस्टर युनिव्हर्सिटी व व्हर्टिकल युनिव्हर्सिटी बाबत
23. बीडीडी चाळीचा पुनर्विकास , पोलिसांना घरे मिळण्याबाबत तसेच दुकानदारांना न्याय मिळवून देण्याबाबत लक्षवेधीच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केले.
24. गिरणी कामगारांच्या पात्र अपात्रतेबाबत, वेळेत घर मिळणे बाबत, गिरण्यांच्या जमिनीवर असलेल्या चाळींचा पुनर्विकास याबाबत.

## प्रस्तावित कामे

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४

# गरज बदलत्या काळाची...होईल पहाट नव्या युगाची !

## मतदार संघाच्या विकासात कल्पकता व नाविन्यपुर्णतेची कास धरून अंगीकारलेली प्रस्तावित कामे

### PROPOSED DESIGN OF YOGA PARK, OPPOSITE SHIVSHRUSHTI, BORIVALI (W)




### PROPOSED LOTUS TALAO AT GORAI-MANORI RD, MUMBAI




### PROPOSED PLAN FOR RG-1, YOGI NAGAR, BORIVALI (W)



### PROPOSED DESIGN OF VARAN TALAO AT VILLAGE MANORI, MUMBAI



Proposed Design of Varan Talao at Village Manori, Mumbai

### PROPOSED DESIGN FOR MHB TALAO, MUMBAI




वरील सर्व कामे प्रस्तावित असून त्यांची परवानगी तसेच शासन आणि विविध खात्यांअंतर्गत येणाऱ्या मान्यता घेवून प्रस्तावित निधी मधून करण्यात येतील.

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-४

## प्रस्तावित कामे

# गरज बदलत्या काळाची...होईल पहाट नव्या युगाची !

### मतदार संघाच्या विकासात कल्पकता व नाविन्यपुर्णतेची कास धरून अंगीकारलेली प्रस्तावित कामे

**PROPOSED BEAUTIFICATION OF SWAMI VIVEKANANDA ROAD, BORIVALI (W)**



**PROPOSED BEAUTIFICATION OF PRAGATI MAIDAN, KANDIVALI (W)**




**PROPOSED PLAN FOR RG-1, YOGI NAGAR, BORIVALI (W)**



**PROPOSED PLAN FOR RG-2, YOGI NAGAR, BORIVALI (W)**



वरील सर्व कामे प्रस्तावित असून त्यांची परवानगी तसेच शासन आणि विविध खात्यांअंतर्गत येणाऱ्या मान्यता घेवून प्रस्तावित निधी मधून करण्यात येतील.

# सिंहावलोकन... कार्यअहवाल प्रकाशनाचे !

https://sunilrane.com/3YEARSKARYAAHWAL20,21,22.pdf
मागील तीन वर्षांच्या कार्यअहवालासाठी QR स्कॅन करा

https://youtube.com/@SunilRaneBJP
विधिमंडळात केलेली भाषणे व विविध विषयांवर नागरिकांशी केलेले संवाद ऐकण्यासाठी Link आणि QR Code स्कॅन करा.

## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2019-20






## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2020-21






## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2021-22












कार्यसंकल्प-1



कार्यसंकल्प-2



कार्यसंकल्प-3



सेवा स्वीकारावी, विनम्रतेने...
सुनिल दत्तात्रय राणे
आमदार- बोरीवली विधानसभा
सरचिटणीस- भाजपा मुंबई
https://sunilrane.com/3YEARSKARYAAHWAL20,21,22.pdf
मागील तीन वर्षाच्या कार्यअहवालासाठी QR स्कॅन करा
https://youtube.com/@SunilRaneBJP
विधिमंडळात केलेली भाषणे व विविध विषयांवर नागरिकांशी केलेले संवाद ऐकण्यासाठी Link आणि QR Code स्कॅन करा.
पत्ता : जमुना दर्शन, नाटकवाला लेन, बोरीवली (प.), मुंबई - ४०० ०९२.
संपर्क : ०२२ - २८०७ ६५६५ | ईमेल : sunilrane2013@gmail.com
helpdesksunilrane@gmail.com
MLASUNILRANE
SUNILRANEBJP
SUNILRANE_BJP
SunilRaneBJP
Mansi Impression


भारतीय जनता पार्टी
बोरीवली विधानसभा
गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !
कार्य अहवाल -
२०१९-२० : पहिले वर्ष,
२०२०-२१ : दुसरे वर्ष,
२०२१-२२ : तिसरे वर्ष
सुनिल दत्तात्रय राणे
आमदार
श्री.सुरेंद्र गुप्ता
मंडळ अध्यक्ष
सौ.रेश्मा निवळे
महिला मोर्चा अध्यक्षा
श्री.नैनेश शाह
अध्यक्ष युवा मोर्चा


हित गुज
जनतेचे
विकासाचे

# शुभसंदेश



एकनाथ संभाजी शिंदे
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
14 OCT 2022

**शुभेच्छा**

बोरीवली विधानसभा मतदार संघात आमदार श्री.सुनिल राणे यांनी केलेल्या कार्याचा वार्षिक अहवाल प्रकाशित होत असल्याचे वाचून आनंद झाला.

लोकप्रतिनिधी म्हणून काम करतांना आपण विविध योजना, विकासकामांसाठी मतदारसंघात निधी आणत असतो. मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असतांना त्याबाबतची माहिती देखील नागरिकांपर्यंत पर्यंत पोहचणे आवश्यक आहे. या वार्षिक अहवालाच्या माध्यमातून आपण आपले कार्य मतदारांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करत आहात, हे कौतुकास्पद आहे.

आमदार श्री.सुनिल राणे यांच्या वार्षिक अहवाल प्रकाशनास मन:पूर्वक शुभेच्छा!

(एकनाथ संभाजी शिंदे)

दूरध्वनी : ०२२-२२०२५१५१/२२०२५२२२, फॅक्स : ०२२-२२०२९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in



सत्यमेव जयते

**उप मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**

दि. १३/१०/२०२२

**शुभेच्छा!**

बोरीवली विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत असलेले सुनिल दत्तात्रय राणे आपल्या मतदारसंघातील वर्षभराच्या विकासकामांचा आढावा घेणारे पुस्तक प्रकाशित करत असल्याचे कळले.

कार्यक्षम लोकप्रतिनिधी कायमच आपल्या मतदारसंघात विविध लोककल्याणकारी योजना व उपक्रम राबवून विकास घडवून आणतो. सर्वसामान्यांच्या अडचणी, त्यांच्या प्रश्नांची जाण व त्या सोडविण्याची तळमळ असलेले सुनिल राणे यांनी एक संवेदनशील व लोकाभिमुख लोकप्रतिनिधीची ओळख जपली आहे. वर्षभरातील आपल्या कार्याचा लेखाजोखा दरवर्षी जनतेसमोर मांडण्याचा सुनिल राणे यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. यापुढील काळातही राणे यांच्या हातून विविध लोकोपयोगी उपक्रम राबवले जातील, असा मला विश्वास आहे.

आमदार सुनिल राणे यांच्या २०२१-२२ च्या वार्षिक अहवालाला अनेकानेक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

# शुभसंदेश



मंत्री
पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक 18 OCT 2022

## शुभ संदेश

बोरीवली विधानसभेचे जनप्रतिनिधी आणि जनसेवक आमदार म्हणून, जे आपण काम करीत आहात, त्याचा तिसऱ्या वर्षाचा कार्य अहवाल प्रकाशित होत आहे, त्याचा मला आनंद होत आहे.

बोरीवली विधानसभा क्षेत्र हे भाजपाचा बालेकिल्ला असलेला मतदार संघ आहे. या मतदार संघातील जनतेने वर्षानुवर्षे विश्वास दाखविला आहे, त्यामुळे या मतदार संघाचे नेतृत्व करताना आपण त्याला न्याय देत, गेली तीन वर्षे, यशस्वी लोकप्रतिनिधी म्हणून केलेले काम, जनतेच्या पसंतीस उतरणारेच आहे, त्याबद्दल आपले कौतुक.

आपल्या विभागातील नागरिकांना मुलभूत गरजा उपलब्ध करुन देण्यासाठी आपण अथक परिश्रम करीत आहात. आपण केलेले सामाजिक, शैक्षणिक कार्य तसेच कोरोना काळात जनतेच्या सेवेसाठी मदतीला धावून जाणारे आपले नेतृत्व आम्हास ज्ञात आहे. आश्वासक नेतृत्व म्हणून आपली जनमाणसात ओळख असून जनसेवक म्हणून यापुढील कार्यास माझ्या मनापासून शुभेच्छा.

मंगल प्रभात लोढा
(मंगलप्रभात लोढा)



आमदार
**ॲड. आशिष शेलार** B.Sc., LL.B.
वांद्रे (पश्चिम) विधानसभा
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, मुंबई
माजी मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण

दिनांक : ११/१०/२०२२

प्रति,
मा. श्री. सुनिल राणे
आमदार,
बोरिवली विधानसभा

सस्नेह नमस्कार,

बोरिवली विधानसभेचे जनप्रतिनिधी आणि जनसेवक आमदार म्हणून जे आपण काम करीत आहात त्याचा तिसऱ्या वर्षाचा कार्यअहवाल प्रकाशित होत आहे. त्याचा मला आनंद होत आहे.

आपण सगळेच जण संघ शिस्तीत वाढलेलो आहोत. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या कार्यपद्धतीप्रमाणे जनसेवक म्हणून काम करीत आहोत. जे काम आपण केले त्याचा कार्यअहवाल दरवर्षी ज्या जनतेने आपल्याला निवडून दिले त्यांच्या समोर ठेवण्याची आपली परंपरा आहे. आपण त्यानुसारच हा आपला अहवाल प्रकाशित करीत आहात त्याला माझ्या खूप खूप शुभेच्छा.

बोरिवली विधानसभा क्षेत्र हे भाजपाचा बालेकिल्ला असलेला मतदार संघ आहे. या मतदार संघातील जनतेने वर्षानुवर्षे भाजपावर विश्वास दाखविला आहे. त्यामुळे या मतदार संघाचे नेतृत्व करताना आपल्यावर नक्कीच अधिकची जबाबदारी आली आहे. आपण त्याला न्याय देत गेली तीन वर्षे यशस्वी लोकप्रतिनिधी म्हणून केलेले काम जनतेच्या पसंतीस उतरणारेच आहे. त्याबद्दल आपले कौतुक.

कोरोना काळात जनतेच्या सेवेसाठी मदतीला धावून जाणारे आपले नेतृत्व आम्हास ज्ञात आहे. तसेच आपण कोरोना नंतर जनतेला पुन्हा धीर देऊन सण-उत्सवाच्या माध्यमातून पुन्हा जनतेला उभे करण्यासाठी व आपली धार्मिक सणांची परंपरा जोपासण्यासाठी घेतलेला पुढाकार ही बाबही अत्यंत उल्लेखनिय आहे. आक्रमक व आश्वासक नेतृत्व म्हणून आपली जनमाणसात ओळख असून जनसेवक म्हणून यापुढील कार्यास माझ्या मनापासून शुभेच्छा.

धन्यवाद.

आपला

ॲड. आशिष शेलार

Website: advashishshelar.in | AdvocateAshishShelar | Shelar Ashish • Email: bjpbandrawest@gmail.com



सदस्य संसदीय समिती :
वित्त समिती

**गोपाल शेट्टी**
खासदार - लोकसभा
(उत्तर मुंबई)

प्रति,
श्री सुनिल राणे जी
आमदार, बोरीवली विधानसभा

दिनांक : १८/१०/२०२२

महोदय,

सर्वप्रथम आपल्या आमदार म्हणून सन २०२१/२०२२ च्या अहवालाच्या प्रकाशनाबद्दल शुभेच्छा व अभिनंदन. भारतीय जनता पक्षाच्या परंपरेस अनुसरून आपण आपला सेवा वृत्तांत सादर करीत आहात ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे.

आपण आपल्या मतदार संघात मुलींसाठी सायकल वाटप, गोराई गावातील स्थानिकांना घर दुरुस्तीबाबत सहकार्य, सहकारी गृहनिर्माण सोसायटीत लादीकरण, गरीब रुग्णांना हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळण्यास सहकार्य, गरजु विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत, लसीकरण मोहीम, रक्तदान शिबीर, मोफत आरोग्य शिबीर, अन्नदान वाटप अशा विविध कामामार्फत जनप्रतिनिधीचा धर्म निभावलात. आपल्या ह्या आमदार पदाच्या कार्यकाळात आपण अनेक प्रलंबित कामे मार्गी लावलीत तर काही प्रगतीपथावर आहेत. हे मी जवळून पाहिले आहे.

आपल्या पुढील राजकीय व सेवाभावी जिवनात आपणास सुयश चिंतीतो व आपणास मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

धन्यवाद.

आपला,
गोपाल शेट्टी

मुंबई कार्यालय : शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०६७.
फोन : ०२२-२८०६९९६७ • ०२२-२८०७९१८२ ई-मेल: helpdeskgopalshetty@gmail.com

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-3

# मनोगत

भारतीय जनता पार्टीच्या पक्ष नेतृत्वाने सन 2019च्या विधानसभा निवडणुकीत मला मुंबईतील बोरिवली विधानसभा मतदार संघातून उमेदवारी दिली व बोरिवली मधील जनतेने माझ्यावर विश्वास ठेवून मला आमदार म्हणून निवडून दिले. निवडून आल्या नंतर सातत्याने मतदारसंघाचा दौरा करून बोरिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी अविरत प्रयत्न करत आहे. हे काम करण्यासाठी मला भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व जनतेने दिलेली साथ मला मोलाची वाटते. अनेक विकास कामाच्या माध्यमातून जनतेचा विश्वास सार्थ करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करत आहे.

बोरिवली मतदारसंघातील विकास कार्यात सुरक्षा भिंत बांधणी, मैदानाचा विकास व नूतनीकरण, अनके ठिकाणी लादीकरण, सीसीटीव्ही कॅमेरे व सौरदिवे बसविणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, ' बेटी बचाओ , बेटी पढाओ' या अभियानातंर्गत मुलींना सायकलिंचे व लॅपटॉप चे वाटप, आधुनिक वाचनालयाची निर्मिती, वेगवेगळ्या भागांचे व चौकाचे सुशोभीकरण, पूल, रस्ते डांबरीकरण केले व अनेक कामे सुरु आहेत, नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिरांचे सतत आयोजन, तसेच गोराई व मनोरी येथील नागरिकांसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली, आदीवासी बांधवाना पक्की घरे बांधून देण्याचे काम सुरु आहे, ग्रामीण भागातील महिलांना शिलाई मशिनचे वाटप , विभागातील झोपडपट्टीतील (एस.आर.ए) समस्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्न. बोरीवलीमध्ये विविध खेळाची मैदाने विकसित केली, खेल महोत्सव, खादी महोत्सव, नवरात्री उत्सव यासहीत दहीहंडी व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. गोराई व चारकोप येथील जुनी पाण्याची पाईप लाईन बदलून सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत करण्याबाबत निधी उपलब्ध व्हावा, बोरिवलीत सुपरस्पेश्यालिटी हॉस्पिटल व्हावे, अशा प्रकारच्या विविध मागण्या बोरिवलीच्या विकासासाठी विधिमंडळ अधिवेशनात सातत्याने केल्या तसेच नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी अनेक लढे उभारले.

युध्दात वीरमरण आलेल्या शूर जवानांच्या मुलींसाठी अथर्व फाउंडेशनच्या वतीने लॅपटॉप चे देशभर मोफत वाटप करण्यात येत आहे तसेच माजी सैनिकांसाठी व त्यांच्या कुटुंबासाठी नॉर्थईस्ट राज्यातील सैनिक बोर्डांना रुग्णवाहिका भेट देण्यात आल्या आहेत.

बोरिवलीची जनता तसेच भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते बोरिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी मला सहकार्य करत आहेत आणि यापुढेही करतील,अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो.

धन्यवाद!

जय हिंद !

आपला,

सुनिल दत्तात्रय राणे
आमदार, बोरिवली विधानसभा

भारतीय जनता पार्टी
बोरीवली विधानसभा



## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

15 ऑगस्ट 1947 रोजी आपला भारत देश स्वतंत्र्य होऊन आज आपण 75 व्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहोत. या आनंद सोहळ्याचे चैतन्य प्रत्येक भारतीयांच्या मनामनात फुलाविण्याकरिता भारताचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांनी हर घर तिरंगा या अभियानाची साद घातली. यालाच प्रतिसाद देत आमदार सुनील राणे यांच्या वतीने भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले यात मुंबई पोलीसांचा सहभाग लाभला. तसेच प्रभागातील नागरिकांच्या घरोघरी जाऊन तिरंगा ध्वजाचे वितरण करण्यात आले.

75 आज़ादी का अमृत महोत्सव

















## व्यर्थ न हो बलिदान शहिदांचे !

कारगील युद्धात भारतीय सेनेने केवळ शत्रूची नांगीच ठेचली नाही तर बळकावलेला भूभाग आणि महत्त्वाच्या टेकड्याही परत मिळवल्या. भारतीय सेनेने त्या युद्धात दाखवलेल्या अतुलनीय शौर्याचा गौरव म्हणून कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येतो. त्या युद्धात वीरमरण आलेल्या योद्ध्यांना श्रद्धांजली आणि विजयी योद्ध्यांचा यथोचित सत्कार केला जातो. कारगिल युध्दात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या निवृत्त कमांडोंशी संवाद साधला. तसेच माजी सैनिकांसाठी व त्यांच्या कुटुंबासाठी मणिपूर, सिक्कीम आणि नागालँड येथील राज्य सैनिक बोर्डांना रुग्णवाहिका भेट देण्यात आल्या आहेत. बेटी बचाओ ,बेटी पढाओ अभियानांतर्गत युध्दात वीरमरण आलेल्या शूर जवानांच्या मुलींसाठी लॅपटॉप चे देशभर मोफत वाटप करण्यात येत आहे.

























## वाचनाने समृद्धी, विचाराने श्रीमंती, ज्ञानाने कल्पनाशक्ती बहरते.

उत्कृष्ट ग्रंथसंपदा हे सांस्कृतिक संपन्नतेचे लक्षण आहे. सध्याच्या ज्ञान आणि विज्ञान युगात "वाचेल तो वाचेल " असे म्हटले तर वावगे ठरु नये, तरुण पिढीला, विद्यार्थ्यांना वाचनाची आवड असणे म्हणजे समाजाची ज्ञानसंपन्नतेकडे वाटचाल असणे याकरिता न्यू एम.एच.बी. कॉलनी येथे विविध पुस्तकांनी, साहित्याने सुसज्ज अश्या आधुनिक स्वामी विवेकानंद लायब्ररी आणि आर्ट सेंटरचे निर्माण करण्यात आले. याचे उद्घाटन तत्कालीन विरोधीपक्ष नेते मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.











## कर्तव्याला जोड इच्छाशक्तीची... तेथे गंगा वाहते विकासाची!

नागरिकांच्या मुलभूत गरजा म्हणजे पाणी, वीज, रस्ते, शौचालय. झोपडपट्टी विभागातील याच गरजा नागरिकांना तीव्रतेने जाणवतात याच बरोबर येथील अरुंद गल्ल्या व सांडपाण्याचा निचरा हा महत्वाचा प्रश्न याकरिता अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये तसेच झोपडपट्ट्यांमध्ये अरुंद रस्त्यांवर लादिकरणाचे व सांडपाण्याचा निचरा होण्याकरिता पावसाळी गटारे बांधली. लादिकरणामुळे वस्तीची शोभा वाढली व स्वच्छता निदर्शनास आली.

### मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लादीकरण, ड्रेनेज जोडणी, नुतनीकरणाचे काम









## मतदार संघातील विविध सोसायट्यांमध्ये लादीकरण, ड्रेनेज जोडणी, शौचालय नुतनीकरण व पुनर्बांधणीचे काम





















## बोरिवली मधील एका मैदानाचे सुशोभीकरण तसेच येथे वेगवेगळ्या खेळांचे प्रशिक्षण मिळणार असून विविध सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.







## देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करणारा प्रगतीपथावर असलेला गोराई येथील कांदळवन प्रकल्प (2023 पर्यंत प्रकल्प पूर्णत्वास येणार.)





## स्वामी विवेकानंद चौक, गोरा गांधी, बोरीवली प. येथील स्वामी विवेकानंद स्मारकाचे सुशोभीकरणाचे काम चालू असून 2022 पर्यंत पूर्णत्वास.









योगीनगर ते जयराज नगर यांना जोडणारा रस्ता विकसित केला.

## गोखले रोड ते धर्मानगर कच्छी ग्राउंड येथील रस्त्याचे डांबरीकरण





## मतदार संघात विविध ठिकाणी रस्त्यांवर, चौकात सुरक्षेसाठी सीसीटीवी कॅमेरे बसविण्यात आले.

















## गोराई जेट्टी व गोराई गाव हळवार पाखाडी येथे सौर दिवे बसविण्यात आले.










# नागरिकांच्या समस्यांचे निवेदन, त्याचे त्वरित निराकरण !








Golden Nest Co-Op.Housing Soc. Ltd.


पद्माबाई चाळ वेल्फेअर कमेटी


चारकोप (१) राजदिप को.-ऑप. हौसिंग सोसा. लि., मुंबई


RADHESHYAM APARTMENT CO-OP. HOUSING SOC. LTD.


SHREE GANESH COMPLEX CO-OP HSG. SOCIETY LTD


CHIKOOWADI RESIDENT'S WELFARE ASSOCIATION


SATRA PARK CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.


रेलनगर वेलफेअर असोसीएशन ट्रस्ट


गोराई मच्छिमार सहकारी संस्था लिमिटेड



# आमदार श्री.सुनील राणे यांच्या विकासनिधीतून झालेली कामे

- प्लॉट क्र.56/58, ओम कृपा सोसायटी येथे लादीकरण
- बोरीवली पूर्व येथे जनसंपर्क कार्यालय
- जुनी एमएचबी येथील हनुमान मंदिराजवळ कोटा लादीकरण
- न्यू एमएचबी कॉलनी येथे स्वामी विवेकानंद वाचनालय.
- मागठाणे येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेजवळ पेव्हर ब्लॉक.
- सिव्हिक पार्क उद्यान येथे जॉगिंग ट्रॅक.
- सत्य साई कॉम्प्लेक्स मैदानाचे सुशोभिकरण.
- पद्मा नगर येथे पदपथ व शौचालय.
- प्लॉट क्र.110, सूर्यदर्शन सोसायटी येथे लादीकरण.
- नाना पालकर स्मृती समिती कार्यालय.
- भाटीयावाडी चाळ येथे ड्रेनेज लाईन टाकणे.
- चीकुवाडी येथे स्केटिंग रिंक.
- मोठी डोंगरी येथे सुषमा दवडे यांचे घर बांधले.
- प्लॉट क्र.350/351 चारकोप येथे लादीकरण.
- प्लॉट क्र.733 येथे लादीकरण.
- प्लॉट क्र.354, चारकोप येथे लादीकरण
- प्लॉट क्र.449 येथे ड्रेनेज लाईन.सोमेश्वर एसआरए, टाटा पॉवर, प्लॉट क्र.79 येथे पाण्याची पाईपलाईन.
- कार्टर रोड नं.2,3 रस्ता दुरुस्ती .
- गोराई-2 येथील लादीकरण सोसायटी 006/133/267/138
- मनोरी कराटे स्कुल येथे शेड.
- छोटी डोंगरी येथे शेड.
- कस्तूर पार्क येथे लादीकरण.
- बोरीवली पोलीस ठाणे
- डॉन बॉस्को समोरील रामचंद्र चाळ येथे लादीकरण व ड्रेनेज.
- बोरीवली पोलीस ठाणे (लेडिज चेन्जिंग रुम व शौचालय आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक महिला यांच्या ऑफिस रुमची दुरुस्ती.
- चारकोप सेक्टर 366 काम पूर्ण झाले.
- गोराई-2 येथील लादीकरण सोसायटी 115/143
- भीमनगर गोराई 1 ते 5 गल्ली ड्रेनेज, लादीकरण, रस्ता, सर्व कामे झाली आहेत.
- चारकोप सेक्टर-5 कलावती आई भिंत बांधणे.
- तोरणा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.येथील रस्त्याचे काम.
- सार्थक सह गृह.संस्था.मर्या. गोराई-2, प्लॉट क्र.206
- प्लॉट नं.238 नवशक्ती मित्र मंडळ येथील पर्जन्यजलवाहिनीच्या नूतनीकरणाचे भूमिपूजन.
- दादा दादी गार्डन सोनेवाडी रोड, शिंपोली येथील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम.
- एक्सर रोडवरुन सुविद्या शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम.
- धनवंती को.ऑप.हौसिंग सोसा, प्लॉट नं.273, गोराई-2 येथे लादीकरण व ड्रेनेज.
- स्वस्तिक प्लॉट-19, सह.गृह.संस्था.मर्या, गोराई-1, लादीकरण व ड्रेनेज
- चोगले कुटुंबाचा श्री.विठ्ठल मारुती पंचायत विश्वस्त निधी बोरीवली (बाभई राममंदिर) लादिकरणाच्या कामाचे भूमिपूजन.
- आधार शीला को.ऑप.हौसिंग सोसा. प्लॉट नं.163 लादीकरण व ड्रेनेज
- 712, शांती निवास को.ऑप.हौसिंग सोसा. सेक्टर-7, चारकोप येथे लादीकरण व ड्रेनेज
- न्यू एमएचबी कॉलनी, सागर संगीत को.ऑप.हौसिंग.सोसा.लि. संस्थेच्या आवारातील लादीकरण व ड्रेनेजच्या कामाचे भूमिपूजन.
- पुष्पम को.ऑप.हौसिंग.सोसा.लि, प्लॉट क्र.535 लादीकरण व ड्रेनेज
- प्लॉट क्र.225, गोराई-2, यशस्वी सह.गृह.संस्था.मर्या. संस्थेच्या आवारातील लादीकरण व ड्रेनेज लाईन कामाचे भूमिपूजन

## कर्तव्याची पोच पावती











## सुरक्षा तुमची, जबाबदारी आमची !

मतदार संघातील जनतेची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासनासोबत नियमित बैठका घेऊन आणि प्रत्यक्ष परिसरांमध्ये फिरून रात्र गस्तींचा आढावा घेतला. नागरिकांची सुरक्षा लक्षात घेऊन या गस्ती वाढविण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मतदार संघातील विभागांमध्ये रात्रीच्या वेळी पथदिवे व्यवस्थित काम करतात की नाही याची पाहणी केली. संबंधित पोलिस ठाण्यांना भेटी देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशी कायदा व सुव्यवस्थेबाबत नियमित चर्चा केली जाते. सण-उत्सव या काळात ज्येष्ठांना त्रास होऊ नये, याबाबत सूचना देण्यात येतात. परिसरातील असामाजिक तत्वांवर अंकुश ठेवण्यासाठी पाठपुरावा केला.














# प्रशासकीय चर्चेतून प्रश्नांचा पाठपुरावा

निवेदने आल्यावर त्यातील प्रश्न समजून ते संबंधित प्रशासकिय विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून सोडवण्याचे काम केले जाते.




बोरीवली पोलिस स्टेशनच्या नुतनीकरणाबाबत तसेच बोरीवलीच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी महानगरपालिका 'आर-मध्य विभाग' महापालिका सहाय्यक आयुक्त यांच्यासोबत बैठक



बोरीवली विभागातील विविध समस्यांकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांसोबत बैठक




मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक व बोरीवली विधानसभेतील विविध विषयांवर चर्चा



एस.आर.ए कार्यालयात मुख्य अधिकारी यांची भेट घेऊन बोरीवली विधानसभा क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात समस्या मांडल्या.




बोरीवली विभागातील चारकोप सेक्टर-8 मधील सांडपाणी प्रकल्पातील (STP) प्रक्रिया केलेले पाणी पुन:श्च म्हाडा तसेच इतर गृहनिर्माण संस्थांना फ्लशिंग तसेच इतर वापरासाठी मिळण्याबाबत बैठक



गोराई जेट्टी येथील कांदळवनाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा



बोरीवली मतदार संघातील जनतेची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी पोलीस प्रशासनासोबत नियमित बैठक



महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत बोरीवली मतदार संघातील विविध विषयांबाबत बैठक



तहसीलदार कार्यालयातील बैठक व चर्चा


गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-3
भारतीय जनता पार्टी
बोरीवली विधानसभा
संकल्प स्वच्छतेचा
स्वच्छ, सुंदर परिसर
माझ्या विधानसभेचा !

## स्वच्छता जनतेच्या सहभागातून, सुरुवात स्वत:पासून

आदरणीय पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त, बोरिवली मतदारसंघात ‘सेवा सप्ताह’ अंतर्गत स्वच्छता अभियानाची सुरुवात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह केली. "स्वच्छ बोरीवली हरित बोरीवली" या मंत्राचे पालन करुन आम्ही आदरणीय पंतप्रधानांना बोरिवली मतदारसंघाकडून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर















## आरोग्यम् धनसंपदा !

बोरीवली विभागातील नागरिकांच्या उत्तम आरोग्यासाठी वेळोवेळी विविध ठिकाणी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करून मोफत चष्मा वितरण केले. तसेच विभागातील महिलांसाठी मोफत त्वचा तपासणी शिबिराचे आयोजन केले.














## काळजी ज्येष्ठांची...
## ओळख संस्काराची !

ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजातील आदर्श असतात. गत आयुष्यातील त्यांचे अनुभव हे आपल्यासाठी मार्गदर्शक असतात. शासनाने ज्येष्ठ नागरिकांना अनेक सोयी व सवलती दिल्या आहेत. त्या मिळवण्यासाठी आवश्यक असलेले ओळखपत्र म्हणजे ज्येष्ठ नागरिक कार्ड. बोरीवली मतदार संघातील ज्येष्ठ नागरिकांना विनामुल्य सदर ओळखपत्राचे वितरण करण्यात आले तसेच छत्र्यांचेही वाटप केले. या वडिलधाऱ्या नागरिकांचे आशीर्वाद सामाजिक जीवनात काम करताना खूपच प्रेरणादायी ठरतात.

















## जनसेवा हीच ईश्वर सेवा...

ज्या पोलिसांमुळे आपण रात्री सुखाची झोप घेतो त्या पोलिसांना रात्री गस्तीवर असताना थंडीपासून बचाव करण्याकरिता ब्लँकेटचे वाटप करण्यात आले, विमुक्त घुमती जनजाती परिषदेला प्रिंटर व कॉम्पुटरचे वाटप केले, त्याचप्रमाणे बोरीवली रेल्वेस्थानक येथील हमाल बांधवांच्या समस्या जाणून त्यांना ब्लँकेट भेट दिले. गोराई जेट्टी लॉंच येथे काम करणाऱ्या खलाशांना कपडे भेट दिले. विभागातील महिलांना साडीचे वाटप केले.















## भ्रमंतीतून जनतेशी संवाद....

लोकप्रतिनिधी हा कार्यशील व कृतीशील असावा सामाजिक बांधिलकी जपत नागरी हिताची कामे करण्यासोबत नागरिकांचे इतर प्रश्न अडचणी जाणून घेणे महत्वाचे असते ते प्रश्न शासन दरबारी मांडून त्या प्रश्नांची उकल करणे व त्या अडचणी प्रशासनाच्या माध्यमातून सोडविण्याला मी प्राधान्य दिले याकरिता प्रसंगी जनतेच्या दारात जाऊन त्यांना भेटून सभा घेऊन चर्चा करून या जनसंपर्क अभियानामार्फत सोडविण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला.
























## न्याय्य हक्कांसाठी... आंदोलन जनतेसाठी !

समाजात काम करत असताना लोकप्रतिनिधीला अनेक सामाजिक प्रश्नांसाठी संघर्ष करावा लागतो, कधी गैरव्यवस्थापनाविरोधात, कधी नागरी सुविधांसाठी तर कधी अन्यायविरोधात आवाज उठवावा लागतो यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलनेही करावी लागतात मी नेहमीच लोकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्यास मागे पुढे पहिले नाही. लढाऊ बाण्याने अन्यायाविरोधात लढा देऊन जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो.














## पोलखोल भ्रष्टाचाराचा !

भ्रष्टाचार हि आपल्या समाजाला लागलेली कीड आहे जी सर्व स्तरांवरील प्रशासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनात फोफावत चालली आहे. यात भरडला जातोय तो सर्वसामान्य कष्टकरी मुंबईकर. भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवून या भ्रष्टाचाऱ्यांच्या नांग्या वेळीच ठेचून समाजाने एकत्र येऊन याविरोधात लढा देणे गरजेचे आहे. मुंबई महानगपालिकेतील भ्रष्ट कारभाराचा यानिमित्ताने पर्दाफाश करण्यासाठी ठिकठिकाणी "भ्रष्टाचाराचा पोलखोल" या कार्यक्रमाने जनतेला एक प्रकारे जागृत करण्याचे कार्य करण्यात आले.













## खेळ आनंदाचा...उर्जा तरुणाईची !

तरुणांच्या व्यक्तिमत्वाच्या चौफेर विकासासाठी मैदानी खेळ आवश्यक असतात, याच उद्देशाने बोरीवली स्पोर्टस् अँड कल्चरल असोसिएशनच्या माध्यमातून बोरीवली खेल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले, यात कॅरम, मल्लखांब, फुटबॉल, व्हॉलीबॉल, ज्युडो, कराटे, बॉक्सिंग, किकबॉक्सिंग, स्केटिंग, मॅरेथॉन, सायकल मॅरेथॉन अशा विविध **खेळांचा** समावेश होता. बोरीवली मतदारसंघातील तरुणांसाठी हा क्रिडामहोत्सव वार्षिक आकर्षण आणि आनंदाचा भाग असतो. तसेच स्पर्धेत भाग घेतलेल्या व विजयी स्पर्धकांना बक्षिसे आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. लहान मुलांसाठी क्रिकेटचे प्रशिक्षण आणि मैदानाची सुविधा उपलब्ध करून दिली.

बोरीवली खेल महोत्सव
Borivali Sports Festival
उत्सव परंपरेचा,
आपल्या चैतन्याचा































I'm a Finisher
बोरीवली स्पोर्ट्स अँड कल्चरल असोसिएशन
सुनिल राणे
CYCLE MARATHON 2021




CHAMPIONSHIP 2021
खेल महोत्सव









## क्रांती क्रिडाविश्वातील, भाग्य बोरीवलीकरांचे केले निर्माण, अद्ययावत स्केटिंग रिंकचे !

क्रीडा क्षेत्र हे तरुणाईला नेहमीच उर्जा देण्याचं काम करतं, तरुण खेळाडूंना, त्यांच्या क्षेत्रात प्रोत्साहन देणे आवश्यक असते मग यातूनच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार होतात. पारंपारिक क्रीडा प्रकारासोबत आधुनिक क्रीडाप्रकारांना चालना देण त्याची माहिती तरुण खेळाडूंना करून देण हि काळाची गरज आहे, याच भावनेतून आमदार श्री. सुनील राणे यांच्या संकल्पनेतून व विकासनिधीतून मुं.झो.सु.मं.(म्हाडा) तर्फे बोरीवली मधील पहिले अद्ययावत स्केटिंग रिंकचे निर्माण करण्यात आले.













गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प-3



"खादी हे केवळ वस्त्र नाही तर विचार आहे तरुण पिढी खादीकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित झाली आहे. या भावनेने पुढे जाऊया आणि समाजातील दुर्बल घटकांचे कल्याण सुनिश्चित करूया."

- पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी

## माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत खादी महोत्सवाचे आयोजन




माझी खादी
स्वदेशी खादी

## वारसा लोकहिताचा, ध्यास नाविन्याचा

खादी हे संपूर्ण भारतीय बनावटीचे वस्त्र आहे जे संपूर्ण पर्यावरणपूरक असून मजबूत व टिकाऊ असून या वस्त्र निर्माणावर अनेक छोटे व्यावसायिक अवलंबून असतात त्यांना व्यवसायात हातभार लागावा, खादीचा प्रसार व प्रचार व्हावा या उद्देशाने भव्य अश्या खादी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने या महोत्सवास भेट दिली. तसेच यानिमित्त खादी फॅशन शो चे आयोजन करण्यात आले.








khadi
MAHOTSAV
THE CULTURE OF INDIA

# खादी महोत्सव


khadi
MAHOTSAV
खादी महोत्सव
men - 2022




29
SHIRAZ SENGUPTA: SARVESHWARI


Believe Arts & Crafts


Believe Arts & Crafts
नमस्ते






## प्लास्टिकचे निर्दालन हेच पर्यावरणाचे संवर्धन

प्लास्टिक हा मानवजातीच्या पर्यायाने पर्यावरणाचा सर्वात मोठा शत्रू आहे. तो या भूतलावर कधीच विनाश पावत नाही आणि निसर्गचक्रात बाधा आणत असल्यामुळे जनमानसात याची जागृती होणे आवश्यक आहे. याचे भान ठेवून बोरीवली मतदारसंघात ठिकठिकाणी प्लास्टिक मुक्त बोरीवली अभियान राबवले. प्लास्टिक पिशव्यांचा पर्याय म्हणून कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. त्याला नागरिकांकडून भरभरून प्रतिसाद लाभला.






गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प-3

# भारतीय जनता पार्टी

## बोरीवली विधानसभा



प्राधान्य विद्यार्थ्यांच्या
शिक्षणाचे
घडवू भविष्य देशाचे

## शिक्षण क्षेत्रावर जागृत नजर !

आजचे विद्यार्थी हे आपल्या देशाचे भावी नागरिक आहेत त्यांना विद्यार्थी दशेतच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले तर त्याबळावरच भावी काळात हे आपल्या देशाला प्रगतीच्या उच्च शिखरावर नेतील. याचे भान ठेऊन या विद्यार्थ्यांकरिता जेजे काही करता येईल त्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. यात शालेय साहित्याचे वाटप, सराव प्रश्नपत्रिका संचाचे वाटप, टॅब वाटप, रेनकोट वाटप तसेच आर्थिक सहकार्य केले. मनोरी, गोराई येथील दुर्गम भागातील लहान मुलामुलींना सायकल, टीशर्ट व वह्या वाटप करण्यात आले.





















## प्रोत्साहन ... विद्यार्थ्यांच्या कलागुणांना !

चारकोप आणि गोराई येथील विद्यार्थ्यांनी डान्स आणि टेक्नोलॉजी सेमीनारला उपस्थिती दर्शविली. त्याचप्रमाणे आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या शिक्षणाबाबत देशभरात राबविण्यात येत असलेल्या "बेटी बचाओ, बेटी पढाओ" या अभियानाने प्रेरित होऊन माझ्या मतदार संघातील विद्यार्थिनींना सायकल भेट देण्यात आल्या तसेच विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी लहान मुलांना स्केटिंग किटचे वाटप करण्यात आले.













# संस्कृती व परंपरेचा ठेवा जतन करण्यासाठी विविध उत्सवांचे आयोजन



## शिवरायांचे कैसे चालणे, शिवरायांचे कैसे बोलणे शिवरायांशी सलगी देणे, कैसे असे

अशा या हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा आदर्श आताच्या पिढीला नक्कीच प्रेरणादायी ठरेल यात दुमत नाही करण इतिहास हा वर्तमानाचा वाटाड्या असतो. छत्रपती शिवराय म्हणजे आचारशील, विचारशील असे उत्तुंग व्यक्तिमत्व त्यांचे कार्य यावद्चंद्र दिवाकरो सध्याच्या पिढीला मार्गदर्शक ठरण्यासाठी त्यांची ओळख आमच्या पिढीला होण्यासाठी महाराष्ट्राच्या या आराध्य दैवताला मानाचा मुजरा करून नतमस्तक होण्यासाठी शिवजयंती सोहळ्याचे आयोजन केले.





## दहीकाला उत्सव महाराष्ट्राच्या रांगड्या मातीतला एकात्मतेच प्रतिक दाखवण्याचा उत्सव

बोरीवली मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य दहीकाला महोत्सवाचे आयोजन करून आपल्या संस्कृतीचा वारसा जपण्याचा प्रयत्न केला, अनेक दहीकाला पथकांना प्रोत्साहन दिले.










## आनंदाचे समृद्धीचे... आगमन गणरायाचे

तु सुखकर्ता, तू दुखहर्ता... अश्या या सकल विघ्नांचे निवारण करणारा गणराय. गणेश चतुर्थीच्या शुभपर्वावर माझ्या निवास स्थानी विधिवत गणरायाची स्थापना केली. मागील दोन वर्षांच्या कोरोना संकटावर मात करून आपल्या सर्वांच्या घरी गणराय स्थानापन्न झाले. माझ्या मतदार संघातील अनेक घरगुती व सार्वजनिक गणरायांचे दर्शन घेतले व सर्वांना उत्तम आरोग्य लाभो तसेच सुख, समृद्धीचे पर्व सुरु होवो, अशी प्रार्थना केली.






## आदिशक्ती तू, आदिमाया तू, विश्वाची जगतजननी तू... नवरात्रोत्सव

अश्या या जगन्माता जगदंबेचा उत्सव म्हणजेच शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात नागरिकांनी साजरा केला. आमदार श्री.सुनील राणे यांच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त रंगरात्री दांडिया नाईटचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री.एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी उपस्थिती दर्शवून आई जगदंबेचे दर्शन घेतले. या कार्यक्रमास सिनेकलाकारांची उपस्थिती लाभली कार्यक्रमास नागरीकांचा भरभरुन प्रतिसाद मिळाला.








## जागर आणि मायेचा, उत्साह नवरात्रोत्सवाचा !




















## सन्मान नारीशक्तीचा...

आजच्या युगात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने स्वत:चा आगळावेगळा ठसा उमटवत आहेत असे कोणतेही क्षेत्र नाही जेथे महिलांनी आपली स्वत:ची ओळख निर्माण केलेली नाही, काही क्षेत्रात तर महिलांनी मिळवलेले यश हे नक्कीच प्रेरणादायी आहे आपल्या भारतीय संस्कृतीने नेहमीच महिलांना मानाचा दर्जा दिला आहे. सरकारने देखील महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविल्या. अश्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान व सत्कार करणे हि नेहमीच आमच्यासाठी भूषणावह बाब ठरली आहे.



गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प-3



## विधिमंडळात व्यक्त केलेले मत व विविध मागण्या




- राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दरम्यान मुंबई उपनगरातील भूमी अधिलेख विभागातील बनावट नकाशे सादर करून प्रतिबंधित क्षेत्रात जुनी बांधकामे दाखवून ती नियमित करुन देण्याचा संशयास्पद प्रकार उघड केला व त्यासंबंधी सभागृहात प्रश्न उपस्थित केले.
- राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दरम्यान राज्यातील सेवा निवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या थकबाकीचा हप्ता मिळावा त्यासंबंधी सभागृहात प्रश्न उपस्थित केला.
- विधानसभेत मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स. नं. 39, लक्ष्मीनगर व मौजे बोरीवली न. भु. क्र. 885-886 (गोराई बस डेपोच्या मागे) येथील शासकीय भूखंडावरील अतिक्रमण निष्कसित करण्यासंदर्भात सरकार व संबंधित विभागाकडून दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल व अनधिकृत बांधकामावर व संबंधित अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केला.
- मुंबई अग्निशमन दलाचे आधुनिकीकरण, नवीन केंद्राच्या उभारणीसाठी केलेल्या आर्थिक तरतुदी, कामकाज व त्रुटी संदर्भात विधानसभेत लक्षवेधी सुचनेमार्फत प्रश्न उपस्थित केला.
- पावसाळी अधिवेशनाच्या सायंकाळच्या सत्रात मुंबईकरांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या, वरळी बीडीडी चाळींचा पुनर्विकास त्यातील पोलिसांच्या घरांचा प्रश्न तसेच वरळी दूध डेअरीचे पुनरुज्जीवन, बोरीवली मधील म्हाडाच्या वसाहतींचा पुनर्विकास तेथील पिण्याच्या पाण्याची समस्या, गोराई मनोरी येथील आदिवासींना हक्काची घरे मिळावी यांसारख्या मुंबईतील विविध विषयांवर प्रश्न उपस्थित केले.
- पावसाळी अधिवेशनाच्या सत्रात बोरीवली मतदारसंघातील गोराई आणि मनोरी येथील आदिवासी पाड्यातील दवाखाने , पिण्याचे पाणी व शिक्षण यांसारख्या मूलभूत समस्या व त्या सोडवण्यासाठी शासनातर्फे मंजूर झालेला निधी व आखलेल्या योजनांवर प्रश्न उपस्थित केला.
- पावसाळी अधिवेशनाच्या सकाळच्या सत्रात राज्यातील रखडलेले, रद्द झालेले गृहनिर्माण प्रकल्प व त्यासंदर्भात महारेरा प्राधिकरणाने केलेली कार्यवाही तसेच विकासकामुळे नागरिकांना उद्भवणाऱ्या समस्या आर्थिक नुकसान याबद्दल प्रश्न उपस्थित केला.
- पावसाळी अधिवेशनाच्या सकाळच्या सत्रात कोळकेवाडी धरणातील पाण्याचा विसर्गाबद्दलचा अभ्यास गटाचा अहवाल, महाराष्ट्रातील नदी जोड प्रकल्पाची मंजुरी, रत्नागिरी जिल्ह्यातील ऑटोमेटेड रेन वर्क स्टेशन सिस्टीम स्थापना मंजुरी, वाशिष्ठी नदी मुळे आलेल्या चिपळूण शहरातील पुरात झालेले नुकसान व भविष्यातील त्यावर आखलेल्या उपाययोजना यासंबंधी प्रश्न उपस्थित केले.
- गिरणी कामगार, बीडीडी चाळ, मुंबई महानगरपालिका, पोलिसांची घरे, अशा विविध विषयांवरील प्रश्न उपस्थित केले.

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प-3

## प्रस्तावित कामे

# गरज बदलत्या काळाची...होईल पहाट नव्या युगाची !

### मतदार संघाच्या विकासात कल्पकता व नाविन्यपुर्णतेची कास धरून अंगीकारलेली प्रस्तावित कामे




CSM Statue at Gorai Jetty, Borivali (W)




Proposed Bus Stand at Gorai Jetty

### PROPOSED DESIGN OF VARAN TALAO AT VILLAGE MANORI, MUMBAI



### PROPOSED BEAUTIFICATION OF SWAMI VIVEKANANDA ROAD AT BORIVALI (W), MUMBAI






वरील सर्व कामे प्रस्तावित असून त्यांची परवानगी तसेच शासन आणि विविध खात्यांअंतर्गत येणाऱ्या मान्यता घेवून प्रस्तावित निधी मधून करण्यात येतील.

## प्रस्तावित कामे

# गरज बदलत्या काळाची...होईल पहाट नव्या युगाची !

## मतदार संघाच्या विकासात कल्पकता व नाविन्यपुर्णतेची कास धरून अंगीकारलेली प्रस्तावित कामे



Proposed Design For Park at MHB Talao, Borivali (W)

**Proposed**
Beautification at
**Gorai Jetty, Borivali (West)**







Proposed Swimming Pool. Archery & Gymnastic Centre at Rajmata Jijau Udyan, Vazira, Borivali (W)

Proposed : Gorai Mangroves-Park



**Proposed**
Beautification at
**Gorai Jetty, Borivali (West)**





Proposed Lotus Talao at Gorai-Manori Road, Gorai Village

**Proposed**
Swimming Pool & Cycling Park at
**Borivali (W), Mumbai**



**Proposed**
Jogging Track at
**Sector 8, Charkop**





वरील सर्व कामे प्रस्तावित असून त्यांची परवानगी तसेच शासन आणि विविध खात्यांअंतर्गत
येणाऱ्या मान्यता घेवून प्रस्तावित निधी मधून करण्यात येतील.

# सिंहावलोकन... कार्यअहवाल प्रकाशनाचे !

## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2019-20






## कार्यअहवाल प्रकाशन सोहळा 2020-21







सेवा स्वीकारावी, विनम्रतेने...
सुनिल दत्तात्रय राणे
आमदार- बोरीवली विधानसभा
सरचिटणीस- भाजपा मुंबई

गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प 2

## २०२०-२१

द्विवार्षिक कार्य अहवाल


विश्वासाला
पात्र ठरलेली साथ
आदर्शवत
मार्गदर्शनाचा हात !

सत्यमेव जयते

## देवेंद्र फडणवीस
**विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा**

**शुभेच्छा !**

अडचणीत सापडलेल्यांना, संकटग्रस्तांना धीर देण्याचे, मदतीला कायम धावून जाण्याचे कार्य बोरिवली मतदारसंघाचे आमदार श्री. सुनील राणे गेली अनेक वर्षे सातत्याने करीत आहेत. त्यांनी गेल्या वर्षभरात केलेल्या कार्याचा आढावा घेणारी पुस्तिका प्रकाशित होत आहे, याचा मला विशेष आनंद आहे. लोकप्रतिनिधीने आपल्या कामाचा लेखाजोखा सातत्याने मतदारांपुढे मांडलाच पाहिजे.

सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांशी त्यांची असलेली बांधिलकी निश्चितच प्रशंसनीय आहे. त्यांच्या कार्याचा आढावा या पुस्तिकेच्या माध्यमातून विस्ताराने व्यक्त झाला आहे. कोरोनामुळे निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीमध्ये आरोग्य आणि सुरक्षा याशिवाय समाजाचे मनोधैर्य टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न नक्कीच महत्वाचे आहेत. यासाठी समाजातील सर्व स्तरातील नागरिकांना वेळोवेळी मदतीचा हात देऊन आमदार श्री. सुनील राणे यांनी केलेले संकट निरसनाचे कार्य सर्वसामान्यांना मोठा दिलासा देणारे आहे.

श्री. सुनील राणे यांना भविष्यातील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

(देवेंद्र फडणवीस)

**कार्यालय :** १३३, पहिला मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२
**टेलीफोन :** ०२२-२२०२ ३५५३, **फॅक्स :** ०२२-२२०२ ८८१६

प्रविण दरेकर
विरोधी पक्षनेता. महाराष्ट्र विधानपरिषद

दि. ०९ ऑक्टोबर, २०२१

# शुभेच्छा!

जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधीने आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल सादर करणे आवश्यक आहे. ही भारतीय जनता पक्षाची परंपरादेखील आहे. त्यानुसार आपण दरवर्षी अहवाल प्रसिध्द करत असतो.

आमदार सुनील राणे यांचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. मी त्यांचे तसेच त्यांच्या कार्याचे मनापासून अभिनंदन करतो!

कोरोना महामारीचे संकट संपूर्ण जगावर घोंघावत असताना सरकारी यंत्रणा कुठेतरी जनतेला आरोग्य सुविधा पुरवण्यात कमी पडल्या, असे असताना आमदार सुनील राणे यांनी सॅनिटायझर, रेडी फूड, मास्क, अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू, गरजूपर्यंत पोहोचवण्याची सेवा अविरत दिली. श्री. सुनिल राणे यांनी पक्षाचे काम करित असताना आपल्या विधानसभा मतदारसंघात विकासाची भरीव कामे केली. विविध लोकपयोगी प्रकल्प उभारले. नागरिकांच्या प्रश्नाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने संघर्षाची भूमिका पार पाडली.

भारतीय जनता पार्टीचा एक धडाडीचा कार्यकर्ता म्हणून सुनील राणे यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे आणि यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत. यापुढेही असेच कार्य आपल्या हातून घडो, अशा शुभेच्छा देतो.

धन्यवाद!

(प्रविण दरेकर)

**प्रति,**
**आमदार श्री. सुनिल राणे**

कार्यालय : विधान भवन, मुंबई - ४०० ०३२,
टेलीफोन : ०२२-२२०४ १७०२ / २२०२ ४२६२, मोबाईल : ९८२०१ ५२४९९, ईमेल : loppravindarekar@gmail.com

## शुभसंदेश

# चंद्रकांत (दादा) पाटील

अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र
सदस्य, महाराष्ट्र विधान सभा

13 ऑक्टोबर, 2021

**शुभ संदेश**

आपण गत 2 वर्षांच्या काळात बोरिवली विधानसभा मतदार संघात केलेल्या विविध विकास कामांचा वार्षिक ``**ई-अहवाल**`` जनतेसमोर मांडत आहात, ही आनंदाची बाब आहे.

आपण सामाजिक बांधिलकी जोपासत वेळोवेळी केलेले कार्य जनतेपर्यंत पोहचविणे ही आपली जबाबदारी आहे. आपण करीत असलेले विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व लोकाभिमूख उपक्रम अभिमानास्पद आहेत.

आगामी काळातही आपण हे जनसेवेचे व्रत अधिक गतीने जोपासत विविध उपक्रमांच्या माध्यमातून अविरतपणे सामाजाची सेवा कराल, असा मला विश्वास आहे.

आपले पुनःच्छ अभिनंदन व आगामी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

आपला,

C.B.Patil

**(चंद्रकांतदादा पाटील)**

प्रति,
**श्री.सुनिल दत्तात्रय राणे**
विधानसभा सदस्य,
152 - बोरिवली विधानसभा, मुंबई

कार्यालय : सी.डी.ओ बॅरॅक नं. १, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०. दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०/४८६८७
cbpatil.bjpmaha@gmail.com
https://twitter.com/ChDadaPatil https://www.facebook.com/ChDadaPatil/
https://Instagram.com/chdadapatil http://www.youtube.com/c/ChDadaPatil

# भारतीय जनता पार्टी – मुंबई

## शुभसंदेश

दि.08.10.2021

**प्रति,**

**श्री. सुनिल राणे जी**
आमदार
बोरीवली विधानसभा

**सस्नेह नमस्कार,**

आपण बोरीवली विधानसभा मतदारसंघात आमदार म्हणून 2020-21 या कालावधित विकासाच्या दृष्टीने केलेल्या विविध लोकोपयोगी विकास कामांचा वार्षिक ई-अहवाल प्रकाशित करत आहात हे वाचून फार आनंद झाला.

बोरीवली विधानसभेतून निवडून आल्यानंतर आपण केलेली कामे अत्यंत प्रशंसनीय आहेत. आपल्या विभागातील नागरिकांना मुलभूत गरजा उपलब्ध करुन देण्यासाठी आपण अथक परिश्रम करीत आहात. आपण केलेले सामाजिक, शैक्षणिक कार्य तसेच कोरोना काळात आयोजित केलेले मेडिकल कॅम्प आयोजित करुन नागरिकांच्या स्वास्थ्याकडेही विशेष लक्ष दिले आहे. गरजुंसाठी जीवनावश्यक वस्तुंचे वाटप अशा विविध कामांचा बोरीवली विधानसभेतील जनतेने लाभ घेतला आहे

आगामी काळातही आपल्या हातून अशीच जनहिताची कामे होतील असा मला पूर्ण विश्वास आहे. आपल्या या वार्षिक ई-अहवालासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**आपला,**

मंगल प्रभात लोढा

**( आ.ॲड.मंगलप्रभात लोढा )**
अध्यक्ष

वसंत स्मृती, ३ रा मजला, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व), मुंबई - 400014.
Vasant Smruti, 3rd Floor, Dadasaheb Phalke Marg, Dadar (East), Mumbai - 400 014. दूरध्वनी / Phone : 24183141 / 24183290
फॅक्स / Fax : 2415 0462 / 2414 5528 • E-mail : mumbaibjp2@gmail.com / mumbaibjp@yahoo.co.in

गोपाल शेट्टी
खासदार - लोकसभा
(उत्तर मुंबई)

सत्यमेव जयते

दिनांक ः ०८ / १० / २०२१

प्रति ,
श्री सुनिल राणे
आमदार ,बोरीवली विधानसभा,
महाराष्ट्र राज्य .

महोदय,

सर्व प्रथम मी आपल्या व्दितीय वर्ष ई-बुक कार्यवृत्त अहवालाच्या प्रकाशनाबद्दल शुभेच्छा देतो , तसेच अभिनंदन करतो . आपण आमदार झाल्यापासून बोरीवली विधानसभा क्षेत्रातील विविध समस्यांचे अवलोकन करून जनसामान्यांना न्याय व सुख प्राप्त करण्यास सहकार्य करीत आहात हे कौतुकास्पद आहे .

हया कोरोना महामारीच्या काळात बोरीवली विधानसभा क्षेत्रात व गोराई , मनोरी या दुर्गम भागात गरजु व गरीबांना धान्य वाटप , शिजवलेले अन्न-वाटप , जास्त बिल आकारणी केलेल्या रूग्णालयावर मोर्चा, रक्तदान शिबीरे, कोरोना योध्दांचा सत्कार अशा विविध कामामार्फत जनप्रतिनिधीचा धर्म निभावलात . गोराई - मनोरी हया भागाला भेट देवून त्यांच्या समस्यांच्या समाधानासाठी आपण प्रयत्न करत आहात, तेथिल गरीब नागरीकांना पक्के घर बांधण्यास मदत करत आहात, हे कौतुकास्पद आहे .

भारतीय जनता पक्षाच्या परंपरेस अनुसरून कोरोना महामारीत ई-बुकच्या माध्यमातुन आपण आपला सेवा वृत्तांत सादर करित आहात ही अत्यंत उल्लेखनिय बाब आहे . मी त्याबद्दल आपले अभिनंदन करतो .

आपल्या कामातून व प्रयत्नातून नवीन कार्यकर्ते, मतदार, समाज पक्षासोबत जोडत आहात , आपल्या हया कार्यासाठी व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

धन्यवाद .

आपला ,

गोपाळ शेट्टी

मुंबई कार्यालय : शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर, कांदीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०६७.
फोन : ०२२-२८०८९५६७ • ०२२-२८०११८९२ ई-मेल: helpdeskgopalshetty@gmail.com

# मनोगत

भारतीय जनता पार्टीच्या पक्ष नेतृत्वाने सन 2019 च्या विधानसभा निवडणुकीत मला मुंबईतील बोरिवली विधानसभा मतदार संघातून उमेदवारी दिली व बोरिवली मधील जनतेने माझ्यावर विश्वास ठेवून मला आमदार म्हणून निवडून दिले. त्यानंतर संपूर्ण मतदारसंघाचा दौरा करून मी सर्व जनतेची भेट घेऊन बोरिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी सेवा कार्यास आरंभ केला व तो अविरत सुरु आहे. मी केलेल्या विविध विकास कार्यांचा हा द्वीवार्षिक अहवाल जनतेसमोर सादर करण्यात मला विशेष आनंद होत आहे. या प्रवासात भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व जनतेने दिलेली साथ मला मोलाची वाटते. या विकास कार्याच्या माध्यमातून जनतेचा विश्वास सार्थ करण्याचा मी प्रमाणिक प्रयत्न केला आहे.

या विकास कार्यात सुरक्षा भिंत बांधणी, मतदार संघातील मैदानांचा विकास व नूतनीकरण, विविध ठिकाणी लादीकरण, सिसिटिव्ही कॅमेरे व सौरदिवे बसवणे, दहावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, 'बेटी बचाओ, बेटी बढाओ' या अभियानांतर्गत गरीब मुलींना सायकलींचे व लॅपटॉप वाटप, अद्ययावत सोयींनी उपलब्ध आधुनिक वाचनालयाची निर्मिती, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र, वेगवेगळ्या भागांचे व चौकांचे सुशोभीकरण, पुल, रस्ते डांबरीकरण केले व हे कार्य सुरुच आहे. तसेच गोराई व मनोरी गावातील नागरिकांसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आणि येथील आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधून देण्याचे काम सुरु आहे. गोराई व चारकोप येथील जूनी पाण्याची पाईप लाइन बदलून सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत करण्याबाबत निधी उपलब्ध व्हावा, बोरिवलीत 'सुपरस्पेश्यालिटी' हॉस्पिटल व्हावे, अशा प्रकारच्या विविध मागण्या विधीमंडळ अधिवेशनात सातत्याने केल्या.

मार्च 2020 महिन्यात कोवीड-19 विषाणूचा उद्रेक झाला आणि त्याने जगाला महामारीच्या गर्तेत लोटले. या संबंधी उपाय योजनांबाबत अनेक देश संभ्रमात असताना मा. पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली भाजपा सरकारने जोमाने पावले उचलली. कोरोना महामारी संकटात बोरिवली मतदार संघात सर्व भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते आणि हितचिंतक योध्यांप्रमाणे अहोरात्र सेवा कार्य करत होते. संकट असूनही समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत मदत पोहोचली पाहिजे, या निर्धाराने आम्ही सेवा कार्य सुरु ठेवले.

या सेवा कार्यात धान्य वाटप, अन्नाचे वाटप, वरिष्ठ नागरिकांना फळे व औषधांचे वाटप, लसीकरण मोहीम, मास्कचे वितरण, सॅनिटायझर व फेस शिल्डचे वाटप, मतदार संघातील प्रत्येक वॉर्डात निर्जंतुकीकरण फवारणी केली. रुग्णालयातील कोरोनाग्रस्त रुग्णांना मदत व मार्गदर्शन केले. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने व कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमाने व मेहनतीने माझे मदत कार्य अविरत सुरु आहे. बोरिवलीची जनता यापुढेही प्रत्येक विकास व सेवा कार्यात मला सहकार्य करेल, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो, धन्यवाद !

जय हिंद !

आपला,

सुनिल दत्तात्रय राणे

आमदार, बोरिवली विधानसभा

## आरोग्यम् धनसंपदा !

कोरोनाचे संकट आणि वाढत्या महागाईमुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले आहे. गोराई व मनोरी गावात सुमारे 25000 लोक राहतात जे वैद्यकीय सुविधांपासून वंचित आहेत. ही गावे खाडीने विभक्त झाली आहेत. त्यासाठी गावातील रहिवाश्यांकरिता रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली, जेणेकरून त्यांना प्राथमिक उपचार मिळेल. कोविड काळात ऑक्सिजनचा पुरवठा कमी होत असल्याकारणाने ऑक्सिजन कॉन्संट्रेटर मशीन वाटप केले. तसेच डोळ्यांसाठी महत्वाच्या उपचाराकडे आणि चष्मा खरेदीकडेही दुर्लक्ष होत असल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. याची दखल घेत बोरिवली विभागात विविध ठिकाणी अथर्व फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रचिकित्सा शिबिर व मोफत चष्मा वाटप करण्याची संधी मिळाली. या शिबिराचा मतदार संघातील अनेक गरजू नागरिकांनी लाभ घेतला.








ऑक्सिजन कॉन्संट्रेटर मशीनचे वाटप












नेत्र चिकित्सा शिबीर व मोफत चष्मा वाटप

## स्वच्छ परिसर... आरसा सुसंस्कृत समाजाचा !

**"स्वच्छ बोरीवली, हरित बोरीवली"** आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त बोरिवली मतदारसंघात 'सेवा सप्ताह' अंतर्गत स्वच्छता अभियानाची पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह सुरुवात केली. मतदार संघ स्वच्छ आणि निरोगी राखण्यासाठी वेळोवेळी स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन नाल्यातील कचऱ्याची पाहणी केली व ते सर्व स्वच्छ करून घेतले. परिसर स्वच्छ राहावेत यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. यासाठी नागरिकांनी दिलेले योगदान विशेष उल्लेखनीय आहे. यावेळी विभागात कचऱ्याच्या डब्ब्यांचे वाटप केले.














## कायद्याचे रक्षक आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज !

पोलीस ठाण्यातील काम सुलभ आणि जलदगतीने व्हावे तसेच कामकाजामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्हावा, यासाठी  बोरिवली विभागातील एमएचबी कॉलनी, कस्तुरबा मार्ग, कांदिवली, चारकोप आणि बोरिवली (प) पोलिस ठाणे तसेच बोरिवलीतील रेल्वे सुरक्षा बल पोलीस व रेशन वितरण कार्यालयांना अद्ययावत संगणक संच, प्रिंटर, संगणकासाठी स्पीकर व वेब कॅमेरा या सर्व वस्तूंचे वितरण केले.





रेशन वितरण कार्यालयाला संगणक भेट



रेल्वे पोलीस ठाणे बोरिवली कार्यालयाला संगणक भेट









## गुणवत्तापूर्ण शिक्षणाने उजळू ज्ञानदीप !

कोणत्याही देशातील लहान मुले हे त्या देशाचे भविष्य असते. या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी मी सतत सातत्याने प्रयत्न करत आहे. गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, हा त्याचाच एक भाग आहे. मतदारसंघातील अनेक शाळांमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला. मतदारसंघातील विविध शाळांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहून विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रोत्साहन दिले. गरीब घरातील विद्यार्थ्यांना त्यांच्या विभागात जाऊन शैक्षणिक साहित्याचे म्हणजेच वह्या, कंपास बॉक्स आणि पाण्याची बाटली इत्यादी साहित्यांचे वाटप केले.













## जनसेवा हिच ईश्वर सेवा... सेवा सप्ताहाच्या माध्यमातून

सामाजिक कार्य करताना सेवावृत्ती अंगी बाणावी लागते तसेच वृत्ती ही समर्पण भावनेची असली म्हणजे लोकहितार्थ अनेक कार्य आपसुखच घडतात व संधी प्राप्त होते. आपले लाडके पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मतदारसंघात **"सेवा आणि समर्पण सप्ताहाचे"** आयोजन करण्यात आले. या अंतर्गत मतदार संघातील गरजू व शाळकरी मुला-मुलींना कपडे, खेळाचे साहित्य, खाऊ वाटप करण्यात आले.
















## बेटी बचावो, बेटी पढाओ ! मुलींना मोफत सायकल व टॅब वाटप

घरातली मुलगी शिकली की त्या कुटुंबाची पर्यायाने समाजाची व देशाची प्रगती नक्की होते. आपल्या देशात अनेक स्त्रियांनी शिक्षणाच्या बळावर आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या कर्तृत्वाचा आगळावेगळा ठसा उमटवला आहे. आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या शिक्षणाच्या बाबतीत देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अभियानाने प्रेरित होऊन, मुलींना शैक्षणिक टॅब व सायकल भेट दिली ! मुलींना डिजिटल शिक्षण मिळावे, यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील असतो. तसेच त्यांची शैक्षणिक प्रगती होऊन त्यांना चांगले आरोग्य लाभो, हीच सदिच्छा !













## एक हात मदतीचा, संकटातून सावरण्याचा !!

तौक्ते वादळामुळे कोकणाला मोठ्या प्रमाणावर फटका बसला, अशा गंभीर परिस्थितीत कोकणातील अनेक कुटुंबियांच्या घरादाराचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, त्यांचा मदतीसाठी भाजपा बोरीवली विधानसभेतर्फे मदतीचा हात पुढे करण्यात आला. तसेच गोराई मच्छिमार सहकारी संस्था लि, गोराई येथील कार्यालयाला भेट देऊन तौक्ते वादळात बोटींच्या झालेल्या नुकसानीसाठी आर्थिकरीत्या मदत केली! त्याचप्रमाणे मध्यंतरी मुंबईत झालेल्या अतीवृष्टीमुळे, बोरीवली एक्सर, सती देवी कॉलनी, येथील नागरिकांचे वैयक्तिक नुकसान झाले त्यावेळी त्यांना सुद्धा आर्थिक मदत करण्यात आली !













गोराई मच्छिमार सहकारी संस्थेला आर्थिक मदत





मध्यंतरी मुंबईत झालेल्या अतीवृष्टीमुळे, बोरीवली एक्सर, सती देवी कॉलनी, येथील नागरिकांचे वैयक्तिक नुकसान झाले त्यावेळी त्यांना आर्थिक मदत करण्यात आली !

## संघर्ष... कोरोना महामारीशी !

कोविड महामारीने जगातील जवळपास सर्वच देशांना ग्रासले. आजही या महामारी विरोधात लढा सुरु आहे. व्यापार आणि रोजगारासह सर्व कामे ठप्प झाल्यांने अनेकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. हातात पैसा नाही, घरात खायला अन्नाचा कण नाही. लोकांवर अक्षरश: भूकेने तडफडण्याची वेळ आली होती. घरातील उपाशी सदस्यांचे भूकेलेले जीव पाहून काळजाचे पाणी होत होते. अशावेळी आम्ही सर्व गरजूंना, अपंग व्यक्तींना, रस्त्यावर बूट पॉलिश करणाऱ्या नागरिकांना, पार्लर मधील महिलांना तसेच महापालिकेतील सफाई कामगारांना मोफत धान्य वाटप केले. असंख्य गरजूंना यामुळे जगण्याची उभारी मिळाली. या सेवा कार्यातून मिळालेले आशीर्वाद आमच्यासाठी लाखमोलाचे आहेत.













## जनसेवा हिच ईश्वर सेवा... सेवा सप्ताहाच्या माध्यमातून

आपले लाडके पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मतदारसंघात **"सेवा आणि समर्पण सप्ताहाचे"** आयोजन करण्यात आले. या अंतर्गत मतदार संघातील गरजू नागरिकांना, आश्रमातील अपंग मुले व वयोवृद्धांना फळे वाटप, विभागातील गरजूंना धान्य वाटप तसेच रेल्वे स्टेशनवरील हमाल बांधवांना अन्न पाकिटे वाटप करण्यात आले.











## आमदार आपल्या दारी

बोरीवली येथील नागरिकांच्या विविध समस्या जाणून त्यांचे निवारण करण्यासाठी **आमदार आपल्या दारी** ह्या उपक्रमाची सुरुवात झाली. नागरिकांनी या उपक्रमास उदंड प्रतिसाद देत आपल्या समस्यांचे निवेदन लेखी स्वरूपात दिले. ह्या उपक्रमा सोबतच नागरिकांना आयुष्यमान भारत योजनेची माहिती पुरवणे आणि जेष्ठ नागरिक ओळखपत्रासाठी नोंदणीची देखील सोय करण्यात आली, यावेळी वाहतूक पोलीस अधिकारी, सहाय्यक पोलिस निरीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका दुर्गम भाग अभियंता, झो.पु प्राधिकरण (SRA) उप अभियंता, म्हाडा त्याचबरोबर बोरिवलीतील इतर संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच माननीय पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या विचारांचा संदेश असलेले पत्रक घरोघरी वाटण्यात आले.
























आमदार आपल्या दारी या कार्यक्रमाअंतर्गत नागरिकांशी थेट त्यांच्या घरी जाऊन संवाद !

## बोरिवली परिक्रमा जनसंपर्क अभियान

नागरिकांच्या बऱ्याच समस्या अश्या असतात ज्या लोकप्रतिनिधींपर्यंत पोहचत नाही, परिणामी त्यावर उपाययोजना होत नाही. अनेक नागरिकांना काही सूचना असतात या सर्व संवादांच्या माध्यमातून सोडविता येतात. भारतीय जनता पार्टी बोरीवली विधानसभा आयोजित "बोरीवली परिक्रमा जनसंपर्क अभियान" या कार्यक्रमाच्या माध्यमातून बोरिवली मतदार संघातील सर्व वॉर्डात जनसंपर्क अभियानाद्वारे नागरिकांशी संवाद साधला व माननीय पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या विचारांचा संदेश असलेले पत्रक देण्यात आले.













## जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी लढाऊ बाणा !

जनतेला मिळणाऱ्या सुविधांवर ज्यावेळी शासनाकडून दुर्लक्ष होते तेव्हा आंदोलन हाच एक पर्याय उरतो. ओ.बी.सी. आरक्षणासाठी राज्यव्यापी चक्काजाम आंदोलन, वाढीव वीज बिलांच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन, तसेच महापालिकेवर धडक मोर्चा काढून कोरोनामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या मुंबईकरांना पाणीपट्टी कर, अग्निशमन कर, अंतर्गत रस्ते सुधारणा कर, आदींमध्ये किमान 50 टक्के सवलत, चक्रीवादळ अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या मुंबईकरांना मदत, पाचशे चौरस फुटांपर्यंतच्या सर्व सदनिकांचा मालमत्ता कर माफ, पुरेसे पाणी मिळालेच पाहिजे या सर्व समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. राज्याचे गृहमंत्र्यांवर झालेल्या आरोपावरुन त्यांनी त्वरित राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यासाठी या आंदोलनात करून तीव्र निषेध नोंदवला.















## व्यर्थ जाती सर्व उपाय, तिथे आंदोलन हाच पर्याय...

बोरीवली आर/मध्य महापालिकेतील जलविभाग अधिकाऱ्यांना पाण्याच्या समस्यांसंदर्भात जाब विचारण्यासाठी धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. बोरीवलीतील नगरसेवकांसह महिला नागरिक पाण्याचे हंडे डोक्यावर घेऊन या मोर्चात सहभागी झाले. लसींचे दोन डोस घेतलेल्या नागरिकांना रेल्वेतून प्रवास करण्यास परवानगी द्यावी याकरिता बोरिवली रेल्वेस्थानक येथे आंदोलन करण्यात आले. बंगालमध्ये कार्यकर्त्यांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या विरोधात आंदोलन केले. तसेच महात्मा फुले नगर, इंदिरा नगर व पोयसर नदी रुंदीकरणात बाधित होणाऱ्या स्थानिक झोपडीधारकांना चेंबूर येथे न पाठवता त्यांच्या हक्काचे घर स्थानिक ठिकाणीच मिळावे ह्याकरिता धरणे आंदोलनात सहभाग घेतला.






















## कर्तव्याला जोड सचोटीची, तेथे गंगा वाहते विकासाची !

आमदारांना प्राप्त होणाऱ्या निधितून विकासकामांची गंगा वाहते. आदिवासी पाड्यातील आदिवासींना नाविन्यपूर्ण पद्धतीने त्यांच्या जुन्या, मोडकळीस आलेल्या घरांच्या जागी पक्की घरे बांधून बोरीवलीतील आदिवासी पाड्यांचा विकास हाच ध्यास समोर ठेऊन रहिवासी जानकु यशवंत परेड, लक्ष्मी गोलीम, संतोष गायकवाड यांच्या घराचे काम पूर्ण झाले असून, अशी अनेक आदिवासी कुटुंबांची घरे बांधून देण्यात येणार आहे. तसेच अद्ययावत सोयींनी विकसित केलेली पत्र्यांची घरे (कंटेनर) विभागातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, गोराई गाव पोलीस ठाणे तसेच नाना पालकर स्मृती संचालित रुग्णालय यांना देण्यात आली. त्याचप्रमाणे विभागातील प्रसाधन गृहांचे नुतनीकरण करण्यात आले.

















प्रसाधन गृहाचे नुतनीकरण



## हा माझा मार्ग देखणा !

स्वच्छ व सुंदर रस्ते ही त्या शहराची एक आगळीवेगळी ओळख असते, एखाद्या शहराचा, नगराचा आर्थिक विकास होण्याकरिता तेथील रस्ते हे स्वच्छतेबरोबर पक्के म्हणजेच डांबरी किंवा सिमेंटचे असणे तितकेच महत्वाचे आहे, शहराच्या सौंदर्यातही त्याने भर पडते याकरिता मतदार संघात अनेक ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण आणि पेव्हर ब्लॉक चे काम करून सुशोभिकरण केले. मतदार संघातील विविध गृहनिर्माण संस्थांमध्ये, लादिकरण, आसन व्यवस्था (बेंचेस) आणि कचऱ्याच्या डब्यांचे वाटप करण्यात आले.


सी.के.पी. कॉलनी येथील रस्ता


चिकूवाडी शाळेमागील रस्ता




पूर्वीचा रस्ता


आताचा रस्ता







विविध सोसायटी व उद्यानामधील लादिकरण







## ध्यास...विकासाचा, दिलेल्या आश्वासनांचा !

मतदारसंघातील जनतेच्या आणि वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी रस्त्यांवर, चौकात जागोजागी बसवण्यात आलेले सिसिटिव्ही कॅमेरे नजरेस पडतात. अनेक ठिकाणी सौर उर्जेवर चालणाऱ्या एलइडी लाइटची सोय केली आहे. यामुळे पैशांची आणि उर्जेची बचत होतेच शिवाय परिसरही रात्री उजळतो. वाणी तलाव रोड, मनोरी येथे आमदार विकास निधीच्या माध्यमातून सोलार ऊर्जेवर चालणाऱ्या दिव्यांचे पोल बसवण्यात आले. मनोरी गावातील स्मशानभूमीचे नूतनीकरण दिलेल्या आश्वासनाप्रमाणे पूर्ण करण्यात आले. तसेच विभागात पाईप लाईन आणि संरक्षक भिंतीचे काम करण्यात आले.








मनोरी गाव येथील स्मशानभूमीचे नुतनीकरण












मनोरी गावात सौरउर्जेचे दिवे



## बोरिवलीत "विकास" सापडतो

बरीच वर्षे जुना, जीर्ण स्थितीत असलेला भीम नगर, गोराई येथील लोखंडी पुल मोडकळीस आला होता. नागरिकांच्या वाहतुकीस जीवघेणा व धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यावर तात्काळ उपाययोजना करून आमदार विकास निधीच्या माध्यमातून नवीन लोखंडी पुलाची निर्मिती करून देण्यात आल्याने, परिसरातील नागरिकांची होणारी गैरसोय टळली. तसेच कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे अंतर्गत, राजेंद्र नगर, बोरीवली पूर्व येथील पोलीस बीट चौकीच्या नूतनीकरणाचे काम करण्यात आले.





भीमनगर, बोरिवली (प.) येथील नविन लोखंडी पुल





भीमनगर, बोरिवली (प.) येथील प्रसाधन गृह





राजेंद्र नगर, बोरिवली (पू.) येथील पोलीस चौकीचे नुतनीकरण

## वाचनाने समृद्धी, विचाराने श्रीमंती, ज्ञानाने कल्पनाशक्ती बहरते.

मा.आमदार श्री.सुनील राणे यांच्या संकल्पनेतून व त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांतून अत्याधुनिक सोयींनी उपलब्ध असलेली स्वामी विवेकानंद लायब्ररी आणि आर्ट सेंटर विकसित करण्यात आले आहे. माणसात असलेल्या परिपूर्णतेचे प्रकटीकरण म्हणजेच शिक्षण, असा विचार मांडणारे स्वामी विवेकानंद आपल्या सर्वांसाठी स्फुर्तीप्रद आणि प्रेरणेचा स्तोत्र आहेत. शिक्षणाचा मूलभूत हेतू माणूस म्हणून घडवणे हा आहे. याचाच एक भाग म्हणून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात येणार आहे. लायब्ररीच्या माध्यमातून विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता व ज्ञानात भर पडून पुढील आयुष्य जगण्यासाठी नक्कीच प्रेरणा मिळेल.
















## जनसेवेसाठी समर्पित लोकोपयोगी उपक्रम

मतदार संघात केलेल्या सर्व कार्यांचा लेखाजोखा म्हणजेच बोरीवली मतदार संघातील कार्य अहवाल (2019-20) प्रकाशनाच्या कार्यक्रमात केलेले संबोधन व प्रकाशन समारंभात उपस्थित सर्व मान्यवर, तसेच जनसेवेसाठी समर्पित उपक्रम उदा. नागरिकांसाठी दिनदर्शिकेचे प्रकाशन, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी गोराई व चारकोप येथे संगणक प्रशिक्षण केंद्राची सुरुवात, कोविड काळात नागरिकांसाठी मोफत बस सेवा, आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या "मन कि बात" कार्यक्रमाचे आयोजन व मतदार संघातील नागरिकांसाठी मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले.



















मन कि बात कार्यक्रमाचे आयोजन




मतदार नोंदणी अभियान

## नसानसातून रक्त वाहते, ही प्राणांची शक्ती !

कोरोना महामारीच्या काळात रक्तदान शिबिरे बंद झाली. सगळ्यात जास्त रक्ताचा तुटवडा जाणवला, परिणामी रुग्णांचे हाल झाले, ही गंभीर बाब लक्षात येताच उत्तर मुंबईचे खासदार श्री.गोपाळ शेट्टी यांच्या संकल्पनेतून 5000 रक्तपिशव्या संकलित करण्याचा संकल्प यशस्वीरीत्या पूर्ण झाला, नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने रक्तदान करून या अभूतपूर्व उपक्रमास सहकार्य केले. त्यानिमित्त बोरीवली विधानसभा क्षेत्रातील विविध ठिकाणी 5000 किलो साखर वाटप करण्याचा अभिनव उपक्रम साकार करण्यात आला.











5000 किलो साखरेचे वाटप









## उपक्रम लसीकरणाचा, कोरोनाच्या निर्दालनाचा !

अथर्व फाऊंडेशन आणि जसलोक हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने गोराई व मनोरी गाव व बोरिवली विभागात विशेष कोविशिल्ड लसीकरण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत 2 हजार महिलांचे नि:शुल्क लसीकरण करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन रविवारी मिस दिवा युनिव्हर्स (2018) नेहल चुडासमा यांच्या हस्ते संपन्न झाले. तसेच महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी गुजराती टीव्ही कलाकार महेक भट्ट सुद्धा उपस्थित होती. अथर्व फाऊंडेशन तर्फे यापुर्वी गोराई गाव आणि मनोरी येथील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन मनोरी येथे तीन वेळा विशेष लसीकरण मोहिम राबवून नागरिकांचे लसीकरण यशस्वीपणे करण्यात आले. बोरिवली विभागात सुमारे 7000 पेक्षा जास्त नागरिकांनी नि:शुल्क लसीकरणाचा लाभ घेतला.




















# आयुष्यमान भारत योजना आणि छत्री वाटप

**आयुष्यमान भारतच्या लाभार्थ्यांना मिळणार स्वाभिमानाने जगण्याची नवी दिशा..!!**

भारतीय जनता पार्टी, बोरीवली विधानसभा आयोजित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना "आयुष्यमान भारत कार्ड वितरण" हा कार्यक्रम विभागात विविध ठिकाणी पार पडला. त्याचबरोबर वयोवृद्ध नागरिकांना ज्येष्ठ नागरिक ओळखपत्राचे वाटप केले. तसेच मतदार संघातील नागरिकांना मोफत छत्री वाटप करण्यात आले.



आयुष्यमान भारत कार्ड वितरण





ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र वाटप













कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यावर्षी गणेशोत्सव व नवरात्रोत्सव अत्यंत साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. देशावर आलेले कोरोनाचे संकट दूर होवो आणि सर्वांना आरोग्यमय उदंड आयुष्य लाभो अशी प्रार्थना श्री गणराया आणि अंबामाते चरणी करण्यात आली. त्याचप्रमाणे विभागात मुलांकरिता पतंग महोत्सवही आयोजित करण्यात आला. अयोध्येत श्रीरामाचे भव्य मंदिर व्हावे, याबाबत हिंदू समाजाला न्याय देणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला व राम मंदिर उभारणीचा मार्ग उघडला. संपूर्ण देशाने या निकालाचे स्वागत केले. मुंबईतही या निकालाचा जल्लोष करण्यात आला. अयोध्येमध्ये भव्य राम मंदिर निर्माण हेतू नागरिकांशी चर्चा करून निधी संकलन केले.

**देव, देश अन् धर्मासाठी, संस्कृतीच्या रक्षणासाठी !**













पतंग महोत्सवाचे आयोजन





राम मंदिर निर्माण हेतू निधी संकलन

## सुरक्षा तुमची, जबाबदारी आमची !

मतदार संघातील जनतेची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासनासोबत नियमित बैठका घेऊन आणि प्रत्यक्ष परिसरांमध्ये फिरून रात्र गस्तींचा आढावा घेतला. नागरिकांची सुरक्षा लक्षात घेऊन या गस्ती वाढविण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मतदार संघातील विभागांमध्ये रात्रीच्या वेळी पथदिवे व्यवस्थित काम करतात की नाही याची पाहणी केली. हे दिवे प्रकाशमान रहावेत यासाठी सौरउर्जा यंत्रेही बसविण्यात आली आहेत तसेच ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आले. संबंधित पोलिस ठाण्यांना भेटी देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशी कायदा व सुव्यवस्थेबाबत नियमित चर्चा केली जाते. सण-उत्सव या काळात ज्येष्ठांना त्रास होऊ नये, याबाबत सूचना देण्यात येतात. परिसरातील असामाजिक तत्वांवर अंकुश ठेवण्यासाठी पाठपुरावा केला.












## सोहळा कृतज्ञतेचा गौरव गुणीजनांचा !

"शिक्षक दिंना " च्या निमित्ताने आपले संपूर्ण आयुष्य उत्तम विदयार्थी घडवण्यासाठी समर्पित करणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा कार्यक्रम दि. 5 सप्टेंबर रोजी आयोजित करून बोरीवली शाळांमधील 32 शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तसेच आपले संपूर्ण आयुष्य मानव सेवेसाठी समर्पित करणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा "राष्ट्रीय डॉक्टर दिन" दि. 1 जुलै 2021 रोजी विट्टी इंटेरनशनल स्कूल मधील सभागृहात झाला. कोरोना महामारीच्या या कठीण काळात डॉक्टरांनी आपल्या जीवाची पर्वा न करता दिवस-रात्र रुग्ण सेवेचे कर्तव्य बजावले आहे. अशा डॉक्टरांच्या परिवारांप्रती संवेदना व्यक्त करण्यासाठी तसेच "राष्ट्रीय चिकित्सक दिवस" च्या निमित्ताने डॉक्टरांचा व वैद्यकीय क्षेत्रातील इतर कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.
























बोरीवली विभागातील 27 जैन संघाच्या प्रतिनिधींचा त्यांनी केलेल्या कोरोनाच्या भीषण महामारीच्या संकट काळात उल्लेखनीय कार्याबद्दल यथोचित सत्कार महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारीजी यांच्या शुभहस्ते राजभवन येथे करण्यात आला.

## व्यर्थ न हो बलिदान शहिदांचे !

पाकिस्तानने मुंबईवर केलेल्या भेकड दहशतवादी हल्ल्यात काही मुंबई पोलीस दलातील कर्मचारी, अधिकारी, सैनिक आणि एनएसजीच्या जवानांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. यानिमित्ताने त्यांची आठवण म्हणून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कारगील युद्धात भारतीय सेनेने केवळ शत्रूची नांगीच ठेचली नाही तर बळकावलेला भूभाग आणि महत्त्वाच्या टेकड्याही परत मिळवल्या. भारतीय सेनेने त्या युद्धात दाखवलेल्या अतुलनीय शौर्याचा गौरव म्हणून कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येतो. त्या युद्धात वीर मरण आलेल्या योद्ध्यांना श्रद्धांजली आणि विजयी योद्ध्यांचा यथोचित सत्कार केला जातो. सदर कार्यक्रम दूरदृश्यप्रणालीद्वारे करण्यात आले.





















## राष्ट्रहित सर्वोतोपरी !

**देश विविध रंगाचा, देश विविधता जपणाऱ्या एकात्मतेचा..!!**
26 जानेवारी प्रजासत्ताक दिन व 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त मतदार संघात विविध ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले.

गतीमान विकासाचा
# कार्यसंकल्प 2
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !
२०२०-२१

## श्रमंतीतून जनतेशी संवाद... संवादातून विकासाचा ध्यास!

सामाजिक कार्य करताना जनतेशी असलेली नाळ कायम राखणे व नियमित संपर्कात राहून त्यांच्या अडी-अडचणी समजून घेणे आणि त्या सोडवणे हे आमचे प्रमुख कार्य आहे. यासाठी भल्या पहाटे, सकाळी, दुपारी, रात्री उशीरा विविध भागांमध्ये श्रमंतीच्या माध्यमातून पाहणी करून व नागरिकांच्या भेटी-गाठी घेऊन त्यांच्या समस्यांची माहिती संकलित करून त्यांचे निवारण करणे हा त्याचाच एक भाग आहे. मनोरी, गोराई समुद्र किनारी स्वच्छता आणि कोळी बांधवांच्या जेट्टी व इतर समस्या सोडवल्या. विविध गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिकांशीही सतत संपर्क आणि संवाद सुरु आहे. मनपा, पोलीस प्रशासन आणि इतर शासकिय विभागांच्या माध्यमातून समस्या प्राधान्याने सोडवण्यात येत आहेत.














# नागरिकांच्या समस्यांचे निवेदन, त्याचे त्वरित निराकरण !

आमदार म्हणून जनतेचे प्रश्न सोडवतानाच विविध खासगी, शैक्षणिक संस्था अनेक गृहनिर्माण संस्थांचेही प्रश्न सामोरे येतात. काही ठिकाणी अतिक्रमणाचा मुद्दा असतो तर कुठे लादीकरण आणि मलनि:सारणाचा प्रश्न असतो. काही ठिकाणी खचलेल्या जमिनीवर भरावाची मागणी असते तर काही संस्था त्यांच्या परिसरातील रस्ता रुंदीकरणाची मागणी करतात. अनेक वेळा पिण्याच्या पाण्याची नळ जोडणी किंवा परिसरातील दिवा-बत्तीचे विषय येतात. या संस्था मतदारसंघील जनसंपर्क कार्यालयांमध्ये येऊन त्यांची निवेदने सादर करतात. त्यांचे प्रश्न हे त्यांच्या दैनंदीन जिवनाशी निगडित असल्यामुळे महत्वाचे असतात. त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांचे प्रश्न समजून घेत त्यांची निवेदने स्विकारली जातात.








BORIVALI CHAROTAR BORIN SAMAJ



RAJKAMAL CO-OP. HOUSING SOCIETY LTD.



Veena Sky Heights





Ekta Bhoomi Gardens I CHS. Ltd.
Ekta Bhoomi Gardens II CHS. Ltd.

## प्रशासकिय चर्चेतून प्रश्नांचा पाठपुरावा...

अशी निवेदने आल्यावर त्यातील प्रश्न समजून ते संबंधित प्रशासकिय विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून सोडवण्याचे काम केले जाते.






आमदार या नात्याने समाजकार्य करताना अनेक वेळा नागरिक आपल्या वैयक्तिक समस्या सुद्धा घेऊन येतात. कोणाची आर्थिक स्थिती नाजूक असते, अशा नागरिकांना वैद्यकीय मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, गरजूंना आर्थिक मदत, तसेच लसीकरणासाठी केलेली मदत ही लाख मोलाची ठरते. ज्यांच्या समस्या सुटल्या त्यांनी आमचे आभार मानत दिलेली पोचपावती हिच आमची शिदोरी.

## समस्या... त्यांचे निवारण... मिळालेली पोचपावती !





आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत मला आयुष्यमान भारत कार्ड चा लाभ झाल्याबद्दल मी ऋणी आहे.
जितेंद्र अरविंद, चारकोप सेक्टर-8



डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत केल्याबद्दल मी व माझे कुटुंब शतशः आभारी आहोत.
श्रीमती मिनाली चव्हाण, बोरिवली



मला दिलेल्या सायकलमुळे मी दररोज शाळेत ये-जा करते. त्यामुळे शाळेच्या बसचे भाडे बचत करु शकली.
कु.आर्या सुतार, बोरिवली



माझ्या पालकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे शाळेची फी भरु शकत नव्हती. फी साठी केलेल्या मदतीबद्दल धन्यवाद !
कु.अमिषा फोंडेकर, बोरिवली



माझे पती तुकाराम घाडी यांना व्हील चेअर उपलब्ध करुन दिल्याबद्दल धन्यवाद !
सौ.सुलोचना घाडी, गोराई नवशक्ती लेन



Ekta kapasi Resident of Borivali from few days searching for vaccine but was not geeting anywhere but due to Shri. Sunil Rane we got our vaccination easily.



मी दोन ठिकाणी लसीकरणासाठी गेले परंतु मला लस मिळाली नाही, आमदार श्री. सुनिल राणे यांच्यामुळे मला लस मिळाली.
धन्यवाद ! - महिला नागरिक



Thank you Sunil Rane sir for helping for Vaccination with good arrangemets for senior citizen.




The arrangements here were very nice, specially thanks to Mr. Sunil Rane ji due to him we got our vaccination done and lots of Brahmakumari's came here for vaccination.



आमचे डोळे तपासणी करून आम्हाला मोफत चष्मा मिळाला, त्याबद्दल आमदार साहेबांचे मन:पूर्वक आभार !
योगीनगर रहिवाशी.

# गरज बदलत्या काळाची...होईल पहाट नव्या युगाची !

विकासाची ध्यास त्याला कल्पकता व नाविन्यपुर्णतेची कास देऊन अंगीकारलेली प्रस्तावित कामे

## प्रस्तावित कामे



**Proposed**

**Swami Vivekanand Chowk Renovation & Beautification Borivali West**

**Proposed**
Beautification at
**Gorai Jetty, Borivali (West)**




**Proposed**
Beautification at
**Gorai Jetty, Borivali (West)**




**Proposed**
Urban Park & Jogging Track at
**Sector 8, Charkop**




**Proposed**
Swimming Pool & Cycling Park at
**Borivali (W), Mumbai**



**Proposed**
Jogging Track at
**Sector 8, Charkop**




**Proposed**
Ecological Park at
**Gorai, Borivali (West)**




**Proposed**
Swimming Pool at
**Borivali (E), Mumbai**



**वरण तलाव सुशोभीकरण, मनोरी गाव**



वरील सर्व कामे प्रस्तावित असून त्यांची परवानगी तसेच शासन आणि विविध खात्यांअंतर्गत येणाऱ्या मान्यता घेवून प्रस्तावित निधी मधून करण्यात येतील.

## जनतेचे हक्काचे आलय

आमदार सुनिल दत्तात्रय राणे यांचे

# जनसंपर्क कार्यालय



नाटकवाला लेन, बोरिवली पश्चिम येथील जनसंपर्क कार्यालय



गोराई, बोरिवली पश्चिम येथील जनसंपर्क कार्यालय




चारकोप येथील जनसंपर्क कार्यालय



मनोरी येथील जनसंपर्क कार्यालय



बोरिवली पूर्व येथील जनसंपर्क कार्यालय (OPENING SOON)

**सकारात्मक विचारांचे समाजकारण**

**येथे होते सर्व समस्यांचे निराकरण !**




**सुनिल दत्तात्रय राणे**

आमदार- बोरीवली विधानसभा
सरचिटणीस- भाजपा मुंबई

# गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प

## २०१९-२०

प्रथम कार्य अहवाल

# विश्वासाला
## पात्र ठरलेली साथ
# आदर्शवत
## मार्गदर्शनाचा हात !



# शुभसंदेश

सत्यमेव जयते

## देवेंद्र फडणवीस

**विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा**

**' शुभेच्छा संदेश '**

लोकप्रतिनिधींनी जनतेप्रती संवादी स्वरुपाचे नाते आणि उत्तरदायित्त्व कायमस्वरुपी जोपासावे असे ज्येष्ठ नेते रामभाऊ म्हाळगी नेहमीच म्हणत. प्रशासन आणि जनता यांच्यातला सलोखा समाजाचे स्वास्थ्य वाढवणारा असतो. लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यात एक सुंदर विश्वासाचे नाते निर्माण व्हावे, यासाठी आमदार श्री सुनील राणे यांनी केलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत.

पुढील काही दशकांमध्ये संपूर्ण जगात भारत हा सर्वाधिक युवकांचा देश म्हणून प्रस्थापित होणार असून त्यादृष्टिने देशातील युवकांचा आत्मविश्वास वाढावा, त्यांचा सर्वांगीण प्रगतीत सहभाग असावा, यादृष्टीने केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. या सर्वसमावेशी प्रयत्नांचे फळ म्हणून मागील ५ वर्षांमध्ये देशाचा नावलौकिक जगात उंचावला. व्यापार-उदिमापासून अर्थव्यवस्थेपर्यंत सर्व क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करत आहे. देशातील जनप्रतिनिधींनी स्वतःची जबाबदारी ओळखून केलेली प्रयत्नांची शर्थ यामुळे कोरोना सारखे आव्हान आपला देश समर्थपणे पेलू शकला, हे नाकारता येणार नाही.

चांगला बदल घडवायचा तर समाजातील सर्व स्तरातील आणि सर्व विभागातील काम करणाऱ्या लोकांच्या प्रत्यक्ष सहभागातून आणि त्यांच्या विचारातून शक्य आहे. हा बदल फक्त कार्यपद्धती, प्रशासन, धोरण यापुरताच मर्यादित नसून अभिवृत्ती, दृष्टिकोन आणि आदर्श यांच्याद्वारे घडवून आणायचे, हे ह्दयांतर आहे. यासाठी आतापर्यंत श्री राणे यांनी बोरिवली मतदारसंघात केलेल्या विकास प्रयत्नांना प्रतिबिंबित करणारा हा वार्षिक ई अहवाल नक्कीच मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांशी त्यांची असलेली बांधिलकी निश्चितच प्रशंसनीय आहे. त्यांच्या कार्याचा आढावा या पुस्तिकेच्या माध्यमातून विस्ताराने व्यक्त झाला आहे.

श्री सुनील राणे यांना भविष्यातील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

**(देवेंद्र फडणवीस)**
विरोधी पक्षनेता
महाराष्ट्र विधानसभा

**कार्यालय :** १३३, पहिला मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२
**टेलीफोन :** ०२२-२२०२ ३५५३, **फॅक्स :** ०२२-२२०२ ८८१६

**आमदार प्रविण य. दरेकर**
विरोधी पक्षनेता
विधानपरिषद महाराष्ट्र राज्य

विरोधी पक्षनेता
महाराष्ट्र विधानपरिषद

दूरध्वनी कार्यालय : २२०४ १७ ०२
: २२०२ ४२ ६२
विधान भवन : मुंबई ४०० ०३२
नागपूर ४४० ००१

# शु भ सं दे श

प्रति,

**आमदार श्री. सुनिल राणे**

दिनांक : १४ ऑक्टोबर २०२०

प्रत्येक जनप्रतिनिधीने दरवर्षी आपला 'कार्यअहवाल' सादर करणे ही भारतीय जनता पार्टीची परंपरा आहे. तिचे काटेकोरपणे पालन आपण करीत असतो.

आमदार श्री सुनिल राणे यांचे कार्य खरोखरच अभिमानास्पद आहे. त्यांचे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

कोरोनाच्या जागतिक महामारीमुळे संपूर्ण मानव जातीला एका असाधारण परिस्थितीचा आज सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीमध्ये आरोग्य आणि सुरक्षा याशिवाय समाजाचे मनोधैर्य टिकवून ठेवणेही अतिशय महत्वाचे आहे. या काळात अनेक अडचणींना समाजाला सामोरे जावे लागले. लॉकडाऊनमुळे बाहेर जाता येत नव्हते, कोरोना संसर्ग वाढू नये, यासाठी काळजी घ्यायची होती. एखाद्याला कोरोना झाला तर मदत करण्यासाठीही जाता येत नव्हते, अनेकांच्या व्यवसायावर गदा आली, उत्पन्नाचे साधन राहिले नाही. अशावेळी सरकारकडून जनतेची अपेक्षा होती. परंतु, सरकार जर पुरे पडत नसेल तर सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे येऊन जनतेला मदत करण्याची अपेक्षा असते. श्री. सुनिल राणे यांनी एक 'सेवक' म्हणून मार्च पासून सॅनिटायझर, रेडी फूड, मास्क, अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू गरजूंपर्यंत पोहोचवण्याची सेवा दिली.

भारतीय जनता पक्षाचा एक धडाडीचा कार्यकर्ता म्हणून श्री. सुनिल राणे हे निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत. यापुढेही समाजासाठी असेच कार्य आपल्या हातून घडो, अशी शुभेच्छा देतो.

धन्यवाद!

(प्रविण दरेकर)
विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद

जनसंपर्क कार्यालय: वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, गोकूळ आनंद हॉटेल जवळ, दहिसर (पूर्व), मुंबई-६८. दुरध्वनी: २८२८४९४९
निवास: सी/७०१, सातवा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, नॅशनलपार्क उड्डाणपुलाजवळ, बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६.
Email: pravinydarekar@gmail.com

चंद्रकांत (दादा) पाटील
अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र
सदस्य, महाराष्ट्र विधान सभा

# शुभ संदेश

दि. 17 ऑक्टोबर 2020

**मा. सुनीलजी राणे**
आमदार,
बोरीवली विधानसभा मतदार संघ

सस्नेह नमस्कार,

आपल्या विधानसभा मतदार संघात आपण वर्षभरात केलेल्या विविध लोकोपयोगी विकास कामांचा कार्य अहवाल प्रकाशित करीत आहात ही आपल्या कार्यकर्त्यांना प्रेरणादायी व अभिमानास्पद बाब आहे.

सदर अहवालाचे कालानुरूप आधुनिक स्वरूपात होत असलेले प्रकाशन म्हणजेच 'ई-अहवाल'ही आपल्या राज्याच्या आधुनिकतेचे प्रतीक आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आपण झटून करीत असलेल्या विविध विकास कामांची माहिती या अहवालाच्या माध्यमातून जनतेला निश्चितच होईल.

आपल्या देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी यांनी दिलेल्या "**सबका साथ सबका विकास**" या मंत्रास अनुसरून आपण जनसेवेत कार्यरत आहात हे विशेष उल्लेखनीय आहे.

जनतेच्या सेवेसाठी आपण भविष्यातही असेच काम करत राहाल, असा मला विश्वास आहे.

आपल्या ई-अहवाल प्रकाशनासाठी माझ्याकडून मनापासून शुभेच्छा !

धन्यवाद,

आपला,

C.B.Patil

( **आ.चंद्रकांतदादा पाटील** )

कार्यालय : सी.डी.ओ बॅरॅक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०. दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०/४८६८७
cbpatil.bjpmaha@gmail.com
https://twitter.com/ChDadaPatil
https://www.facebook.com/ChDadaPatil/
https://Instagram.com/chdadapatil
http://www.youtube.com/c/ChDadaPatil

शुभसंदेश

# भारतीय जनता पार्टी – मुंबई

दि.5.10.2020

## शुभसंदेश

**प्रति,**
**मा.श्री.सुनिल राणे**
आमदार

**सप्रेम नमस्कार,**

प्रत्येक जनप्रतिनिधीने दरवर्षी आपला **'कार्यअहवाल'** मतदारांना देणे ही भारतीय जनता पार्टीची परंपरा आहे. तिचे काटेकोरपणे पालन आपण करीत असतो.

पक्षाच्या विविध स्तरावर काम करीत आपण 2019 पासून **'विधानसभा सदस्य'** म्हणून बोरीवली मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहात. मतदारसंघातील प्रश्न -समस्यांची जाण करुन घेवून **'विकास कामे'** आणि **'सेवाकार्य'** आपण तत्परतेने करीत आहात.

या पत्राद्वारे मी आपणास **मनःपूर्वक शुभेच्छा** देत आहे. आपल्यासारख्या युवा जनप्रतिनिधीकडून पक्षाच्या आणि जनतेच्या अपेक्षा आपण पूर्ण कराल याची मला खात्री आहे. पुन्हा एकदा शुभेच्छा !

धन्यवाद.

**आपला,**

मंगल प्रभात लोढा

**(ॲड.मंगलप्रभात लोढा)**
अध्यक्ष

वसंत स्मृती, ३ रा मजला, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व), मुंबई - 400014.
Vasant Smruti, 3rd Floor, Dadasaheb Phalke Marg, Dadar (East), Mumbai - 400 014. दूरध्वनी / Phone : 24183141 / 24183290
फॅक्स / Fax : 2415 0462 / 2414 5528 • E-mail : mumbaibjp2@gmail.com / mumbaibjp@yahoo.co.in

# शुभसंदेश

सत्यमेव जयते

**गोपाल शेट्टी**
खासदार - लोकसभा
(उत्तर मुंबई)

दिनांक : ०४ / १० / २०२०

**प्रति ,**
**श्री सुनिल राणे जी**
**आमदार ,**
**महाराष्ट्र राज्य .**

**महोदय,**

सर्व प्रथम मी आपल्या ई-बुक कार्यवृत्त अहवालाच्या प्रकाशनाबद्दल शुभेच्छा, तसेच अभिनंदन करतो. आपण आमदार झाल्यापासून बोरीवली विधानसभा क्षेत्रातील विविध समस्यांचे अवलोकन करून निराकरण करणे व जनसामान्यांना न्याय व सुख प्राप्त करण्यास सहकार्य करीत आहात हे मी जवळुन पाहीले आहे .

आपण ह्या कोरोना महामारीच्या काळात गरजु व गरीबांना धान्य वाटप , शिजवलेले अन्न-वाटप , आर्सेनिक अल्बम गोळयाचे वाटप, जास्त बिल आकारणी केलेल्या रूग्णालयावर मोर्चा, रक्तदान शिबीरे, कोरोना याध्द्यांचा सत्कार अशा विविध कामामार्फत जनप्रतिनिधीचा धर्म निभावलात. गोराई- मनोरी ह्या भागाला भेट देवून त्यांच्या समस्यांच्या समाधानासाठी आपण प्रयत्न करत आहात, तसेच चारकोप-गोराई येथिल पाणी प्रश्न यासाठी विधानसभेत बुलंद केलेला आवाज आम्ही पाहीला आहे . आपण आमदार झाल्यापासून भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक नसलेल्या बोरीवली विधानसभेतील वॉर्ड क्र.९ व १८ ह्या प्रभागात आपले कार्यालय उघडून आमदार आपल्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात आणली , हे कौतुकास्पद आहे .

भारतीय जनता पक्षाच्या परंपरेस अनुसरून कोरोना महामारीत ई-बुकच्या माध्यमातुन आपण आपला सेवा वृत्तांत सादर करित आहात ही अत्यंत उल्लेखनिय बाब आहे . मी त्याबद्दल आपले अभिनंदन करतो .

आपल्या काम आणि प्रयत्नातून नवीन कार्यकर्ते मतदार समाज पथाबरोबर जुडतील, तसेच जुन्या कार्यकर्ता व कामाचा एक मोठा संच बोरिवली मतदार संघात निर्माण झाले आहे त्यात आणखी वाढ होईल ही अपेक्षा सहित आपणास खूप खूप शुभेच्छा !!

**धन्यवाद .**

आपला ,

गोपाळ शेट्टी

**मुंबई कार्यालय :** शेट्टी हाऊस, लोकमान्य टिळक नगर, कांदीवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०६७.
**फोन :** ०२२-२८०८९५६७ • ०२२-२८०११८९२ **ई-मेल:** helpdeskgopalshetty@gmail.com

## मनोगत

भारतीय जनता पार्टीच्या पक्ष नेतृत्वाने सन 2019 च्या विधानसभा निवडणुकीत मला मुंबईतील बोरिवली विधानसभा मतदार संघातून उमेदवारी दिली व बोरिवली मधील जनतेने माझ्यावर विश्वास ठेवून मला आमदार म्हणून निवडून दिले. त्यानंतर संपूर्ण मतदारसंघाचा दौरा करून मी सर्व जनतेची भेट घेऊन बोरिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी सेवा कार्यास आरंभ केला. मी केलेल्या विविध विकास कार्यांचा वार्षिक अहवाल जनतेसमोर सादर करण्यात मला विशेष आनंद होत आहे. या प्रवासात भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व जनतेने दिलेली साथ मला मोलाची वाटते. या विकास कार्याच्या माध्यमातून जनतेचा विश्वास सार्थ करण्याचा मी प्रमाणिक प्रयत्न केला आहे.

या विकास कार्यात सुरक्षा भिंत बांधणी, मतदार संघातील मैदानांचा विकास व नूतनीकरण, विविध ठिकाणी लादीकरण, सिसिटिव्ही कॅमेरे बसवणे, दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका संच व शैक्षणिक साहित्याचे वाटप, 'बेटी बचाओ, बेटी बढाओ' या अभियानांतर्गत गरीब मुलींना सायकलींचे वाटप, ट्रक-टँकर द्वारे पिण्याच्या पाण्याचे वाटप, शिलाई मशीन वाटप, मनोरी गाव तसेच गोराई 1 व 2 या ठिकाणी रेशनकार्डचे वाटप, गोराई व मनोरी गावातील महिलांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत पॉलिसीचे वाटप, तसेच गोराई व चारकोप येथील जूनी पाण्याची पाइप लाइन बदलून सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत करण्याबाबत निधी उपलब्ध व्हावा, बोरिवलीत 'सुपरस्पेश्यालिटी' हॉस्पिटल व्हावे, अशा प्रकारच्या विविध मागण्या विधीमंडळ अधिवेशनात सातत्याने केल्या.

मार्च महिन्यात कोवीड-19 विषाणूचा उद्रेक झाला आणि त्याने जगाला महामारीच्या गर्तेत लोटले. या संबंधी उपाय योजनांबाबत अनेक देश संभ्रमात असताना मा. पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली भाजपा सरकारने जोमाने पावले उचलली. कोरोना महामारी संकटात बोरिवली मतदार संघात सर्व भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते आणि हितचिंतक योध्यांप्रमाणे अहोरात्र सेवा कार्य करत होते. संकट असूनही समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत मदत पोहोचली पाहिजे, या निर्धाराने आम्ही सेवा कार्य सुरु ठेवले.

या सेवा कार्यात धान्य वाटप, कम्युनिटी किचनच्या माध्यमातून अन्नाचे वाटप, वरिष्ठ नागरिकांना फळे व औषधांचे वाटप, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या अर्सेनिक अल्बम गोळ्यांचे वाटप, मास्कचे वितरण, सॅनिटायझर व फेस शिल्डचे वाटप, महापालिका रूग्णालयातील कर्मचार्यांना सुरक्षेच्या दृष्टीने बुट व सँडलचे वाटप, मतदार संघातील प्रत्येक वॉर्डात निर्जंतुकीकरण फवारणी केली. रूग्णालयातील कोरोनाग्रस्त रूग्णांना मदत व मार्गदर्शन केले. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने माझे मदत कार्य अविरत सुरु आहे. बोरिवलीची जनता यापुढेही प्रत्येक विकास व सेवा कार्यात मला सहकार्य करेल, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो, धन्यवाद !

जय हिंद !

आपला,

सुनिल दत्तात्रय राणे

आमदार, बोरिवली विधानसभा

## निवडणूक आणि अपेक्षित विजय !

सन 2019 च्या विधानसभा निवडणुकीत मला 152- बोरिवली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. पक्षाने माझ्यावर टाकलेल्या जबाबदारीसाठी मी आणि पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी मनापासून प्रचाराचे काम केले. या विधानसभा मतदारसंघातील जनता आणि मतदारांनीही मला पाठिंबा आणि भरभरून आशिर्वाद दिले. याच शिदोरीच्या जोरावर मी या निवडणुकीत विजयी झालो. या विजयात पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे अमूल्य योगदान होते. माझ्या विजयानंतर संपूर्ण मतदारसंघात कार्यकर्तेआणि जनतेने मोठा जल्लोष केला. आमदार या जबाबदारीने विधानभवनाची पायरी प्रथमच चढताना मी मनोमन निश्चय केला की, पुढील पाच वर्षे विकासकामांचा सपाटा लावून माझ्या मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलेन. यासाठी आपल्या सहकार्याची आणि आशीर्वादाची अपेक्षा आहे.














गतीमान विकासाचा

**कार्यसंकल्प**

जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# गुणवत्तापूर्ण शिक्षणाने उजळू ज्ञानदीप !

कोणत्याही देशातील लहान मुले हे त्या देशाचे भविष्य असते. या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी मी सतत सातत्याने प्रयत्न करत आहे. गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, हा त्याचाच एक भाग आहे. मतदारसंघातील अनेक शाळांमध्ये हा उपक्रम गेल्या वर्षी राबवण्यात आला. मतदारसंघातील विविध शाळांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहून विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रोत्साहन दिले. गरीब घरातील विद्यार्थ्यांना त्यांच्या विभागात जाऊन शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. मतदार संघातील अनेक शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत प्रश्नपत्रिका संचाचे वाटप करण्यात आले.























गतीमान विकासाचा

**कार्यसंकल्प**

जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

## आरोग्यम् धनसंपदा !

कोरोनाचे संकट आणि वाढत्या महागाईमुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले आहे. डोळ्यांसाठी महत्वाच्या उपचाराकडे आणि चष्मा खरेदीकडेही दुर्लक्ष होत असल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. याची दाखल घेत 152-बोरिवली मतदारसंघातील राजेंद्र नगर, चारकोप, गोराई येथे अथर्व फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रचिकित्सा शिबिर व मोफत चष्मा वाटप करण्याची संधी मिळाली. या शिबिराचा मतदार संघातील अनेक गरजू नागरिकांनी लाभ घेतला. या शिबिरात तज्ज्ञ नेत्र चिकित्सकांनी गरजूंच्या डोळ्यांवरील उपचार सेवाभावनेने केले. यापुढेही असे उपक्रम सातत्याने सुरु ठेवण्याचा मनोदय आहे.
















गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# प्रोत्साहन क्रिडा गुणांना... उत्तेजन युवा पिढीला !

बोरिवली मतदारसंघातील युवा पिढीतील कला व क्रिडा गुणांना वाव मिळावा या उद्देशाने अनेक कार्यक्रम हाती घेतले. नव महाराष्ट्र संघ च्या माध्यमातून मुला-मुलींसाठी आमदार चषक कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन केले. या स्पर्धेत अनेक नामवंत संघ सहभागी झाले होते. मतदार संघातील काही मोकळ्या मैदानांची अवस्था वाईट असल्यामुळे खेळाडूंना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हे लक्षात घेऊन महापालिका आणि इतर संबंधित विभागातील अधिकाऱ्यांसह मोकळ्या क्रीडांगणांची पाहणी केली. त्यांचा सुनियोजित विकास व्हावा, यासाठी तज्ञांकडून आराखडे तयार करून घेतले. त्यासाठी संबंधित कार्यालयांकडे पाठपुरावा केला. ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी उद्यानांमध्ये पेव्हर ब्लॉकचे वॉकिंग ट्रॅक तयार केले. ज्या समस्या बाकी आहेत, त्या लवकरात लवकर सोडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.












पवनधाम जवळील उद्यान विकसित केले





कोरोना संकटामुळे राज्यातील जनतेला प्रचंड कष्ट सोसावे लागले. जिल्हांतर्गत वाहतुकीला बंदी असल्यामुळे जिवनावश्यक वस्तू, भाजीपाला आणि अन्नधान्याचा तुटवड़ा भासत होता. शेतकऱ्यांच्या शेतात भाजीपाला पिकूनही तो जनतेपर्यंत पोहोचत नव्हता आणि पोहोचलाच तर त्याला योग्य भाव मिळत नव्हता. यासाठी केंद्र सरकार आणि भाजपा तर्फे **आत्मनिर्भर किसान बाजार** या अभियानाची सुरुवात करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांचा भाजीपाला थेट जनतेच्या दारी पोहोचवण्यास मोठी मदत झाली. शेतकऱ्यांनाही उत्पादनाचा रास्त भाव मिळू लागला. अडते-दलाल यांच्या त्रासातून लवकरच शेतकऱ्यांची मुक्तता झाली. एक प्रकारे बळी राजाला न्याय मिळू लागला. या उपक्रमाला मतदारसंघातही भरघोस प्रतिसाद मिळाला.

## बळीराजाच्या उत्कर्षासाठी... जगाच्या पोशिंद्याच्या सन्मानासाठी !

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प
जनतेच्या हिताचा, कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा, पक्षाच्या संकल्पनेचा !




## एक हात मदतीचा, सामाजिक कर्तव्याचा !

कोकण किनार पट्टीला निसर्ग चक्री वादळाचा भयानक तडाखा बसला. अशा वेळी माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने रातोरात कोकणवासीयांसाठी मदत उभी करून ती थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवली. या कार्यात माझाही खारीचा वाटा होता.



गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# स्वच्छ परिसर... आरसा सुसंस्कृत समाजाचा !

'माझा कचरा माझी जबाबदारी' या धर्तीवर मतदार संघ स्वच्छ आणि निरोगी राखण्यासाठी मतदारसंघात वेळोवेळी स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे. या अंतर्गत विभागात ठिकठिकाणी रस्ते आणि परिसर स्वच्छ करण्यात आले. महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन नाल्यातील कचऱ्याची पाहणी केली व ते सर्व स्वच्छ करून घेतले. त्याच प्रमाणे जेसीबी चा वापर करून चारकोप परिसरातील कचरा आणि तलाव स्वच्छ केले. परिसर स्वच्छ राहावेत यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. यासाठी नागरिकांनी दिलेले योगदान विशेष उल्लेखनीय आहे. अश्या प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवून परिसर स्वच्छ आणि निरोगी राखण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यात सहभाग नोंदविणे ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे.













भारतीय जनता पार्टी बोरीवली विधानसभा

सामाजिक कार्य करताना जनतेशी असलेली नाळ कायम राखणे व नियमित संपर्कात राहून त्यांच्या अडी-अडचणी समजून घेणे आणि त्या सोडवणे हे आमचे प्रमुख कार्य आहे. यासाठी भल्या पहाटे, सकाळी, दुपारी, रात्री उशीरा विविध भागांमध्ये श्रमंतीच्या माध्यमातून पाहणी करून व नागरिकांच्या भेटी-गाठी घेऊन त्यांच्या समस्यांची माहिती संकलित करून, समजून घेत त्यांचे निवारण करणे हा त्याचाच एक भाग आहे. मनोरी, गोराई समुद्र किनारी स्वच्छता आणि कोळी बांधवांच्या जेट्टी व इतर समस्या सोडवल्या. विविध गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिकांना भेटून त्यांच्याशी संवाद कायम ठेवला आहे. ज्येष्ठ नागरिकांशीही सतत संपर्क आणि संवाद सुरू आहे. मनपा, पोलीस प्रशासन आणि इतर शासकिय विभागांच्या माध्यमातून समस्या प्राधान्याने सोडवण्यात येत आहेत.

# श्रमंतीतून जनतेशी संवाद... संवादातून विकासाचा ध्यास !

गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !









नागरिकांची सुरक्षा व विकासकामांकडे लक्ष देण्यासाठी रात्री उशिरा विभागामध्ये सहकाऱ्यांसह पाहणी





पाणी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सोसायटीत प्रत्यक्ष भेट व सदस्यांशी चर्चा



पाण्याची समस्या जाणून घेण्यासाठी सोसायटीतील सदस्यांची भेट घेतली



मद्यपिंकडून नागरिकांना होणाऱ्या त्रासाच्या तक्रारीवरून रात्री उशिरा पोलीस अधिकाऱ्यांसह सदर जागेला भेट देऊन पाहणी केली.



रात्री उशिरा ज्येष्ठ नागरिकांशी परिसराच्या सुरक्षेबाबत संवाद साधला



फळ विक्रेत्यांच्या समस्या जाणून घेण्याकरिता पहाटे 4 वाजता फळबाजाराला भेट देऊन फळ विक्रेत्यांशी चर्चा केली



भल्या पहाटे महानगरपालिकेसंदर्भातील नागरिकांच्या समस्या जाणून घेताना

**भारतीय जनता पार्टी** बोरीवली विधानसभा

गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# सुरक्षा तुमची, जबाबदारी आमची !

मतदार संघातील जनतेची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासनासोबत नियमित बैठका घेऊन आणि प्रत्यक्ष परिसरांमध्ये फिरुन रात्र गस्तींचा आढावा घेतला. नागरिकांची सुरक्षा ध्यानात घेऊन या गस्ती वाढविण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मतदार संघातील विभागांमध्ये रात्रीच्या वेळी पथ दिवे व्यवस्थित काम करतात याची पाहणी केली. हे दिवे प्रकाशमान रहावेत यासाठी सौरउर्जा यंत्रेही बसविण्यात आली आहेत. संबंधित पोलिस ठाण्यांना भेटी देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशी कायदा व सुव्यवस्थेबाबत नियमित चर्चा केली जाते. सण-उत्सव या काळात ज्येष्ठ नागरिकांना त्रास होऊ नये, याबाबत सूचना देण्यात येतात. तसेच परिसरातील असामाजिक तत्वांवर अंकुश ठेवण्यासाठी पाठपुरावा केला जातो.











भारतीय जनता पार्टी
बोरीवली विधानसभा






# विधिमंडळात व्यक्त केलेले मत व विविध मागण्या

- चारकोप गोराई विभागातील तळमजला, अधिक 1, अधिक 2, अधिक 3 या प्रकाराची बांधकामे नियमित करण्याबद्दल आणि चारकोप व गोराई येथील पिण्याच्या पाण्याच्या जीर्ण व जुन्या पाईपलाईन बद्दल व ड्रेनेज लाईनबद्दल.
- बी डी डी चाळीच्या विकास कार्यात गतीमानता यावी यासाठीची मागणी.
- पोलिसांच्या निवास स्थानांबद्दल सरकारची काय भूमिका आहे ?
- वरळी, मुंबई येथील दूध डेअरी बद्दल शासनाचे धोरण.
- गोराई गावामधील पोलीस स्टेशनच्या इमारती बद्दल.
- गोराई डम्पिंग ग्राउंड बद्दल कचरा वर्गीकरणाचे डेपो निर्माण केले गेले ते थांबविण्यात यावे ही मागणी.
- कोरा केंद्र बोरिवली येथील रुग्णालयाचे आरक्षण भूखंडाबद्दल निर्णय घ्यावा ही मागणी.
- गिरणी कामगारांच्या घरांच्या किंमतीचा प्रश्न.
- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली येथील विकासकार्याबद्दल तरतूद करावी ही मागणी.
- बाल सुधार गृहाची स्थिती व त्यात सुधारणा करण्याबद्दल.
- स्वस्त धान्य दुकानांमध्ये शिधावाटपामधील त्रुटींबाबत.
- कोकण विभागात पावसाचे पाणी बांध घालून अडवणे व वापर करणे याबाबत तरतूद मागणी.
- मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावरील इमारतींचे लीज संपून गेले आहे. या लीज बाबतीचे धोरण स्पष्ट करण्याबाबत.
- SRA विभागातील कामकाजाचे आमुलाग्र पद्धतीने बदलण्याची गरज.
- बोरिवली विभागातील महानगरपालिका रुग्णालयांची अवस्था व त्यात सुधारणाबद्दल कार्यवाहीची मागणी.
- कोकण विभागातील पर्यटन विकास धोरण संदर्भात सरकारची भूमिका व तरतूद करावी ही मागणी.
- मुंबई शहरामध्ये पर्यटनाचा विकास व राष्ट्रीय जलमार्ग योजना.
- मुंबई व कोकणासाठी विकासनिधीची गरज.
- कुर्ली - घोणसरी प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांना नवीन ग्रामपंचायती नागरी सुविधा देण्याबाबत.

VISIT : https://youtu.be/iyuQkNSa020

आमदार सुनिल दत्तात्रय राणे

## कर्तव्याला जोड सचोटीची, तेथे गंगा वाहते विकासाची !

आमदारांना प्राप्त होणाऱ्या  निधितून विकास कामांची गंगा वाहते. या निधीचा सदुपयोग व्हावा आणि आपल्या सुरक्षेसाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलीस दलातील महिला कर्मचाऱ्यांची कामावर होणारी कुचंबणा संपुष्टात आणण्यासाठी महिला शौचालयाची निर्मिती केली. त्याचप्रमाणे काही फिरती आणि पक्की कायमस्वरूपी शौचालयेही उपलब्ध करून दिली. याशिवाय गणेश मंदिर सेक्टर 4 येथे संरक्षण भिंत आणि संरक्षण जाळीचे काम करून दिल्याने नागरिकांनी आभार मानले. मतदार संघात अनेक ठिकाणी पेव्हर ब्लॉक चे काम करून सुशोभिकरण केले. मतदार संघातील गरीब नागरिकांसाठी पक्की शौचालये बांधली. काही ठिकाणी नागरिकांच्या सोयीसाठी सभामंडप निर्माण केले. पिण्याच्या पाण्याच्या तसेच मलनि:सारणाच्या पाइप लाइनची सोय केली.



















गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

## बोरिवलीत "विकास" सापडतो

पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदीजींनी विकासाचा मूलमंत्र दिल्यानंतर विरोधकांनी त्याची खिल्ली उडवण्याचेच काम केले पण बोरिवली विधानसभा मतदार संघाला भेट दिली तर, तुम्हाला विकास नक्कीच सापडतो. मतदारसंघातील जनतेच्या आणि वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी रस्त्यांवर, चौकात जगोजागी बसवण्यात आलेले सिसिटिव्ही कॅमेरे नजरेस पडतात. अनेक ठिकाणी सौर उर्जेवर चालणाऱ्या एलइडी लाइट ची सोय केली आहे. यामुळे पैशांची आणि उर्जेची बचत होतेच शिवाय परिसरही रात्री उजळतो. टाकाऊ मधून टिकाऊ या संकल्पनेचा वापर करत सांडपाणी संकलित करून त्यावर रासायनिक प्रक्रिया करण्यासाठी एस.टी.पी. प्लांटचा वापर होतो. या प्लांटमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून शुद्ध केलेले पाणी मतदारसंघातील उद्याने, रस्त्यांवरिल झाडे आणि क्रीडांगणासाठी वापरण्यात येत आहे.






## सकारात्मक इच्छाशक्तीला कल्पकतेची जोड मिळाली की नाविन्यपूर्ण समाजहिताची कामे होतात

एस.टी.पी. प्लांटमधून लाखो लिटर वाया जाणारे दुषित पाणी रासायनिक प्रक्रिया करून या पाण्याचा वापर बोरीवलीतील उद्यानांची निगा राखण्यासाठी करण्यात आला.







गतीमान विकासाचा

**कार्यसंकल्प**

जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी लढाऊ बाणा !

चीन च्या कुरघोड्या वाढल्याने केंद्र सरकारने अनेक चिनी वस्तूंच्या आयातीवर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला. याबाबत मतदार संघात व्यापक जनजागृती करून चिनी मालावर बहिष्कार टाकण्याची सामुहिक शपथ घेण्यात आली. शेतकऱ्यांना बी-बियाणे आणि खते माफक दरात मिळावित याकडे सरकारचे लक्ष वेधले. नागरिकता संशोधन कायद्यावरून विरोधक जनतेची दिशाभूल करत असल्यामुळे या कायद्याच्या समर्थनार्थ जनजागृती केली. संपूर्ण राज्य विविध संकटांचा सामना करत असताना राज्यकर्त्यांना जागे करण्यासाठी प्रसंगी घंटानादही केला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बद्दल अवमान कारक भाषेचा वापर करणाऱ्यांच्या विरोधात निषेध आंदोलन करून त्यांना सणसणीत चपराक लावली.














राज्यातील महिलांवर होणारे वाढते अत्याचार आणि त्याबाबत शासनाची निष्क्रियता, या विरोधात आंदोलन करून शासन कर्त्यांचे डोळे उघडले. ऐन संकटात सापडलेल्या बळीराजाला वाऱ्यावर सोडून राजकारणात रमलेल्या सरकारचा वेळोवेळी जाहिर निषेध केला. कोविड महामारीच्या संधीचा फायदा घेत बोरिवलीतील अपेक्स रुग्णालय प्रशासनाकडून कोविड रुग्णांची मनमानी पिळवणूक सुरु होती, लाखो रुपयांची बिले भरुनही रुग्णांना नाडण्यात येत होते. ही बाब समजताच पक्षाच्या वतीने रुग्णालयाच्या विरोधात आंदोलन करून प्रशासनाला वठणीवर आणले. आमचा लढा असत्या विरोधात, अन्याया विरोधात आहे आणि राज्यकर्ते जो पर्यंत भानावर येत नाहीत, तो पर्यंत तो सुरुच राहील.

**व्यर्थ जाती सर्व उपाय, तिथे आंदोलन हाच पर्याय...**

गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा, कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा, पक्षाच्या संकल्पनेचा !













गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# देव, देश अन् धर्मासाठी !

अयोध्येत श्रीरामाचे भव्य मंदिर व्हावे, याबाबत हिंदू समाजाला न्याय देणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला व राम मंदिर उभारणीचा मार्ग उघडला. संपूर्ण देशाने या निकालाचे स्वागत केले. मुंबईतही या निकालाचा जल्लोष करण्यात आला. या निर्णयाचे थाळ्या वाजवून आणि दिवे जलार्पण करून भव्य स्वागत करण्यात आले.

गणेश विसर्जन - या वर्षी कोरोना महामारीच्या संकटामुळे सोशल डिस्टन्सिंग आणि इतर नियमांमुळे घरोघरी स्थापन केलेल्या गणेश मूर्तींच्या विसर्जनाचा प्रश्न उभा ठाकला. कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन गणेश मूर्ती कृत्रिम कुंडात विसर्जित करण्याचे नागरिकांना आवाहन केले. अडचणींच्या काळातही सामाजिक बांधिलकी जपत भाजपाच्या कार्यकर्त्यांनी राबवलेल्या या उपक्रमास जनतेचे भरभरून आशीर्वाद लाभले.













## उत्सवप्रिय बोरीवलीकर

हिंदू समाजाला रामायणाची माहिती व महती कळावी, यासाठी बोरिवली मधील वीर सावरकर उद्यानात रामलीला- एक धर्मगाथा या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. वया नाटकात बालकलाकारांनी आपल्या सुंदर अभिनयाने आणि वाणीने सर्वांची मने जिंकली. या नाटकाचा शुभारंभ करण्याचे भाग्य मला मिळाले.

लहान मुलींमध्ये शास्त्रीय नृत्याची आवड निर्माण होऊन वृद्धींगत व्हावी, या उद्देशाने नृत्य महोत्सव 2020 चे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात अनेक कलाकारांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. युवा कलाकारांकडून आपल्या संस्कृतीचे जतन व्हावे, या उद्देशाने प्रख्यात अभिनेत्री आणि शास्त्रीय नृत्यांगना हेमा मालिनी यांनी या कार्यक्रमाची संकल्पना आणि रुपरेषा आखली होती. महोत्सवातील विजेत्यांना त्यांच्या हस्ते बक्षिसे वाटण्यात आली.


"रामलीला- एक धर्मगाथा" चे आयोजन






नृत्य महोत्सव 2020 चे आयोजन







गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# संघर्ष... कोरोना महामारीशी !

या वर्षाच्या पूर्वार्धात कोविड महामारीचा उदय झाला. या महामारीने जगातील जवळपास सर्वच देशांना ग्रासले. आजही या महामारी विरोधात लढा सुरु आहे. व्यापार आणि रोजगारासह सर्व कामे ठप्प झाल्यांने अनेकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. हातात पैसा नाही, घरात खायला अन्नाचा कण नाही. लोकांवर अक्षरशः भूकेने तडफडण्याची वेळ आली होती. घरातील उपाशी सदस्यांचे भूकेलेले जीव पाहून काळजाचे पाणी होत होते. अशावेळी आम्ही सर्व गरजू-गरीबांना मोफत अन्न-धान्य वाटप केले. गोराई, मनोरी सारख्या दूर्गम भागात पाड्यांवर बोटीद्वारे अन्न पोहोचवले. केवळ अन्न-धान्यच नाही तर त्यांच्या अल्पोपहाराचीही काळजी घेतली. असंख्य गरजूंना यामुळे जगण्याची उभारी मिळाली. या सेवा कार्यातून मिळालेले आशिर्वाद आमच्यासाठी लाखमोलापेक्षा कितीतरी पटीने मोलाचे आहेत.













## कोरोना संकटाशी दोन हात करणारा लढवय्या सेनानी!

ऐन उन्हाळ्यात दूर्गम भागातील लोक तहानेने व्याकुळ होते. त्यांच्यासाठी टँकरद्वारे पीण्याच्या पाण्याची सोय केली. गरजूं वृद्धांना फळे वाटप केले. घरोघरी जाऊन अर्सेनिक अल्बम गोळ्या, मास्क, सॅनिटायझरचे वाटप केले. डॉक्टर आपल्या दारी द्वारे घरोघरी जाऊन वैद्यकीय उपचार केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत पीएम केयर फंडासाठी भरीव मदत दिली. मतदारसंघात वेळोवेळी सॅनिटायझर आणि धूर फवारणी सुरु केली. पोलीस योध्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे, रुग्णांसाठी मोबाईल व्हॅनची व्यवस्था, पर राज्यातील जनतेसाठी वैद्यकीय प्रमाणपत्रे तयार करून देणे असे अनेक प्रयत्न मतदारसंघात अहोरात्र केले व अजूनही सुरु आहेत. या महामारीपासून मानव जातीला लवकरात लवकर सुटका मिळो आणि जनतेची विस्कटलेली घडी लवकर सावरो, हीच ईश्वर चरणी विनम्र प्रार्थना...






ज्येष्ठ नागरिकांना फळे वाटप



अर्सेनिक अल्बम 30 या गोळ्यांचे वाटप




"डॉक्टर आपल्या दारी" या उपक्रमाद्वारे विनामूल्य आरोग्य सेवा



पीएम केअर फंडाला आलेली मदत स्वीकारताना








परप्रांतीयांना प्रवासासाठी मोफत वैद्यकीय प्रमाणपत्र वाटप





पोलिसांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# जनसेवा हिच ईश्वर सेवा... सेवा सप्ताहाच्या माध्यमातून

आपले लाडके पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मतदारसंघात **सेवा सप्ताहाचे** आयोजन करण्यात आले. या अंतर्गत कोविड रूग्णांसाठी लोकमान्य टिळक यांच्या जयंतीचे निमित्त साधून प्लाझ्मा दान उपक्रम राबविण्यात आला. आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत मतदार संघातील गरीबआणि गरजू महिलांना शिलाई यंत्रांचे, घरघंटीचे व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेच्या पॉलीसीचे वाटप करण्यात आले. मतदार संघातील गरजू व शाळकरी मुलींना बेटी बचाओ, बेटी पढाओ या उपक्रमांतर्गत सायकलींचे वाटप केले. याशिवाय मतदार संघातील वृक्षांची संख्या वाढावी व पर्यावरणाचा समतोल कायम रहावा यासाठी विविध भागांमध्ये वृक्षारोपण आणि स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता मोहिमा राबवण्यात आल्या.



**"बेटी बचाओ, बेटी पढाओ"** या उपक्रमांतर्गत विभागातील विद्यार्थिनींना सायकल वाटप



महिला सबलीकरण अंतर्गत विभागातील महिलांना रोजगार निर्मितीकरिता घरघंटीचे वाटप



महिला सबलीकरण अंतर्गत विभागातील महिलांना रोजगार निर्मितीकरिता शिलाई मशीनचे वाटप




आत्मनिर्भर भारत योजने अंतर्गत गोराई गाव येथील महिलांना जीवन ज्योती विमा योजनेच्या पॉलीसीचे वाटप



हिरवा परिसर जीवन नवे, एकतरी झाड लावायला हवे विभागात वृक्षारोपण कार्यक्रम




कोरोनाच्या संकटातील एक आश्वासक उपक्रम... प्लाझ्मा दान शिबीर

पाकिस्तानने मुंबईवर केलेला भेकड दहशतवादी हल्ल्यात काही मुंबई पोलीस दलातील कर्मचारी, अधिकारी, सैनिक आणि एनएसजीच्या जवानांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. यानिमित्ताने त्यांची आठवण म्हणून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कारगील युद्धात भारतीय सेनेने केवळ शत्रूची नांगीच ठेचली नाही तर बळकावलेला भूभाग आणि महत्त्वाच्या टेकड्याही परत मिळवल्या. भारतीय सेनेने त्या युद्धात दाखवलेल्या अतुलनीय शौर्याचा गौरव म्हणून कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येतो. त्या युद्धात वीर मरण आलेल्या योद्ध्यांनी श्रद्धांजली आणि विजयी योद्ध्यांचा यथोचित सत्कार केला जातो. याचप्रमाणे पुलवामा येथे भारतीय सैन्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## जतन स्मृतींचे शहिदांच्या बलिदानाचे !

गतीमान विकासाचा
कार्यसंकल्प
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !












कारगिल विजय दिवस निमित्त सैनिकांच्या संवेदनशील कथा आणि पत्र वाचन











गतीमान विकासाचा
**कार्यसंकल्प**
जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

# नागरिकांच्या समस्यांचे निवेदन, त्याचे त्वरित निराकरण !

आमदार म्हणून जनतेचे प्रश्न सोडवतानाच विविध खासगी, शैक्षणिक संस्था अनेक गृहनिर्माण संस्थांचेही प्रश्न सामोरे येतात. काही ठिकाणी अतिक्रमणाचा मुद्दा असतो तर कुठे लादीकरण आणि मलनि:सारणाचा प्रश्न असतो. काही ठिकाणी खचलेल्या जमिनीवर भरावाची मागणी असते तर काही संस्था त्यांच्या परिसरातील रस्ता रुंदीकरणाची मागणी करतात. अनेक वेळा पिण्याच्या पाण्याची नळ जोडणी किंवा परिसरातील दिवा-बत्तीचे विषय येतात. या संस्था मतदारसंघील जनसंपर्क कार्यालयांमध्ये येऊन त्यांची निवेदने सादर करतात. त्यांच प्रश्न हे त्यांच्या दैनंदीन जिवनाशी निगडित असल्यामुळे महत्वाचे असतात. त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांचे प्रश्न समजून घेत त्यांची निवेदने स्विकारली जातात.






SONI PALACE CO. OP. HOUSING SOCIETY LTD.


गोल्डन क्रिडा मंडळ


SANT NIRANKARI MANDAL


SANSKRUTI BLDG. NO. 1 TO 4 CHS LTD.


Kavita Co-operative Housing Society Ltd.


LANCELOT CO-OP. HOUSING SOCIETY LTD.


## प्रशासकिय चर्चेतून प्रश्नांचा पाठपुरावा...

अशी निवेदने आल्यावर त्यातील प्रश्न समजून ते संबंधित प्रशासकिय विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून सोडवण्याचे काम केले जाते.





**भारतीय जनता पार्टी** बोरीवली विधानसभा

गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प

जनतेच्या हिताचा, कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा, पक्षाच्या संकल्पनेचा !

## समस्या... त्यांचे निवारण... मिळालेली पोचपावती !

आमदार या नात्याने समजकार्य करताना अनेक वेळा नागरिक आपल्या वैयक्तिक समस्या सुद्धा घेऊन येतात. कधी कोणाला शस्त्रक्रियेचा खर्च पेलणारा नसतो तर आर्थिक स्थिती नाजूक असल्यामुळे एखाद्या मातेला आपल्या पोटच्या पोरीला अनाथाश्रमात ठेवण्याची वेळ येते. या आणि अशा अनेक खासगी समस्या आम्ही सोडवल्या. एका भगिनीची अत्यावश्यक शस्त्रक्रिया झाली तर त्या आईने आमच्या मदतीने पोटच्या मुलीला परत घरी आणले. कोरोना काळात गोराई, मनोरी येथील नागरिकांचे खायला अन्न नसल्यामुळे होणारे हाल पाहून आम्ही अन्नधान्य तर पुरवलेच शिवाय त्या परिसरात निर्जंतुकीकरणही केले. ज्यांच्या समस्या सुटल्या त्यांनी आमचे आभार मानत दिलेली पोचपावती हिच आमची शिदोरी.



माझ्या आईचे ऑपरेशन आज यशस्वीरित्या केले गेले आहे. आपण जे काही केले त्याबद्दल आम्ही भारावून गेलो आहोत. हे इतक्या सहजतेने घडविणे आमच्यासाठी जवळजवळ अशक्यच होते.माझे वडील म्हणतात त्याप्रमाणे आपण आमच्याबरोबर एका दैवी पात्रा प्रमाणे उभे राहिलात. आम्ही सर्व आपल्या ह्या दयाळू भावाबद्दल कृतज्ञ आहोत.
आपला आभारी, सत्यजित पाटील



श्री. सुनील राणे सर यांनी माझ्यासाठी केलेल्या कार्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. मी बोरीवलीच्या तहसीलदार कार्यालयाबाहेर फॉर्म टाईपिस्ट आहे. माझी मुलगी अनाथ आश्रमात होती कारण आम्ही तिची आर्थिक काळजी घेण्यास सक्षम नव्हतो. माझ्या मुलीला अनाथाश्रमातून पुन्हा माझ्याकडे आणल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानते.
- कविता अभय पवार



कोरोना काळात अत्यावश्यक गरजा ओळखून चारकोप सेक्टर क्र. 8 येथील गरजू नागरिकांना अन्नधान्य पाठवण्यात आले, विभागाचे निर्जंतुकीकरण करण्यात आले. हे कार्य कार्यकर्त्यांनी मिळून केले. यासाठी या जागरूक नागरिकांनी दिलेली कार्याची ही पोचपावती! आभार!



कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढतच चालला असताना बोरीवलीमध्ये अडकलेल्या व मुंबईबाहेर प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी मोफत मेडिकल प्रमाणपत्र पुरोहित रुग्णालयामार्फत देण्यात आले. याबद्दल या नागरिकांनी आपले आभार व्यक्त केले.



"During the lockdown, we the residents of Gorai , Manori had a difficult time getting proper food supplies. We thank Shri Sunil Rane ji for sending regular food kits for us"
- Residents of Manori



नागरिकांच्या निरोगी स्वास्थ्यासाठी, आपले सामाजिक कर्तव्य बजावत रस्तेमार्ग, विभागांचे निर्जंतुकीकरण करण्यात आले. यासाठीच चारकोप विकास मंच व विघ्नहर्ता मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांतर्फे दिलेली ही पोचपावती!



"मी पूनम चौधरी, बोरिवलीचे आमदार सुनील राणे साहेब कोरोना काळात आमच्या सारख्या ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेत आहेत, याबद्दल त्यांचे मन:पूर्वक धन्यवाद!"



कोरोनाच्या कठीण काळात आर्थिक परिस्थिती बिकट असताना औषधोपचारासाठी आमचे मा.सुनिल राणे साहेब यांनी आम्हाला मोफत औषधाची मदत केल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार ! - एक गृहिणी

गतीमान विकासाचा

# कार्यसंकल्प

जनतेच्या हिताचा,
कार्यकर्त्यांच्या विश्वासाचा,
पक्षाच्या संकल्पनेचा !

## नवे रूप... नवा हुरूप... गोराई गावाच्या विकासाचा !

आपल्या मतदारसंघातील गोराई-मनोरी अशा दूर्गम भागात अनेक आदिवासी पाडे आहेत. या ठिकाणी अजूनही रस्ते, विज, सांडपाणी निचरा, पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्य सेवा, शिक्षण अशा अनेक पायाभूत सुविधांची वानवा आहे. हे भाग दुर्लक्षित आहेत ही बाब लक्षात आल्यानंतर तेथील जनतेसाठी काय मदत करता येईल, याची चाचपणी करण्यासाठी या भागांना भेट दिली. तेथील ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांचे प्रश्न समजून घेतले. गावात विहीर आहे पण पिण्यासाठी शुद्ध पाणी नाही. दूर्गम भागामुळे वैद्यकिय सुविधा मिळत नाहीत. निसर्ग वादळात अनेकांच्या घरांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्यासाठी काही चांगल्या योजना राबवण्याचा संकल्प आहे. आपला पाठिंबा, आपली साथ आणि आशीर्वादाची शिदोरी सोबत आहेच...त्या पाड्यांवर आनंद फुलवण्याचा सर्वांनी प्रयत्न करूया.








## गरज बदलत्या काळाची...होईल पहाट नव्या युगाची !

विकासाची ध्यास त्याला कल्पकता व नाविन्यपुर्णतेची कास देऊन अंगीकारलेली प्रस्तावित कामे

























भारतीय जनता पार्टी बोरीवली विधानसभा

## जनतेचे हक्काचे आलय
आमदार सुनिल दत्तात्रय राणे यांचे

# जनसंपर्क कार्यालय



नाटकवाला लेन, बोरिवली पश्चिम येथील जनसंपर्क कार्यालय



गोराई, बोरिवली पश्चिम येथील जनसंपर्क कार्यालय




चारकोप, बोरिवली पश्चिम येथील जनसंपर्क कार्यालय

**सकारात्मक विचारांचे समाजकारण**
**येथे होते सर्व समस्यांचे निराकरण !**




## सुनिल दत्तात्रय राणे

आमदार- बोरीवली विधानसभा
सरचिटणीस- भाजपा मुंबई

---

पत्ता : जमुना दर्शन, नाटकवाला लेन, बोरीवली (प.), मुंबई - ४०० ०९२.

संपर्क : ०२२ - २८०७ ६५६५ | ईमेल : sunilrane2013@gmail.com / helpdesksunilrane@gmail.com

---

SUNILRANEBJP SUNILRANEBJP @SUNILRANE_BJP SUNILRANE

Mansi Impression